SML-108

महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रांचा आढावा



समर्थन

महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रांचा आढावा

समर्थन

श्री. चंद्रशेखर प्रभू (अध्यक्ष)

श्री . टी. के. चौधरी (उपाध्यक्ष)

श्री. विवेक पंडित (कार्याध्यक्ष)

दिनांक : सप्टेंबर २००९

संपादन : प्रिया खान

संकलन : रुपेश कीर, अमित जोशी, शुद्धोदन कठाडे

रचना : जयश्री घोसाळकर

मुखपृष्ठ : राहुल चौधरी

नोंदणी क्रमांक :

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई,

१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार) :

डी-२, ग्रीष्मा गार्डनच्या पाठीमागे,

मधुवन हाईटस् जवळ, एव्हर शाईन गेट, गोखिवरे,

वसई (पू) - ४०१२०८, जि. ठाणे

दूरध्वनी : ९५-२५०-३०५९११८/३०५९११९

इमेल : samarthanmumbai97@gmail.com

संकेतस्थळ : samarthanadvocacy.org

मुद्रक :

नित्यानंद ग्राफिक्स, वसई (पूर्व)

भ्रमणध्वनी: ०९३२२१०१२८९

इमेल - nityanandgraphix1@gmail.com

लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणक यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाह यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांच पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावि यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

प्रस्तावना

महाराष्ट्राची गणना देशातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्यांमध्ये होत आली आहे. स्थूल उत्पन्न वाढ, दरडोई उत्पन्न, औद्योगिक गुंतवणूक अशा अनेक निकषांवर राज्य अव्वल स्थानावर असल्याचे दिसते. मात्र राज्याचा हा विकास असमतोल आहे. आर्थिक विकास साधला तरी मानव विकासात मात्र महाराष्ट्र अव्वल स्थानावर नाही. शहरांचा विकास झाला तरी खेडी मागासलेलीच आहेत. सवर्ण, उच्चभ्रू आणि वंचित समाज यांच्यामधील दरी कायम आहे. प्रादेशिक असमतोल अद्यापही नष्ट करता आलेला नाही.

४१ हजार रुपयांपेक्षा अधिक दरडोई उत्पन्न असणाऱ्या महाराष्ट्रापेक्षा ३३ हजार दरडोई उत्पन्न असणारे केरळ मानव विकासाचा विचार करता राज्यातील सर्वात प्रगत राज्य आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाने विकसित केलेल्या अधिक समावेशक अशा सुधारित मानव गरिबी निर्देशांकानुसार केरळ, आसाम, आंध्र प्रदेश, बिहारसह आठ राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत. राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या कमी व्हावयाच्या ऐवजी गेल्या दहा वर्षात वाढलेली आहे. कुपोषण, माता मृत्यूदर, प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता, शाळेतून होणारी गळती या आणि अशा निकषांवरही राज्याची स्थिती लाजिरवाणी आहे.

शेती उद्योग राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या क्षेत्रामधील गुंतवणुकीकडे गेल्या अनेक वर्षांमध्ये राज्यकर्त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. या क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ज्या वेगाने घटते आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक वेगाने या क्षेत्रातून राज्याला मिळणारे उत्पन्न घटत आहे. परिणामी या क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असणाऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. सिंचन व वीज या क्षेत्रांमधील प्रगती निराशाजनक आहे. या क्षेत्रांमध्ये झालेल्या गुंतवणुकीने शेतकऱ्यांना काहीही दिलासा मिळालेला नाही.

महाराष्ट्राचा आर्थिक आणि मानव विकास, राज्यातील दारिद्र्य, शेती, सिंचन, वीज, शिक्षण, आरोग्य, रोजगार या क्षेत्रातील कामगिरी आणि वंचित घटकांची सद्यस्थिती यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या अहवालात करण्यात आला आहे. या अहवालातील माहिती व आकडेवारी ही शासनाच्याच विविध प्रकाशनांमधून संकलित केलेली आहे. ती एकत्र ठेवण्याचे काम केवळ या अहवालात केलेले आहे.

अभ्यासू नागरिक, संघटना, पत्रकार, राजकीय पक्ष यांना या अहवालाचा संदर्भासाठी उपयोग होईल अशी मला आशा आहे. विधानसभेच्या निवडणुका नजीक आहेत. येणारे सरकार राज्यापुढील आव्हाने जाणून महाराष्ट्राची पुरोगामी, प्रगत प्रतिमा जपण्यासाठी कठोर परिश्रम घेईल अशी मला आशा आहे.

– विवेक पंडित

कार्याध्यक्ष, समर्थन

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले : राज्याची आर्थिक स्थिती

आर्थिक विकास १
गेल्या दहा वर्षातील राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान १
राज्य स्थूल उत्पन्नातही तिपटीने वाढ १
दरडोई उत्पन्नातही लक्षणीय वाढ २
असमतोल विकास २
राजकोषीय स्थैर्य ३
तुटीचे आव्हान कायम ३
कर्जाचा विळखा ४
राज्यावरील एकूण कर्ज व व्याज तसेच प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावरील कर्ज व व्याजाचा भार ४
खर्चाचे स्वरुप ५
भांडवली खर्चाच्या प्रमाणात गेल्या ५ वर्षात घट ५
एकूण खर्चापैकी विकास खर्चातील घट ५
वेतन, निवृत्तिवेतन, व्याज या अपरिहार्य खर्चांनीच केला महसूल गिळंकृत ६
राज्याची आर्थिक स्थिती - नियोजन आयोगाच्या महाराष्ट्र राज्य विकास अहवाल, २००७ मधील निष्कर्ष ६
बांधील खर्चाचे महसुली जमा व खर्चाच्या तुलनेत प्रमाण ६
राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण आणणाऱ्या बाबी ७
हमीचा बोजा ७
महामंडळे की पांढरे हत्ती ? ८
राज्य शासनाने महामंडळांना दिलेले अर्थसहाय्य व त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी ९
महामंडळांसंदर्भात स्पष्ट धोरण स्वीकारण्यात शासनाची टाळाटाळ ९
अर्थव्यवस्थेवर ताण आणणाऱ्या साखर उद्योगावर सरकारची मेहेरनजर १०
महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन : कॅगचे ताशेरे १०

प्रकरण दुसरे : दारिद्र्य व मानव विकास

दारिद्र्य ११
गेल्या १० वर्षात दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत १२ लाखांनी वाढ ११
देशातील प्रमुख राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या (लाखात) व प्रमाण ११
आर्थिक आघाडीवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील विषमता व विकासातील असमतोल १२
राज्यातील दारिद्र्याचा भस्मासूर १२
मानव विकास १३
महाराष्ट्र व केरळ या राज्यांची निवडक निकषांवर तुलना १३
केरळच्या विकासाची कारणे १३
राज्यातील जिल्ह्यांची मानव विकास निर्देशांकानुसार व दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्नानुसार क्रमवारी १४
राज्याच्या महसुली विभागांसाठीचे मानव विकास निर्देशांक १४
महाराष्ट्र मानव विकास मिशनची अंमलबजावणी १५

प्रकरण तिसरे : शालेय शिक्षण, आरोग्य आणि रोजगार
शालेय शिक्षण १७
राज्य अर्थसंकल्पातील शालेय शिक्षण विभागाचे स्थान १७
किमान समान कार्यक्रम - उद्दिष्ट व साध्य १७
सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावरील खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण १८
सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी १८
शाळाबाह्य मुले १८
एक शिक्षकी शाळा १९
वर्गखोल्यांचा अनुशेष २०
जिल्हावार वर्गखोल्यांची कमतरता २०
गळती २१
माध्यमिक वर्गाची अनुपलब्धता २१
माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेची आवश्यकता २१
शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात पंचायती राज समितीचे ताशेरे २१
२००२-०८ या काळात सर्व शिक्षा अभियानाची मंजूर योजना, प्राप्त निधी व खर्च २२
जिल्हा परिषद शाळांमध्ये पायाभूत सुविधांची वानवा २३
सार्वजनिक आरोग्य २३
राज्य अर्थसंकल्पातील आरोग्य विभागाचे स्थान २३
राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत आरोग्य विभागावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण २४
आरोग्य विभागातील रिक्त पदांची समस्या २४
अपुऱ्या आरोग्य संस्था २७
राज्यातील खालावलेल्या आरोग्य सुविधांसंदर्भात विधिमंडळ प्रश्नोत्तरांमधून मिळालेली माहिती २७
आरोग्य संस्थांचे पंचनामे २८
रोजगार ३१
नोंदणीकृत बेरोजगार ३१
असंघटित क्षेत्रातील मजूरांवर अन्याय ३२
राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे अपयश ३२
प्रकरण चौथे : शेती, सिंचन व वीज ३३
शेती ३३
महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी नुसार ३३
उत्पादकतेत महाराष्ट्र पिछाडीवर ३३
राज्याच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत कृषि विभागावर झालेल्या खर्चाचा कल ३३
शेतकऱ्यांच्या आत्महत्या ३४
शेतकरी पॅकेजेसच्या अंमलबजावणीवर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे ताशेरे ३४
नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष ३६
७८० कोटींच्या पंतप्रधान पॅकेजची अंमलबजावणी ३६
खाजगी सावकारी आणि वाढते कर्जदार शेतकरी ३८

नरेंद्र जाधव समितीने सुचविलेल्या उपाययोजना ३८

सिंचन ३९

सर्वात अधिक गुंतवणूक करूनही महाराष्ट्रात सिंचन सर्वात कमी ३९

निर्मित सिंचन क्षमतेचाही पूर्ण वापर नाही ४०

वाढण्याऐवजी कमी झालेले सिंचन क्षेत्र ४०

गेल्या ९ वर्षात प्रत्यक्ष वापरातील सिंचन उद्दिष्टांच्या केवळ २५ टक्के ४०

सिंचनातील विषमता ४०

अपूर्ण सिंचन प्रकल्प ४१

अपूर्ण प्रकल्पांचा अर्थव्यवस्थेवर ताण ४१

रखडलेल्या सिंचन प्रकल्पांवर खर्च झालेला अधिकचा वेळ व निधी ४१

रखडलेल्या सिंचन प्रकल्पांची उदाहरणे ४२

वीज ४२

राज्यातील वीज निर्मितीचा खेळखंडोबा ४२

राज्य नियोजन मंडळाच्या अहवालावरून स्पष्ट होणाऱ्या बाबी ४३

वीज निर्मिती करण्याबाबत शासनाने केलेल्या पोकळ घोषणा ४३

वीज निर्मिती आणि विजेचा वापर ४३

वीज निर्मितीत खाजगी क्षेत्राचा वाटा ४४

प्रमुख राज्यांची मार्च २००८ अखेर विद्युत क्षमता ४४

प्रकरण पाचवे : सामाजिक न्याय

राज्यातील आदिवासींची दूरावस्था ४५

आदिवासी उपयोजनेचा बोजवारा ४६

आदिवासी उपयोजनेचा रु. ८ हजार कोटींचा अनुशेष ४६

आदिवासी शासनाच्या प्राथम्यक्रमात नाहीत ४७

प्रकल्पस्तरीय नियोजन व आढावा समित्या मोडीत ४७

आदिवासी विकास विभागांतर्गत योजनेच्या संनियंत्रणासाठी स्वतंत्र यंत्रणा हवी ४८

आदिवासी उपयोजनेचा निधी इतरत्र वळविता यावा यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल ४८

आदिवासींचे दारिद्र्य ४८

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसूचित जमातीची कुटुंबे व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे ४९

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार आदिम जमातीसंदर्भातील निरीक्षणे ४९

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांची उत्पन्ननिहाय वर्गवारी ५०

आदिवासींच्या शिक्षणाप्रति अनास्था ५०

राज्यातील एकूण तसेच आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण ५०

आदिम जमातींमधील साक्षरता ५१

आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण ५१

आदिवासींमधील कुपोषण ५१

नवसंजीवनी योजना क्षेत्रातील बालमृत्यू ५१

राज्यातील ५० टक्के आदिवासी बालके कुपोषित ५२

मातृत्त्व अनुदान योजना ५२
आश्रम शाळेचा पंचनामा ५२
ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची दूरावस्था : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल ५३
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे ताशेरे ५४
आदिवासी विकासासाठी राज्य नियोजन मंडळाच्या शिफारशी ५५
आदिवासी उपयोजनेप्रमाणे अनुसूचित जाती उपयोजनेचाही बोजवारा ५६
वर्ष २००८-०९ मधील अनुसूचित जाती उपयोजनेची अंमलबजावणी ५६
दहावी पंचवार्षिक : योजना अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत नियतव्यय व खर्च ५७
महिला विकास ५८
राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत महिला व बाल विकास विभागावर झालेला खर्च ५८
महिला विकासाच्या कालबाह्य योजना ५८
कागदावर उरलेले महिला धोरण ५९
दुर्लक्षित व उपेक्षित राज्य महिला आयोग: विधिमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीची निरीक्षणे ६०
अनुदानाअभावी राज्य महिला आयोगाचे हाल ६०
महाराष्ट्रात १००० पुरुषांमागे केवळ ९२६ महिला ६१
कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण ६२
महिला व बाल विकासासाठी राज्य नियोजन मंडळाच्या सूचना ६४

राज्याची आर्थिक स्थिती

आर्थिक विकास

गेल्या दहा वर्षातील राज्य अर्थसंकल्पांचे आकारमान

१९९९-०० या वर्षाचा अर्थसंकल्प होता रु. ३९ हजार २४३ कोटींचा. वर्ष अखेरीस प्रत्यक्ष खर्च होताना एक हजार कोटींची वाढ होऊन अर्थसंकल्पाचे आकारमान रु. ४० हजार २४३ कोटी झाले. आज ११ वर्षांनंतर अर्थसंकल्पाचे आकारमान जवळपास तीन पट वाढले आहे. वर्ष २००९-१० साठी मांडलेला अर्थसंकल्प रु. १ लाख २२ हजार ९६३ कोटींचा आहे.

आलेख क्र: १



स्रोत: वित्तविषयक विवरणपत्र व अतिरिक्त खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज

टीप: १९९९-०० ते २००७-०८ पर्यंत प्रत्यक्ष खर्च, २००८-०९ चे सुधारित अंदाज व २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाज

राज्य स्थूल उत्पन्नातही तिपटीने वाढ

तक्ता क्र: १

रुपये कोटीत

वर्ष	स्थूल राज्य उत्पन्न	वर्ष	स्थूल राज्य उत्पन्न
२०००-०१	२५२२८३	२००५-०६	४३८०५८
२००१-०२	२७४११३	२००६-०७	५०९३५६
२००२-०३	३००४७६	२००७-०८	५९०९९५
२००३-०४	३४१४२४	२००८-०९	६९७६८३
२००४-०५	३८७३९०	२००९-१०	७९७८४१

स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प

टीप: २०००-०१ ते २००७-०८ पर्यंत प्रत्यक्ष खर्च, २००८-०९ चे सुधारित अंदाज व २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाज

साधारणपणे याच काळात राज्य स्थूल उत्पन्नामध्येही तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली. २०००-०१ मध्ये रु. २ लाख ५२ हजार २८३ कोटी असलेले राज्याचे स्थूल उत्पन्न वर्ष २००९-१० मध्ये रु. ७ लाख ९७ हजार ८४१ एवढे वाढले.

देशांतर्गत स्थूल उत्पन्नामध्ये वर्ष २००७-०८मध्ये ९ टक्के वाढ झाली होती. राज्याच्या स्थूल उत्पन्न वाढीचा दर काहीसा अधिक म्हणजे ९.२ टक्के होता. जागतिक मंदीच्या परिणामी २००८-०९ मध्ये स्थूल उत्पन्नातील वाढीचा वेग मंदावेल व तो राज्यासाठी ६.७ टक्के असेल असे अनुमानित करण्यात आले आहे. औद्योगिक क्षेत्राची व अपुऱ्या पावसामुळे कृषि क्षेत्राची वाढ मंदावल्यामुळे राज्याच्या स्थूल उत्पन्न वाढीचा वेग मंदावला आहे.

स्थूल उत्पन्न वाढीच्या दराचा विचार करता महाराष्ट्र राज्य इतर राज्य इतर राज्यांच्या तुलनेत मागे पडत गेले आहे. आठव्या पंचवार्षिक योजने काळात राज्य स्थूल उत्पन्न वाढीचा दर ८.९ टक्के होता व हा दर देशात दुसऱ्या क्रमांकाचा होता. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात वाढीचा ४.७ टक्के होता व देशात राज्य सातव्या क्रमांकावर होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेसाठी हा दर ७.४ राहील असे अपेक्षित केले होते व राज्य नव क्रमांकावर होते.

दरडोई उत्पन्नातही लक्षणीय वाढ

आलेख क्र: २



स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प

देशाच्या तुलनेत राज्याचे दरडोई उत्पन्न कायमच चांगले राहिले आहे. महाराष्ट्र राज्य हे या निकषावर देशातील श्रीमंत राज्यांपैकी एक गणले ज २००६-०७ या वर्षी गोवा (७९,३५१), दिल्ली (६६,७२८) व हरियाणा (४९,०३८) पाठोपाठ महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर होता.

असमतोल विकास

- देशांतर्गत स्थूल उत्पन्नामध्ये ६.७ टक्के वाढ अपेक्षित असताना कृषि क्षेत्रातील वाढ मात्र -७.१ टक्के.
- देशांतर्गत स्थूल उत्पन्नात १२.५ टक्के वाटा असणाऱ्या महाराष्ट्रातील ३ कोटी १७ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली.
- राज्याचे दरडोई उत्पन्न रु. ४७ हजार ५१ एवढे असताना दारिद्र्यरेषेखालील ९१ टक्के आदिवासींचे उत्पन्न जेमतेम रु. ११ हजार.
- मुंबईचे दरडोई उत्पन्न रु. ७३ हजार ९३० तर गडचिरोली व नांदेडचे अनुक्रमे रु. २४ हजार ३२७ व रु. २४ हजार ४०५.
- राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ७७.२७ टक्के असताना भामरागड प्रकल्पातील आदिवासींची साक्षरता केवळ १५ टक्के.

राजकोषीय स्थैर्य

तुटीचे आव्हान कायम

जमा व खर्चातील तफावत म्हणजे तूट किंवा अधिक्य. राज्याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना तुटीचा दोन प्रकारे विचार केला जातो. महसुली तूट, यामध्ये केवळ महसुली जमा व महसुली खर्चातील तफावत गृहीत धरलेली असते. तर राजकोषीय तुटीमध्ये महसुली तुटी बरोबरच राज्याची दायित्वेही गृहीत धरलेली असतात. तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. तुटीमुळे राज्याचा विकास व स्थैर्य यांना खीळ बसते.

केंद्रशासनाच्या कर्ज पुनर्रचना सुविधेचा लाभ मिळविण्यासाठी केंद्र शासनाने राज्यशासनांना राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्प व्यवस्थापन कायदा संमत करणे बंधनकारक केले होते. महाराष्ट्राने हा कायदा २००५मध्ये स्वीकारला व त्यानुसार राज्याला वर्ष २००८-०९ पर्यंत महसुली तूट शून्यावर आणावयाची होती, तर राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण ३ टक्के एवढे ठेवावयाचे होते.

वर्ष २००६-०७ पासून शासनाने महसुली तुटीवर नियंत्रण मिळविलेही होते. मात्र सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी व निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घेतलले आर्थिक परिणाम असणारे निर्णय यामुळे गेल्या तीन वर्षातील महसुली अधिक्याची परंपरा २००९-१० मध्ये खंडित झाली आहे. राजकोषीय तुटीचे प्रमाणही २.३ टक्क्यांवरून ३.३ टक्के असे वाढले आहे.

राजकोषीय स्थैर्याकडे होत असलेली वाटचाल खंडित

आलेख क्र: ३



	१९९९-००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
राजकोषीय तुटीची टक्केवारी	४.०	३.४	३.९	५.०	५.३	४.८	४.०	२.३	-०.५	२.३	३.३
महसुली तुटीची टक्केवारी	१.७	३.१	३.०	३.१	२.४	२.६	०.९	-०.२	-२.५	-०.६	०.९

राजकोषीय व महसुली तुटीच्या रकमा

तक्ता क्र: २

वर्ष	राजकोषीय तूट	महसुली तूट
१९९९-००	९९७५	४२६९
२०००-०१	८५७६	७८३४
२००१-०२	१०५९२	८१८८
२००२-०३	१४८८१	९३७१
२००३-०४	१७९२९	८३१०
२००४-०५	१८६२०	१००३३
२००५-०६	१७६३०	३८४२
२००६-०७	११५५३	-८१०
२००७-०८	-२८२१	-१४८०३
२००८-०९	१६२२०	-४२६३
२००९-१०	२६५६२	७१२३

स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प. टीप : २००८-०९ सुधारित अंदाज २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

कर्जाचा विळखा

तुटीप्रमाणेच कर्जाचेही राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. वर्ष १९९९-०० अखेर राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी एवढा होता. राज्य स्थूल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण १७.२ टक्के होते. कर्जाचा हा बोजा वाढत २००९-१० पर्यंत रु. १ लाख ८५ हजार ८०१ कोटींवर पोहोचला आहे. राज्य स्थूल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण २३.२८ टक्के एवढे वाढले आहे. कर्ज व व्याजाचा एकत्रित विचार करता राज्यावरील बोजा रु. २ लाख ६६१ कोटी एवढा आहे. गेल्या दहा वर्षात सरासरी १३.७ टक्के दराने राज्यावरील कर्जाची रक्कम वाढली आहे. आज राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर रु. १८ हजार २९२ कोटींचा कर्ज व व्याजाचा भार आहे.

आलेख क्र: ४



राज्यावरील एकूण कर्ज व व्याज तसेच प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावरील कर्ज व व्याजाचा भार

तक्ता क्र. ३

वर्ष	एकूण कर्ज	एकूण व्याज	दरडोई कर्ज व व्याज
१९९९-००	४२,६६६	४,८८४	५,२१९
२०००-०१	६१,०८१	६,२३४	७,३०८
२००१-०२	७२,१२२	७,८३४	८,०९२
२००२-०३	८२,५४९	८,७१४	९,०४४
२००३-०४	९७,६७४	९,९०२	१०,६१९
२००४-०५	१,०९,१६७	१०,२५८	११,६२८
२००५-०६	१,२४,३६५	१०,५२३	१२,९५७
२००६-०७	१,४२,३८३	११,९८३	१३,८९४
२००७-०८	१,४२,३८३	१२,९३२	१४,८५६
२००८-०९	१,६१,२७६	१२,८४३	१५,८७७
२००९-१०	१,८५,८०१	१४,८६०	१८,२९२

स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प

टीप: २००८-०९ सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज. एकूण कर्ज व व्याज रुपये कोटीत व दरडोई कर्ज व व्याज रुपयात

ांडवली खर्चाच्या प्रमाणात गेल्या ५ वर्षात घट

ालेख क्र: ५



	१९९९-००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०
एकुण खर्चात भांडवली खर्चाची टक्केवारी	२३.३६	२२.३४	३०.२८	३३.८८	३५.५९	३३.०२	२७.७५	२१.५८	२१.१९	२४.०२	२१.६५

ता निर्माण करण्यासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाला भांडवली खर्च म्हटले जाते. साधारणपणे कर्जाद्वारे उभारलेल्या निधीतून व शिल्लक रोख रकमेतून खर्च भागविला जावा अशी अपेक्षा असते. १९९९-०० या वर्षी एकूण खर्चापैकी २३.३६ टक्के खर्चाचे स्वरूप भांडवली होते. २००३-०४ ध्ये हे प्रमाण ३५.५९ टक्क्यांपर्यंत वाढत गेले तरी नंतरच्या ५ वर्षांमध्ये या प्रमाणात तीव्र घसरण झाली आहे.

ल्या १० वर्षात भांडवली खर्चातील सरासरी ५३ टक्केच खर्च विकासासाठी

कर्ज व शिल्लक रकमेतून भांडवली खर्च होत असल्याने हा खर्च विकासात्मक स्वरूपाचाच असणे अपेक्षित आहे. मात्र गेल्या १० वर्षात (२००० ते २०१०) भांडवली खर्चापैकी ५३ टक्के खर्च विकासात्मक स्वरूपाचा होता तर ४७ टक्के खर्च विकासेतर बाबींवर झाला. त्या तुलनेत १९९५ ते २००० या त्यापूर्वीच्या पाच वर्षात भांडवली खर्चापैकी सरासरी ९७ टक्के खर्चाचे स्वरूप विकासात्मक होते. त्याचप्रमाणे १९९५-२००० या काळात महसुली खर्चापैकीही ६७ टक्के खर्चाचे स्वरूप विकासात्मक होते. पुढील १० वर्षात या प्रमाणात घसरण होऊन जेमतेम ५९ टक्के खर्च विकासात्मक स्वरूपाचा राहिला.

एकूण खर्चापैकी विकास खर्चातील घट

ालेख क्र: ६



ोत: संक्षिप्त अर्थसंकल्प टीप: २००८-०९ सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

वेतन, निवृत्तिवेतन, व्याज या अपरिहार्य खर्चांनीच केला महसूल गिळंकृत

राज्याच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी जी परिमाणे वापरली जातात त्यामध्ये महसुली जमेच्या तुलनेत वेतन, निवृत्तिवेतन व व्याजप्रदान या बाबींवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण हे एक आहे. या तीन बाबींवरील खर्च हा अपरिहार्य खर्च असतो व त्यामुळे प्राथमिकतेनुसार खर्च करण्यासाठी फारच कमी वाव राहतो. वर्ष २००० ते २००४ या काळात अशा बांधील खर्चाचे प्रमाण महसुली जमेच्या तुलनेत ८७ टक्क्यांवर पोहोचले होते. त्यानंतरच्या चार वर्षांमध्ये अशा बांधील खर्चाच्या प्रमाणात घट साध्य करता आली होती. वर्ष २००९-१०चे अंदाज मात्र या खर्चाचे प्रमाण पुन्हा वाढून ६३ टक्क्यांवर जाईल असे सूचित करतात.

वेतन व निवृत्ती वेतनाच्या रकमेतील व महसुली जमेशी त्यांच्या प्रमाणातील वाढीस अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या संख्येत व वेतनात झालेली वाढही कारणीभूत आहे. १९९३-९४ मध्ये अनुदानित संस्थांना दिल्या जाणाऱ्या रु. ३ हजार ४७३ कोटींच्या अनुदानात २००२-०३ पर्यंत रु. १२ हजार २६२ कोटी एवढी वाढ झाली. या संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या संख्येतही ५ लाख ८० हजारांवरून ६ लाख ८० हजार अशी वाढ झाली. १९९५-९६ ते २०००-०१ या काळात राज्यशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात १३ टक्के वाढ झालेली असताना अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे वेतन मात्र २० टक्क्यांनी वाढले.

राज्याची आर्थिक स्थिती – नियोजन आयोगाच्या महाराष्ट्र राज्य विकास अहवाल, २००७ मधील निष्कर्ष

महाराष्ट्रातील अलीकडच्या काळातील आघाडी सरकारने लोकप्रियता मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांवर भर दिला. यामुळे संस्थात्मक व धोरणात्मक सुधारणांची आवश्यकता असलेल्या बाबी जसे उर्जा क्षेत्राची पुनर्रचना, अर्थसहाय्यात कपात, अनुदानित संस्थांमधील सुधारणा, महामंडळांची पुनर्रचना, हमी व सहकारी संस्थांवर नियंत्रण, अर्थसंकल्पबाह्य कर्ज कमी करण्याची आवश्यकता, नागरी सुविधांमधील सुधारणा दुर्लक्षित राहिल्या.

मलमपट्टी करणाऱ्या सोप्या आर्थिक धोरणांमुळे काही काळासाठी अर्थव्यवस्थेला चालना मिळतेही मात्र अर्थव्यवस्थेवर त्याचे दूरगामी विपरित परिणाम होतात. (क्षमता असताना) खालावत चाललेले महसुली उत्पन्न, निष्फळ खर्चात वाढ, वाढती महसुली व राजकोषीय तूट, कर्ज व व्याजप्रदानांवर वाढत असलेला बांधील खर्च यामुळे सामाजिक व आर्थिक सेवांवर आवश्यक असा खर्च करण्यात अडथळे निर्माण होतात. महाराष्ट्राने आवश्यक व पुरेशा राजकोषीय सुधारणा अमलात न आणल्यास काही काळातच परिस्थिती हाताबाहेर जाईल. कर्ज व तुटीच्या वाढत्या बोजाचा सामना करणे आधीच कठीण झाले आहे.

बांधील खर्चाचे महसुली जमा व खर्चाच्या तुलनेत प्रमाण

तक्ता क्र : ४

महसुली जमेशी प्रमाण			तपशील	महसुली खर्चाशी प्रमाण		
१९९४-९५	१९९९-००	२००९-१०		१९९४-९५	१९९९-००	२००९-१०
४०.९५	५७.०८	३८.५६	वेतन व मजुरी	४१.७३	४८.८३	३५.७१
११.६६	१९.३३	१६.६९	व्याज प्रदान	११.८८	१६.५३	१५.४४
०३.२४	०६.२९	०७.६७	निवृत्ती वेतन	०३.५५	०५.५०	०७.१०
५५.८५	८२.७०	६२.९२	एकूण बांधील खर्चाचे प्रमाण	५६.९६	७०.८६	५८.२५

संदर्भ: राज्य विकास अहवाल व संक्षिप्त अर्थसंकल्प. टीप: २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण आणणाऱ्या बाबी

हमीचा बोजा

राज्य शासनाने दिलेल्या हमीच्या रकमा शासनाच्या आकस्मिक निधीवर दायित्व म्हणून राहतात. महाराष्ट्रात पूर्वी अस्तित्वात असलेल्या मुंबई हमी अधिनियमांतर्गत हमीच्या कमाल मर्यादा आखून दिलेल्या होत्या. कालांतराने हा अधिनियम दुरुस्त करून हमीच्या कमाल मर्यादा काढून टाकण्यात आल्या. वर्ष २००७-०८ अखेर राज्यावर रु. ३६ हजार ०७४ कोटी ६२ लाख रकमेच्या हमीचा बोजा होता. २००५ ते ०९ या केवळ ४ वर्षांमध्ये शासनाने दिलेल्या हमीची रक्कम रु. १५ हजार १३२ कोटी ३७ लाख एवढी प्रचंड आहे.

वर्ष २००५-०६ ते २००८-०९ या काळात राज्य शासनाने विविध संस्थांना दिलेली हमी

तक्ता क्र: ५

वर्ष	हमी दिलेल्या संस्थांची नावे	हमीची रक्कम (कोटीत)
२००५-०९	महाराष्ट्र राज्य सहकारी कापुस उत्पादक पणन महासंघ	५०२६.८१
२००५-०६	महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.	२२४४.२१
२००५-०६	महाराष्ट्र राज्य रास्ते विकास महामंडळ	१८३७.३६
२००५-०७	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	१५०६.२२
२००७-०८	रत्नागिरी गॅस आणि पॉवर प्रा.लि.	७५०.००
२००७-०८	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ	७३०.७५
२००५-०६	महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ	६४२.४०
२००५-०६	विदर्भ पाटबंधारे महामंडळ	५०८.७७
२००५-०९	सहकारी साखर कारखाने (१२४)	४८८.१८
२००८-०९	महाराष्ट्र कृषि उद्योग विकस महामंडळ	४५७.५०
२००५-०६	महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी लि	३२६.६४
२००५-०६	नांदेड जिल्हा मध्यावर्ती बँक लि.	२०७.००
२००६-०७	महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कं.लि.	११५.५३
२००८-०९	महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ	१००.००
२००५-०६	महाराष्ट्र अपंग वित्त व विकास महामंडळ	५५.००
२००८-०९	महाराष्ट्र राज्य इ. मा. व. वित्त विकास महामंडळ	५०.००
२००८-०९	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ	५०.००
२००८-०९	शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ	२५.००
२००५-०८	महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर	११.००
	एकूण	१५१३२.३७

स्रोत: माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती

आजवर शासनाने दिलेल्या हमी बद्दल शासनाला रु. ५ हजार ११४ कोटी हमी फी मिळावयास हवी होती. यापैकी केवळ रु. २०५ कोटी शासनास प्राप्त झाले आहेत. वर्ष २००९-१० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला शासनाने दिलेल्या हमीबद्दल महामंडळाला शासनास हमीची फी देता यावी यासाठी शासनानेच महामंडळाला रु. ४५४ कोटी एवढ्या मोठ्या रकमेचे अंशदान दिलेले आहे. म्हणजे तोट्यातील महामंडळांनी कर्जे काढायची, त्यासाठी शासनाने हमी द्यायची, महामंडळे कायमच तोट्यात राहणार म्हणून कर्जही शासनानेच फेडायचे आणि हमी दिल्याबद्दलचे कमिशन मिळण्यासाठी शासनाने महामंडळांना पुन्हा अनुदानही द्यायचे असा हा अजब मामला आहे.

महामंडळे की पांढरे हत्ती ?

राज्य शासनाच्या विविध विभागांतर्गत ५१ महामंडळे येतात. यापैकी निम्म्याहून अधिक २७ महामंडळे तोट्यात आहेत. खाली दिलेल्या तक्त्या तोट्यात चालणाऱ्या २७ महामंडळांपैकी सुरुवातीची पाच महामंडळे ही सर्वाधिक तोट्यात चालणारी महामंडळे असून त्यांच्या एकत्रित तोट्याची टक्के ८३ टक्क्यांपेक्षा अधिक (रु. ४ हजार ७१७ कोटी ३४ लाख) आहे.

महामंडळांचा संचित तोटा

तक्ता क्र: ६

अ.क्र.	सार्वजनिक उपक्रम	संचित तोटा (रुपये कोटीत)	एकूण तोट्याशी टक्केवारी
१	महाराष्ट्र राज्य रस्ते विकास म.मर्यादित	१,५२७.८२	२७.४७
२	मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित*	१,२९४.००	२३.२७
३	महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित*	७०१.६३	१२.६२
४	महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ	६१४.९७	११.०६
५	महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ मर्यादित*	५७८.९२	१०.४१
६	महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित	३०३.४१	५.४६
७	महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित	१७५.२७	३.१५
८	महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ	९१.४५	१.६४
९	महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित	७८.०१	१.४०
१०	महाराष्ट्र जलसंधारण विकास महामंडळ मर्यादित	३५.३७	०.६२
११	महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित	३३.९४	०.६१
१२	पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित	२३.३३	०.४१
१३	महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित	१६.४८	०.२९
१४	मॅफको मर्यादित*	१५.३९	०.२८
१५	विदर्भ विकास महामंडळ मर्यादित*	१४.५५	०.२६
१६.	कोकण विकास महामंडळ मर्यादित*	१४.०६	०.२५
१७	महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी वि.म.म.	७.०१	०.१३
१८.	महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ	६.३३	०.११
१९	महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ	५.८४	०.११
२०	महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकस महामंडळ म.	५.१८	०.०९
२१	वसंतराव नाईक वि.जा.व भ.ज. वि.महामंडळ म.	४.७९	०.०९
२२	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ म.	४.७६	०.०९
२३	कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित	२.५३	०.०५
२४	महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ मर्यादित	२.३७	०.०४
२५	महाराष्ट्र राज्य इ.मा.व. वित्त व विकास म.म.	१.८४	०.०३
२६	पु.अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास म.म.	०.५८	०.०१
२७	महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित	०.२७	०.०१
	एकूण	५,५६०.०१	१००.००

स्रोत: माहितीच्या अधिकाराखाली वित्त विभागाकडून मिळालेली माहिती. हे चिन्ह वर्ष २००७- ०८ चा तोटा दर्शवते तर इतर*

राज्य शासनाने महामंडळांना दिलेले अर्थसहाय्य व त्याची एकूण खर्चाशी टक्केवारी

तक्ता क्र: ७

रु. कोटीत

वर्ष	अर्थसहाय्य	टक्केवारी
२०००-०१	४६९	१.१४
२००१-०२	१८००	४.३५
२००२-०३	२००९	४.३८
२००३-०४	९७५	१.८४
२००४-०५	३९९४	६.४७
२००५-०६	२८८५	४.३३
२००६-०७	३७७७	५.११
२००७-०८	४९३५	६.३६

स्रोत: भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे नागरी अहवाल

२००२-०८ या काळात दिल्या गेलेल्या अर्थसहाय्यापैकी सर्वाधिक म्हणजे ४८.५ टक्के अर्थसहाय्य विद्युत क्षेत्रासाठी दिले गेले.

महामंडळांसंदर्भात स्पष्ट धोरण स्वीकारण्यात शासनाची टाळाटाळ

वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांनी डिसेंबर २००५ मध्ये अतारांकित प्रश्नाला दिलेली माहिती:

"महाराष्ट्रातील ३१ महामंडळे (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) मार्च ०४ अखेरीस तोट्यात होती. या महामंडळाचा एकूण संचित तोटा रु. ४ हजार ८४५ कोटी ८५ लाख एवढा होता. या तोट्यात मुख्य वाटा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा आहे. या महामंडळाचा तोटा रु. ३ हजार ७४९ कोटी ४५ लाख (एकूण तोट्यापैकी ७७%) एवढा आहे.

महामंडळ तोट्यात आहे म्हणून बंद करावयाचे शासनाचे धोरण नाही. या सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करणे, त्याचे एकत्रिकरण करणे, विलिनीकरण करणे, ते बंद करणे इत्यादी बाबींसाठी शासनाने काय उपाययोजना करावी यासाठी शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळाची स्थापना केली आहे. या उपक्रमांमधील शासनाच्या भांडवलाच्या निर्गुंतवणुकीकरिता काय उपाययोजना करावी याची शिफारस करण्याचेही अधिकार या मंडळाला आहेत.

शासनाला ज्या सार्वजनिक उपक्रमांमधील स्वामित्व व व्यवस्थापन यामधील नियंत्रण काढून घेण्याची इच्छा आहे, अशा १४ उपक्रम संदर्भ शासनाने या मंडळाकडे केला होता. तसेच ज्या राज्य सार्वजनिक उपक्रमांची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही आणि तातः सुधारात्मक उपाययोजनांची आवश्यकता आहे, अशा ४ उपक्रमांचा संदर्भही शासनाने मंडळाकडे केला आहे."

शासनाने स्थापन केलेले सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ हे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत स्थापन केले होते. कायद्यानुसार नेमण्यात आलेल्या या मंडळाच्या शिफारशी राज्य शासनावर बंधनकारक असणार होत्या. या मंडळाने काही महामंडळे बंद करण्याची शिफारस केली होती. मात्र ही शिफारस राजकीय हिताविरोधी असल्याने शासनाने वरील कायदाच निरसित केला.

त्याचप्रमाणे मार्च, २००५ मध्ये अर्थसंकल्प सादर करताना महामंडळ पुनर्रचनेसंदर्भातील जबाबदारी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडे सोपविण्यात आल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले होते. मात्र हे महामंडळच तेव्हा रु. ६२२ कोटी १० लाख रुपयांनी तोट्यात होते. मार्च २००५ नंतर मात्र कधीही वस्त्रोद्योग महामंडळाने यासंदर्भात पुढे केलेल्या कार्यवाहीचा उल्लेख करण्यात आला नाही.

अर्थव्यवस्थेवर ताण आणणाऱ्या साखर उद्योगावर सरकारची मेहेरनजर

सधन पश्चिम महाराष्ट्राचे अर्थकारण ज्यावर अवलंबून आहे अशा या साखर कारखान्यांनी राज्याचे कंबरडे मोडले आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या मूळ प्रकल्प किमतीच्या सुमारे ९२.५ टक्के रक्कम ही शासनामार्फत दिली जाते. या शिवाय शासन वेळोवेळी विविध अनुदाने कारखान्यांना देत असते. असे असूनही राज्यातील बहुतांश साखर कारखाने नेहमीच तोट्यात असतात.

राज्यातील २०२ सहकारी साखर कारखान्यांपैकी ११६ सहकारी साखर कारखाने तोट्यात चालत आहेत. या कारखान्यांना कर्जासाठी शासनाने हमी दिलेली असताना तसेच कारखान्यांचे अधुनिकीकरण, विस्तारीकरण व को-जनरेशन घटक उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळत असतानाही वरील सहकारी साखर कारखाने तोट्यात का आहेत ? या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात सहकार मंत्र्यांनी असे सांगितले की, वर्ष २००३-०४ व २००४-०५ मध्ये दुष्काळ व उसावर झालेल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे उसाचे गाळप कमी झाले तर वर्ष २००६-०७ व २००७-०८ मध्ये मोठ्या प्रमाणात उसाचे गाळप होऊन साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले म्हणून साखर उद्योग अडचणीत आला. (*महाराष्ट्र विधानसभा, तिसरे अधिवेशन २००८, अतारांकित प्रश्नांची यादी क्रमांक: ३८८, प्रश्न क्र. ९१६२६*).

म्हणजे उसाचे गाळप कमी झाले तरी साखर कारखाने अडचणीत येतात आणि ते जास्त झाले तरी अडचणी असतात. तेवढेच नाही तर साखरेच्या निर्यातीसाठीही शासनालाच अनुदान द्यावे लागते. १९९९ साली तोट्यात असलेल्या १०७ साखर कारखान्यांचा मिळून तोटा रु. १०३१ कोटींचा होता. साखर कारखान्यांना दिलेली हमीची रक्कम रु. १००० कोटींहून अधिक आहे.

या साखर कारखान्यांमुळे राज्यातील विशिष्ट क्षेत्राचा विकास झाला तरी त्यामुळे अर्थव्यवस्था मात्र कोलमडून गेली आहे असा निष्कर्ष नियोजन आयोगाच्या राज्य विकास अहवालात काढण्यात आला आहे. शासनाने साखर कारखान्यांना दिले जाणारे अर्थसहाय्य बंद करावे व अर्थव्यवस्थेबरोबरच पर्यावरण व सिंचनावर ताण आणणाऱ्या ऊस उत्पादनास प्रोत्साहन देण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करावा अशी सूचना या अहवालात करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन: कॅगचे ताशेरे

- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार, सहकारी साखर कारखान्यांनी वर्ष अखेर होण्यापूर्वी प्रलंबित देणी देणे गरजेचे असते. परंतु २२ सहकारी साखर कारखान्यांचे वित्तिय परीक्षण केले असता असे आढळून आले की, वर्ष २००५-०६ या कालावधीत रु. २,६५८ कोटी ६५ लाखांची देणी प्रलंबित होती.
- सहकारी साखर कारखान्यांना आणि ऊस शेतकऱ्यांना विविध योजनांतर्गत राज्य शासनाने ३१, मार्च २००७ अखेर रु. २,५८९ कोटी ५ लाख इतके सहाय्य केले. याशिवाय केंद्र शासनाकडून सागरी वाहतूक, वाहतूक आकार, हाताळणी आकारासाठी, राखीव साठ्यासाठी, आधुनिकीकरणासाठी आणि ऊस उत्पादनाच्या विकासासाठी एकूण रु. ९८२ कोटी २३ लाखाचे वित्तीय सहाय्य मिळाले. राज्य व केंद्र शासनाचे भरघोस सहाय्य मिळूनही १३९ सहकारी साखर कारखान्यापैकी ११६ साखर कारखाने तोट्यात होते आणि त्यापैकी ७४ साखर कारखान्यांनी नकारार्थी मत्ता (Negative networth) नोंदविली होती असे आयुक्तांच्या माहितीवरून आढळून आले.
- महाराष्ट्र सहकारी आधिनियम कलम १०२ नुसार जेव्हा एखादा सहकारी साखर कारखाना काम करणे बंद करतो तेव्हा तो दिवाळखोरीत काढण्यात येतो. वर्ष १९९५ ते २००६ या कालावधीत ३१ सहकारी साखर कारखाने दिवाळखोरीत काढणे गरजेचे होते. महालेखापरीक्षकांनी छाननी केलेल्या ९ सहकारी साखर कारखान्यांपैकी –

    १) चार सहकारी साखर कारखाने दिवाळखोरी सिद्ध होऊन १० वर्षे उलटली तरी दिवाळखोरीत काढले नव्हते.

    २) पाच साखर कारखान्यांची यंत्र सामग्री वर्ष १९८०-८१ ते २००५-०६ (२५ वर्षे) पडून होती.

    ३) दिवाळखोरी प्रक्रियेतील दिरंगाईमुळे संजय सहकारी साखर कारखाना, धुळे यांच्याकडील रु.४२ कोटी ८३ लाख इतक्या किमतीची मालमत्ता राखण व पहाऱ्याअभावी चोरीस गेली.

    ४) दिवाळखोरी प्रक्रियेतील आठ सहकारी साखर कारखान्यांकडून शासनाला द्यायचे रु.८१ कोटी ६१ लाख प्रलंबित होते.

    ५) नागपूर विभागातील तीन सहकारी साखर कारखाने रु.१०७ कोटी ७८ लाखांच्या तोट्यात होते व बंद असताना सुद्धा दिवाळखोरीत आणले नव्हते.

    ६) ६१ सहकारी साखर कारखान्यांचे लेखापरीक्षण गेल्या १५ वर्षांच्या मर्यादेपर्यंत वेगवेगळ्या कालावधीकरिता थकित होते.

स्त्रोत: भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या वर्षाचा नागरी अहवाल

◆ ◆ ◆

दारिद्र्य व मानव विकास

''महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य असून त्याचा मानव विकास निर्देशांक बराच वरच्या पातळीवर आहे, अशी महाराष्ट्राची एकूण देशातील प्रतिमा असली तरी या राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे. याचाच अर्थ असा की महाराष्ट्रात वैभवाची व संपत्तीची काही बेटे असली तरी विषमता व विकासातील असमतोल हा या विकास कथेचाच एक भाग आहे. राज्याच्या नागरी भागात व ग्रामीण भागात दारिद्र्य आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दारिद्र्य हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनून राहिल्याने राज्यातील वाढती बेकारी, स्थलांतर, शहरात सतत वाढत जाणारी गर्दी, गरिबांचे कुपोषण व त्यामुळे मुलांचे मृत्यू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सारे प्रकार निर्माण झाले आहेत.''

– राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

दारिद्र्य

गेल्या १० वर्षात दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत १२ लाखांनी वाढ

राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण ३०.७ टक्के असून देशातील प्रमाणपेक्षा (२७.५), ते ३.२ टक्क्यांनी अधिक आहे. देशातील गरिबांपैकी १० टक्क्यांहून अधिक गरीब राज्यात आहेत. देशात दारिद्र्याच्या बाबतीत बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश पाठोपाठ महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो. १९९३-९४ मध्ये राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या ३ कोटी ५ लाख होती त्यात १० वर्षांमध्ये १२ लाखांची भर पडली व २००४-०५ मध्ये ही संख्या ३ कोटी १७ लाखांवर पोहोचली आहे. १९९३-९४ मध्ये महाराष्ट्र (३६.९ टक्के), तामिळनाडू (३५ टक्के) व पश्चिम बंगाल (३५.७ टक्के) या राज्यांमधील दारिद्र्याचे प्रमाण साधारण सारखेच होते. २००४-०५ पर्यंत उर्वरित दोन राज्यांनी हे प्रमाण ११ ते १२ टक्क्यांनी कमी करण्यात यश मिळविले. याच काळात महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण मात्र केवळ ६.२ टक्के एवढेच कमी झाले.

देशातील प्रमुख राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या (लाखात) व प्रमाण

तक्ता क्र. ८

राज्य	१९९३-९४		२००४-०५	
	संख्या	प्रमाण	संख्या	प्रमाण
आंध्र प्रदेश	१५४.०	२२.२	१२६.१	१५.८
बिहार	४९३.४	५५.०	३६९.२	४१.४
गुजरात	१०५.२	२४.२	९०.७	१६.८
कर्नाटक	१५६.५	३३.२	१३८.९	२५.०
केरळ	७६.४	२५.४	४९.६	१५.०
मध्य प्रदेश	२९८.५	४२.५	२४९.७	३८.३
महाराष्ट्र	३०५.२	३६.९	३१७.४	३०.७
पंजाब	२५.१	११.८	२१.६	०८.४
राजस्थान	१२८.५	२७.४	१३४.९	२२.१
तामिळनाडू	२०२.१	३५.०	१४५.६	२२.५
उत्तर प्रदेश	६०४.५	४०.९	५९०.०	३२.८
पश्चिम बंगाल	२५४.६	३५.७	२०८.४	२४.७
भारत	३२०३.७	३६.०	३०१७.२	२७.५

स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००८-०९

१९९३-९४ या वर्षी महाराष्ट्र (३६.९) व देशातील (३६.०) दारिद्र्याचे प्रमाण साधारणपणे सारखेच होते. महाराष्ट्रातील दारिद्र्य देशाच्या तुलनेत ०.९ टक्क्यांनी अधिक होते. २००४-०५ मध्ये मात्र नंतरच्या दहा वर्षात देशातील दारिद्र्यामध्ये ८.५ टक्क्यांनी घट झाली तर महाराष्ट्रातील दारिद्र्य मात्र ६.२ टक्क्यांनीच घटले. आज महाराष्ट्रातील दारिद्र्य देशाच्या तुलनेत ३.२ टक्क्यांनी अधिक आहे.

आर्थिक आघाडीवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील विषमता व विकासातील असमतोल

राज्याचे दरडोई उत्पन्न देशाच्या सरासरीपेक्षा किती तरी अधिक आहे. थेट विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात सर्वाधिक होत राहिली आहे. हे सारे खरे असले तरी राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या ताज्या पाहणीनुसार महाराष्ट्रातील दरिद्री लोकांचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे. दक्षिणेकडील केरळ, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील दारिद्र्य कमी करण्याचा वेग अतिशय मंद आहे. महाराष्ट्राच्या चांगल्या आर्थिक कमागिरीचे पर्यावसान राज्यातले दारिद्र्य कमी करण्यात झालेले नाही, हे यावरून स्पष्ट होते. गरीब माणसांवरील गुंतवणूक वाढवून त्यांना अधिक समृद्ध व समर्थ करण्यामुळे विकासातील त्यांचा सहभाग वाढतो. यालाच गरिबानुकूल विकासाची प्रक्रिया असे म्हणतात. दुर्दैवाने ही प्रक्रिया महाराष्ट्रात चालू नाही. १९९९-००च्या तुलनेत दरिद्री लोकांच्या संख्येतली वाढ एक कोटी पेक्षा अधिक आहे.

- राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

राज्यातील दारिद्र्याचा भस्मासूर

तक्ता क्र. ९

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या	अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	दारिद्र्यरेषेखाली कुटुंबांची संख्या
१.	ठाणे	२३३७८४	१८.	हिंगोली	६३६३३
२.	रायगड	१०९३१०	१९.	बीड	१०९८४८
३.	रत्नागिरी	१२२७२५	२०.	नांदेड	१४११८९
४	सिंधुदुर्ग	७१,७०९	२१.	उस्मानाबाद	९३३००
५.	नाशिक	२४८८०४	२२.	लातूर	९८१३६
६.	धुळे	१७००६०	२३.	बुलढाणा	१८६३९३
७.	नंदुरबार	१७४८१५	२४.	अकोला	११६१९३
८.	जळगांव	२६९५११	२५.	वाशिम	९०६१३
९.	अहमदनगर	१७८३६१	२६.	अमरावती	२१४८२८
१०.	पुणे	१२२१३२	२७.	यवतमाळ	२३२३०५
११.	सातारा	८५४५	२८.	वर्धा	९०३८९
१२.	सांगली	६८२०७	२९.	नागपूर	१२३७६०
१३.	सोलापूर	१६७०१८	३०.	भंडारा	११६०२५
१४	कोल्हापूर	९८६९६	३१.	गोंदिया	१४५४३७
१५.	औरंगाबाद	११०१९९	३२.	चंद्रपूर	१६९५६६
१६.	जालना	१०५१८८	३३.	गडचिरोली	११६१७६
१७.	परभणी	८२६५७			
				एकूण	४५,१९,७९०

स्रोत: राज्य नियोजन मंडळ

मानव विकास

केवळ उत्पन्नाच्या निकषावर प्रगती न तोलता मानवी जीवनाच्या विकासाने निकष, जसे शिक्षण, आरोग्य, रोजगार, दारिद्र्य या आधारे प्रगतीचे मूल्यमापन केल्यास प्रगतीचे अधिक परिपूर्ण चित्र उभे राहते. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाने विकसित केलेल्या अधिक समावेशक अशा सुधारित मानव गरिबी निर्देशांकानुसार महाराष्ट्र नवव्या स्थानावर तर केरळ पहिल्या स्थानावर आहे. पंजाब, तामिळनाडू, हरियाणा, आसाम, आंध्र प्रदेश, बिहार व कर्नाटक ही राज्येही केरळ पाठोपाठ महाराष्ट्रापुढे आहेत.

महाराष्ट्र व केरळ या राज्यांची निवडक निकषांवर तुलना

तक्ता क्र. १०

निकष	महाराष्ट्र	केरळ
महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण	६८	८८
पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण	८६	९४
ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण	७१	९०
शहरी भागातील साक्षरतेचे प्रमाण	८६	९३
ग्रामीण भागातील महिलांमधील साक्षरता	५९	८७
ग्रामीण भागातील पुरुषांमधील साक्षरता	८२	९०
शहरी भागातील महिलांमधील साक्षरता	७९	९१
शहरी भागातील पुरुषांमधील साक्षरता	८६	९३
गरीब-श्रीमंत दरीचा शाळेत दाखल होण्यावर होणारा परिणाम (प्रमाण)	२९	९
इयत्ता १ ली पास होणाऱ्या श्रीमंत घरातील मुलांचे प्रमाण	९८	१००
इयत्ता १ ली पास होणाऱ्या गरीब घरातील मुलांचे प्रमाण	५९	१००
अर्भक मृत्यू दर	४५	१५
बाल मृत्यू दर	४२	११
जन्माच्या वेळचे आयुर्मान	६८	७३

स्रोत: राज्य विकास अहवाल, नियोजन आयोग

केरळच्या विकासाची कारणे

मानव विकासाचा विचार करता महाराष्ट्र केरळच्या मागे पडलेला दिसतो. याची दोन कारणे असावित. पहिले म्हणजे महाराष्ट्र केरळच्या तुलनेत आपल्या स्थूल उत्पन्नापैकी कमी भाग आरोग्य व शिक्षणावर खर्च करतो. दुसरे असे की, केरळमधील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीच्या परिणामी तेथील महिला महाराष्ट्रातील महिलांपेक्षा अधिक सक्षम बनल्या आहेत. यामुळे एका बाजूला गरिबी, अर्भक मृत्यू दर यात कपात झाली आहे तर दुसऱ्या बाजूला आरोग्य व शिक्षणाच्या दर्जात सुधारणा झाली आहे. केरळ राज्याने महिला, गरीब व इतर वंचित घटकांना सामाजिक सुविधांचा लाभ मिळवून देण्यामध्ये प्रगती केलेली आहे.

पूर्वीच्या काळची मातृसत्ताक कुटुंब पद्धती, कम्युनिस्टांची राजवट यांनी भेदभावाविरोधात लढण्याची ताकद महिलांना दिली असावी तर उदरनिर्वाहासाठी पुरुषांचे मोठ्याप्रमाणात होत असलेले स्थलांतर यामुळे महिलांच्या खांद्यांवर जबाबदाऱ्या येऊन पडल्या. यामुळे घरदार व इतर कामकाजाकडे व मुलांच्या शिक्षणाकडे त्या अधिक लक्ष देऊ शकल्या, सततच्या गर्भारपणांमधून त्यांना मुक्तीही मिळाली. त्याचप्रमाणे केरळमध्ये महाराष्ट्राप्रमाणे विविधता नाही, पाणी टंचाई नाही, शहरी व ग्रामीण असा फरकही फारसा नाही. या सर्वच बाबींनी केरळच्या विकासाला हातभार लावला आहे.

- महाराष्ट्र राज्य विकास अहवाल, नियोजन आयोग

राज्यातील जिल्ह्यांची मानव विकास निर्देशांकानुसार व दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्नानुसार क्रमवारी

तक्ता क्र. ११

जिल्हा	मानव विकास निर्देशांक क्रमवारी	दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्न क्रमवारी	जिल्हा	मानव विकास निर्देशांक क्रमवारी	दरडोई जिल्हा स्थूल उत्पन्न क्रमवारी
मुंबई	२	१	परभणी	२४	२६
मुंबई उपनगर	१	२	हिंगोली	२५	२७
ठाणे	३	३	बीड	१८	२१
रायगड	६	४	नांदेड	२९	३१
रत्नागिरी	२२	२५	उस्मानाबाद	२८	३२
सिंधुदुर्ग	९	१०	लातूर	१९	२९
नाशिक	१३	८	बुलढाणा	२७	२८
धुळे	३०	३४	अकोला	२३	१८
नंदुरबार	३२	३५	वाशिम	३१	१९
जळगाव	१४	१७	अमरावती	१५	१४
अहमदनगर	११	२२	यवतमाळ	३४	३०
पुणे	४	६	वर्धा	१६	१६
सातारा	१०	२०	नागपूर	५	५
सांगली	७	९	भंडारा	२०	२३
सोलापूर	१७	१३	गोंदिया	२१	२४
कोल्हापूर	८	७	चंद्रपूर	२६	१२
औरंगाबाद	१२	११	गडचिरोली	३५	१५
जालना	३३	३३			

स्रोत : महाराष्ट्राचा राज्य विकास अहवाल

राज्याच्या महसुली विभागांसाठीचे मानव विकास निर्देशांक

तक्ता क्र. १२

विभाग	जन्मवेळचे आयुर्मान	प्रौढ साक्षरता दर	एकत्रित पटावरील विद्यार्थी संख्या	मानव विकास निर्देशांक
कोकण	७१.४	८०.८	७२.३	०.७२३
नाशिक	६८.९	६८.५	७१.१	०.६३८
पुणे	७३.०	७३.३	७५.६	०.६९६
औरंगाबाद	६८.५	६१.३	७३.६	०.६१३
अमरावती	६७.६	७३.५	७४.६	०.६३६
नागपूर	६५.५	७४.३	७७.६	०.६४६
महाराष्ट्र	६९.६	७२.९	७३.८	०.६७२

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००८-०९

महाराष्ट्र मानव विकास मिशनची अंमलबजावणी

महाराष्ट्र राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.५८ एवढा आहे. मुंबई व बृहन्मुंबईचा मानव विकास निर्देशांक सर्वाधिक १.०० एवढा असून चिरोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी ०.२१ एवढा आहे. राज्यातील १२ अति मागासलेल्या जिल्ह्यांचा (परभणी, हिंगोली, लना, उस्मानाबाद, नांदेड, नंदुरबार, धुळे, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली) विकास साधण्याकरिता दिनांक २९ जून २००६ रोजी राष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली. मिशनच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकाची सरासरी ०.३४ आहे. शनमध्ये सहभागी जिल्हे व त्यांचे निर्देशांक यावरून राज्यातील प्रादेशिक असमतोल स्पष्ट होतो. मिशनचा पहिला ३ वर्षांचा टप्पा जून २००९ मध्ये पूर्ण ला. या काळात बारा जिल्ह्यांतील एकूण मिळून २५ तालुक्यांमध्ये मिशनचे कामकाज सुरू होते.

शनच्या पहिल्या टप्प्यासाठी ठरविण्यात आलेली उद्दिष्टे व अंमलबजावणी

वर्ष २००६ ते ०९ या कालावधीमध्ये मिशनला १७५ कोटी रुपये प्राप्त झाले. त्यापैकी १६२ कोटी ७४ लाख रुपये (९३ टक्के) १२ जिल्ह्यांमध्ये खर्च करण्यात आले.

या १२ जिल्ह्यांतील अर्भक मृत्यूदराचे प्रमाण प्रति हजार २५ असेल असे उद्दिष्ट निश्चित केले होते. जानेवरी ते डिसेंबर २००७ या कालावधीत जन्म झालेल्या ५२,६५२ अर्भकांपैकी १,७५१ अर्भक मृत्यू पावले. हे प्रमाण प्रति हजारी ३३.२६ होते. तर जानेवारी ते डिसेंबर २००८ या काळात जन्म झालेल्या ५८,६४५ अर्भकांपैकी १,६२८ अर्भक मृत्यू पावले. हे प्रमाण प्रति हजारी २७.७६ होते.

मिशन अंतर्गत ५० टक्के संस्थात्मक प्रसुतीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. नोव्हेंबर २००६ ते एप्रिल २००९ या कालावधीत एकूण संस्थात्मक प्रसुती ३८५३ इतक्या झाल्यात त्यापैकी १५३१ (४० टक्के) प्रसुती आरोग्य संस्थांमध्ये झाल्या.

बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. नोव्हेंबर २००६ ते एप्रिल २००९ या कालावधीत मिशनला हे प्रमाण ४२.३० एवढेच कमी करता आले.

मिशन क्षेत्रातील इमारती नसलेल्या १,६१२ अंगणवाड्यांपैकी ७८० अंगणवाड्यांसाठी इमारती बांधण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. त्यापैकी ७४५ इमारती बांधून झाल्या तर ३५ इमारतींची कामे प्रगती पथावर आहेत.

मिशनच्या कार्यक्षेत्रातील स्वतंत्र इमारती नसलेल्या ८८ उपकेंद्रांपैकी ८० उपकेंद्रांसाठी स्वतंत्र इमारती बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. परंतु जून २००९ पर्यत केवळ २३ इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले होते.

मिशनने ३ वर्षांच्या कालावधीत ५,५५५ व्यक्तींना स्वयंरोजगाराकरिता चार ते आठ आठवड्याचे व्यवसाय प्रशिक्षण दिले. त्यापैकी १,३६३ व्यक्ती स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकल्या नाहीत.

मिशनने ३ वर्षांच्या कालावधीत ४० हजार दुधाळ जनावरे पुरवून प्रति दिन ४ लक्ष लीटर दुध डेअरीना पुरवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते. प्रत्यक्षात मात्र ८,५४३ लाभार्थ्यांना १२,१६७ जनावरे वितरित करण्यात आली व प्रति दिन ७८,३२३ लिटर दुधाचे उत्पादन झाले.

फलोद्यान कार्यक्रमांतर्गत ५० हजार हेक्टर जमीन लागवडीखाली आणण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. २००७ ते ०९ या दोन वर्षांत ११,११५ हेक्टर जमीन लागवडीखाली आली.

मिशनने आपल्या कार्यक्षेत्रात रब्बी पिकाखालील क्षेत्राची १ लाख हेक्टरने वाढ करण्याचे निश्चित केले होते. मात्र मिशनच्या कार्यक्षेत्रातील रब्बी पिकांखालील ३,०४,१०० हेक्टर क्षेत्र ९२,९३८ हेक्टरने घटून २,११,१६२ हेक्टर राहिले.

इयत्ता १ली ते ८ वीतील शाळाबाह्य मुला-मुलींची संख्या "0" वर आणण्याचे उद्दिष्ट मिशनअंतर्गत ठेवण्यात आले होते. ३ वर्षांच्या अखेरीस ८४५ मुले-मुली शाळाबाह्य होती.

मिशनअंतर्गत ४ लाख प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यासाठी ११,५३४ साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले. जुलै २००८ पर्यंत २,१८,५६५ व्यक्ती साक्षर झाल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यासंदर्भात फेरतपासणी झालेली नाही. कागदोपत्री अद्यापही १,८१,४३५ व्यक्ती निरक्षर आहेत.

♦ ♦ ♦

शालेय शिक्षण, आरोग्य आणि रोजगार

शिक्षण, आरोग्य व रोजगार ही मानव विकासाची त्रिसूत्री आहे. या क्षेत्रांवर राज्याने केलेला खर्च ही गुंतवणूक मानली जावयास हवी. ही गुंतवणूक ...वढी अधिक व सकस असेल तेवढे भवितव्य उज्ज्वल असणार आहे. या आधीच्या प्रकरणात पाहिलेले केरळचे उदाहरण याची साक्ष देते.

शालेय शिक्षण

"महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत सामाजिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक ...याभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो त्याच गतीने सामाजिक पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करणे क्रमप्राप्त ठरते.

२१वे शतक हे ज्ञान युग राहणार असून या युगात मानव जातीस भेडसावणाऱ्या समस्यांना पूर्ण समर्थपणे तोंड देऊन मानव जातीचा विकास करण्यास ...क्षम असणारी भावी पिढी घडविण्याचे महत्त्वाचे कार्य आगामी काळात करावे लागणार आहे. शिक्षणावरील खर्च हा खर्च न समजता गुंतवणूक समजून ...ही गुंतवणूक शिक्षणाच्या कोणत्या क्षेत्रात करणे आवश्यक आहे याचा विचार झाला पाहिजे."

- राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

राज्य अर्थसंकल्पातील शालेय शिक्षण विभागाचे स्थान

...लेख क्र. ७



...त : खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमांच्या आधारे)

शालेय शिक्षण विभागावर गेल्या १० वर्षात झालेला खर्च पाहता मात्र शासन त्यास गुंतवणूक मानत नसल्याचे स्पष्ट होते. १९९८-९९ या वर्षी ...क्षणावर अर्थसंकल्पाच्या तुलनेत २०.५७ टक्के एवढा खर्च झाला होता. त्यानंतरच्या ६-७ वर्षात शिक्षण विभागावरील खर्चाचे हे प्रमाण घसरत गेले. ...००७-०८ पासून पुन्हा हे प्रमाण किंचित वाढलेले दिसले तरी १९९८-९९च्या तुलनेत ते अतिशय कमी आहे.

...मान समान कार्यक्रम – उद्दिष्ट व साध्य

वर्ष २००० मध्ये सत्तेवर आल्यानंतर लोकशाही आघाडी शासनाने किमान समान कार्यक्रम जाहीर केला होता. राज्य स्थूल उत्पन्नाच्या ७ टक्के ...क्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५ टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च होईल असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र किमान ...मान कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पहिल्या वर्षापासून आजवर कधीही हे आश्वासन प्रत्यक्षात उतरलेले नाही. किंबहुना राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत ...क्षणावर होणाऱ्या खर्चाचे २०००-०१ मधील ३.६९ टक्के हे प्रमाण वर्षागणीक कमी होत होत २००८-०९ मध्ये २.०८ टक्के एवढे कमी झाले ...हे. त्याचप्रमाणे एकूण शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाणही ४४ ते ५३ टक्क्यांच्या दरम्यान राहिले आहे.

सर्वसाधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावरील खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी प्रमाण

आलेख क्र. ८



स्त्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा, संक्षिप्त अर्थसंकल्प

टीप : वर्ष २००८-०९ चे सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज दर्शवितात.

सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी

केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्व शिक्षा अभियानाच्या स्वरूपात कालबद्ध कृति कार्यक्रम जाहीर केला आहे. २०१० पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट अभियानांतर्गत ठेवण्यात आले आहे. २०१० साली सर्व मुलांचे ८ वर्षांचे शा... शिक्षण पूर्ण होण्यासाठी २००३ सालीच सर्व मुले शाळेत जाणे आवश्यक होते. सर्व शिक्षा अभियानाचा राज्यात बोजवारा उडाल्याचे स्पष्ट...

शाळाबाह्य मुले

शासनाने शाळाबाह्य मुलांचे आव्हान कधीही स्वीकारले नाही. राज्यात शाळाबाह्य मुले नाहीतच किंवा त्यांची संख्या कशी कमी आहे हे दाखविण्याकडेच शासनाचा कल राहिला. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने शाळाबाह्य मुलांच्या दरवर्षी सादर केलेल्या आकड्यांमध्ये दिस... अगम्य चढउतारांवरून हे स्पष्ट आहे.

तक्ता क्र. १३

वर्ष	शाळाबाह्य मुलांची संख्या
२००२-०३	१५,७८,८६३
२००३-०४	५,२४,६८७
२००४-०५	२,२९,२२४
२००५-०६	४,२८,७९८
२००६-०७	१,७१,२५५
२००७-०८*	९६,८२१
२००७-०८**	१,१७,०७७

स्त्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

एक शिक्षकी शाळा

राज्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांचे सरासरी गुणोत्तर ३३ असून ते राष्ट्रीय (३८) व इतर अनेक राज्यांतील सरासरी गुणोत्तरांपेक्षा अधिक आहे. असे असले तरी अजूनही राज्यात ४,३०३ शाळा एकशिक्षकी आहेत. गंभीर बाब अशी की यापैकी सर्वाधिक शाळा आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये आहेत. ठाणे (७८०), गडचिरोली (३०८), नाशिक (२८७), नंदुरबार (१८९) येथील एक शिक्षकी शाळांची संख्या लक्षणीय आहे. दोन वर्षातच प्रत्येक शाळेसाठी किमान एक शिक्षक देण्याचे आश्वासन किमान समान कार्यक्रमात २००० साली देण्यात आले होते. मात्र त्यावर कोणतीही अंमलबजावणी झाली नसल्याचे स्पष्ट आहे.

तक्ता क्र. १४

जिल्हा	एकूण शाळा	एक शिक्षकी शाळा	जिल्हा	एकूण शाळा	एक शिक्षकी शाळा
नंदुरबार	१६०८	१८९(११.७५)	औरंगाबाद	२२२१	४६(२.०७)
धुळे	१६३६	४९(३.००)	नाशिक	४२९१	२८७(६.६९)
जळगाव	२७५६	४२(१.५२)	ठाणे	६०३२	७८०(१२.९३)
बुलढाणा	२००१	५९(२.९५)	बृहन्मुंबई	२२५४	३७(१.६४)
अकोला	१५२५	४९(३.२१)	मुंबई	१३७०	०(०)
वाशिम	१११६	३८(३.४१)	रायगड	३२३५	१९३(५.९७)
अमरावती	२५१०	१२०(४.७८)	पुणे	५६०४	३०७(५.४८)
वर्धा	१३१७	६३(४.७८)	अहमदनगर	४२५४	१२९(३.०३)
नागपूर	३२८४	७८(२.३८)	बीड	२५९६	१५२(५.८६)
भंडारा	११८३	४७(३.९७)	लातूर	२०४८	२०(०.९८)
गोंदिया	१२५०	२७(२.१६)	उस्मानाबाद	१४५०	३०(२.०७)
गडचिरोली	१६८२	३०८(१८.३१)	सोलापूर	३८३२	१४४(३.७६)
चंद्रपूर	२२००	४२(१.९१)	सातारा	३३३६	१३६(४.०८)
यवतमाळ	२६९२	१३३(४.९४)	रत्नागिरी	३१४२	११८(३.७६)
नांदेड	२७९८	८०(२.८६)	सिंधुदुर्ग	१६९८	२३५(१३.८४)
हिंगोली	९७९	२४(२.४५)	कोल्हापूर	२९५६	१०३(३.४८)
परभणी	१३६३	४४(३.२३)	सांगली	२४५२	१२४(५.०६)
जालना	१५८३	७०(४.४२)	एकूण	८६२५४	४३०३(४.९८)

स्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

भंडारा जिल्ह्यातील ३३ माध्यमिक शाळांपैकी १२ शाळांमधील मुख्याध्यापक, एका शाळेतील उपमुख्याध्यापक, ७ शाळांमधील पर्यवेक्षक पदे रिक्त असल्याची बाब डिसेंबर २००७ मध्ये निदर्शनास आली होती. शालेय शिक्षण मंत्र्यांनी दिनांक ९ जुलै २००८ रोजी म्हणजे तब्बल ७ महिन्यांनी उत्तर दिले तेव्हा मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू होती. पर्यवेक्षकांच्या पदांबाबत मंत्र्यांनी मौन बाळगले.

विधान परिषद २००८, अतारांकित प्रश्नांची तिसरी यादी, प्रश्न क्र. ४१७१८

वर्गखोल्यांचा अनुशेष

सर्व शिक्षा अभियानाने राज्य शासनाचा बांधकामांवरील खर्चाचा मोठा भार हलका केला होता. गेल्या १० वर्षांमध्ये खरे तर वर्गखोल्यांचा अ[illegible] टप्प्याटप्प्यात कमी करणे सहजच शक्य होते. मात्र शासनाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अद्यापही राज्यात २२,८२३ वर्गखोल्यांची आवश्[illegible] आहे. या आकड्याच्या विश्वासार्हतेबद्दलही काहीशी शंका आहे. एप्रिल २००७ मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिलेल्या माहितीनुसा[illegible] २००६-०७ मध्ये राज्यात ६१,९२४ वर्गखोल्यांचा अनुशेष होता. त्यानंतर फेब्रुवारी, २००९ मध्ये परिषदेने दिलेल्या माहितीनुसार सप्टेंबर, [illegible] अखेर २२,८२३ वर्गखोल्यांचा अनुशेष कायम होता. याचा अर्थ वर्ष २००७ मध्ये ३९,१०१ वर्गखोल्या बांधण्यात आल्या. सर्व शिक्षा अभियान[illegible] २००६-०७ व २००७-०८ मध्ये अनुक्रमे १४,४४९ व ३,०६६ वर्गखोल्यांच्या बांधकामाला मंजुरी घेतली असताना ३९,१०१ वर्ग[illegible] बांधल्या गेल्या असण्याबाबत साशंकता आहे.

जिल्हावार वर्गखोल्यांची कमतरता

तक्ता क्र. १५

जिल्हा	आवश्यक वर्गखोल्या २ एप्रिल, २००७	आवश्यक वर्गखोल्या ३० सप्टेंबर, २००७	जिल्हा	आवश्यक वर्गखोल्या २ एप्रिल, २००७	आवश्यक वर्गखोल्या ३० सप्टेंबर, २००७
नंदुरबार	७११	३९५	औरंगाबाद	२,१२२	६८०
धुळे	६०३	१९९	नाशिक	२,३७३	९०५
जळगांव	२,११३	३४४	ठाणे	४,१४८	२२०६
बुलढाणा	२,००१	४०९	मुंबई मनपा	६,०३५	३६९६
अकोला	१,४५७	३८०	बृहन्मुंबई	८५०	०
वाशिम	१,०९०	३७०	रायगड	२,३७४	११९६
अमरावती	१,८८४	४५८	पुणे	२,८५६	११९५
वर्धा	१,२७५	३८५	अहमदनगर	२,०५९	५४०
नागपूर	२,६५९	५००	बीड	१,९१७	६१९
भंडारा	८४५	१९९	लातूर	१,३२५	१९८
गोंदिया	१,२१६	३७८	उस्मानाबाद	९०७	२४१
गडचिरोली	१,०९६	४१६	सोलापूर	१,६१३	५५६
चंद्रपूर	१,३२५	३०३	सातारा	१,२९६	५२१
यवतमाळ	२,२७८	६९४	रत्नागिरी	१,६०३	१२५९
नांदेड	२,३२९	७९५	सिंधुदुर्ग	६४९	६०१
हिंगोली	१,००४	३४२	कोल्हापूर	१,७७७	५४०
परभणी	१,५६८	४५१	सांगली	१,३८३	३१४
जालना	१,१८३	५३८	एकूण	६१,९२४	२२,८२३

स्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

गळती

''समाजाच्या विविध स्तरामध्ये गळतीच्या प्रमाणात प्रचंड तफावत आहे. इयत्ता ५ वी पर्यंत अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण ७.५९ टक्के असून अनुसूचित जमातीचे हेच प्रमाण ३८.३८ टक्के इतके आहे. वरील वर्गात जाऊ तसतसे गळतीच्या प्रमाणातील तफावत वाढत जाते. इयत्ता १०वीला अनुसूचित जातीतील गळतीचे प्रमाण ५३.५९ टक्के तर अनुसूचित जमातीचे प्रमाण ७६.१८ टक्के इतके प्रचंड आहे. हे प्रमाण महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याला शोभणारे नाही. खऱ्या सामाजिक न्यायाची सुरुवात शिक्षणातील तफावत दूर करूनच व्हावयास हवी. प्राथमिक शिक्षण स्तरावरच भेदभाव व तफावत राहिल्यास तोच भेदभाव पुढे समाजामध्ये प्रतिबिंबित होतो. अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी शिक्षणामध्ये गुंतवणूक करण्याशिवाय पर्याय नाही.''

तक्ता क्र. १६

इयत्ता	गळतीचे प्रमाण		
	सर्वसाधारण	अनु. जमाती	अनु. जाती
पाचवी	१३.५	३८.३८	१७.५९
आठवी	२२.८	६१.६१	३३.९८
दहावी	५२.५	७६.१८	५३.५९

स्त्रोत : राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

माध्यमिक वर्गांची अनुपलब्धता

राज्यात प्राथमिक म्हणजे १ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या ४१,७६४ आहे. ७वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या ६,६६७ आहे. तर माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या केवळ १८,८४१ आहे. वाढत्या इयत्तागणिक कमी होत जाणाऱ्या शाळांची संख्या पाहता पुढील वर्ग उपलब्ध नसणे हे गळतीचे महत्त्वाचे कारण आहे यात शंका नाही.

इयत्ता १ली ते ४ थी या चार इयत्तांची एकूण ८३,८२,१३० विद्यार्थी संख्या व इयत्ता ५वी ते ८वी या चार इयत्तांची एकूण ७३,७३,९४३ विद्यार्थी संख्या पाहता प्राथमिक स्तरावरून माध्यमिक स्तरावर जाताना होणारी विद्यार्थ्यांची गळती (१०,०८,१८७) स्पष्ट होते.

माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेची आवश्यकता

''माध्यमिक शिक्षण क्षेत्रामध्ये शैक्षणिक व भौतिक सुविधा निर्माण कराव्या लागतील. ८वी ते १०वी या स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून व्यवसाय शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश करून रोजगार व स्वयंरोजगाराचे अनेक पर्याय उपलब्ध करून देण्याची क्षमता असणारे अभ्यासक्रम उपलब्ध करून द्यावेत. माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देणे कालानुरूप ठरणार आहे. माध्यमिक स्तरावरून गळती होणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाची संधी त्याच स्तरावर दिल्यास हे विद्यार्थी स्वयंरोजगाराद्वारे उदरनिर्वाह करून राज्याच्या उत्पन्नामध्ये भर घालू शकतील. माध्यमिक स्तरावर अधिकाधिक विषयांची पुनर्रचना करून या स्तरावर अधिकाधिक विषय वैकल्पिक स्वरूपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत. अनिवार्य विषयांची संख्या मर्यादित ठेवून स्वयंरोजगारासाठी उपयुक्त नसलेले विषय टाळून व्यवसायिक अभ्यासक्रम देणाऱ्या विषयांमार्फत आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येतील.''

- राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात पंचायती राज समितीचे ताशेरे

जिल्हा परिषद, परभणी

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्य पुरवठा या योजनेंतर्गत जिल्हा परिषद , परभणी यांना दि. १८ ऑगस्ट २००२ रोजी (शाळा सुरू झाल्यापासून साधारण २ महिन्यांनी) ५० टक्के अर्थसंकल्पीय तरतूद प्राप्त झाली. दि. १६ सप्टेंबर २००२ रोजी (तरतूद प्राप्त झाल्यानंतर साधारण महिन्याभराने) शिक्षण उपसंचालक यांच्याकडून सदर रक्कम पुढील आदेश येईपर्यंत खर्च करू नये असे सांगण्यात आले.

- दिनांक ६ मार्च २००३ रोजी (शालेय वर्षाच्या अखेरीस) जिल्हा परिषदेला उर्वरित ५० टक्के रक्कम देऊन सदर रक्कम खर्च क
प्रशासकीय मान्यता देण्यात आली. परिणामी विद्यार्थ्यांना गणवेशापासून वंचित राहावे लागले.

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

पोरा, ता. वाशी येथील जिल्हा परिषद शाळेस भेट दिली असता.

- शाळेतील मुलांच्या अभ्यासाचा दर्जा खालावलेला होता.
- शाळेमध्ये मुलांना पिण्याचे पाणी उपलब्ध नव्हते.
- शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तीन आठवडे धान्य पुरवठा झालेला नव्हता.
- शाळेतील सर्व मुलांना गणवेशाचे व लेखन साहित्याचे वाटप झाले नव्हते.
- उस्मानाबाद जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या व्यस्त दिनचर्येमुळे शिक्षक भरतीच्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळ न मिळाल्यामुळे परिषदेतील माध्यमिक शिक्षकांच्या ३९ जागा रिक्त होत्या.
- उस्मानाबाद जिल्हा परिषदेला शिक्षण संचालक, उच्च व माध्यमिक शिक्षण यांच्याकडून ३ लाख ५६ हजार एवढी रक्कम संगणक खरेदी करा दिली असताना देखील जिल्हा परिषदेने संगणकाची खरेदी केली नव्हती.

२००२-०८ या काळात सर्व शिक्षा अभियानाची मंजूर योजना, प्राप्त निधी व खर्च

तक्ता क्र. १७

(रु. लाखात)

मंजूर योजना	४८१५४२.१६
केंद्राचा अपेक्षित हिस्सा	३३९१७७.६०
राज्याचा अपेक्षित हिस्सा	१४२३६४.५५
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला प्राप्त रक्कम	३४३२५५.३८
केंद्राकडून प्राप्त रक्कम	२१९६३९.९२
राज्याकडून प्राप्त रक्कम	८२३३६.८२
मागील वर्षाची शिल्लक	४१२७८.६४
एकूण खर्च	३०२९०३.५६
केंद्राकडून प्राप्त रकमेची अपेक्षित हिश्शाशी टक्केवारी	६४.७६
राज्याकडून प्राप्त रकमेची अपेक्षित हिश्शाशी टक्केवारी	५७.८४
एकूण प्राप्त रकमेची मंजूर योजनेशी टक्केवारी	७१.२८
खर्चाची प्राप्त रकमेशी टक्केवारी	८८.२४
खर्चाची मंजूर योजनेशी टक्केवारी	६२.९०

(स्रोत : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती)

सर्व शिक्षा अभियान म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र शासनाने राज्यास देऊ केलेली अधिकची मदत प्राप्त निधी पूर्ण खर्च न झाल्यामुळे केंद्र शासनाकडून अपेक्षित निधी प्राप्त होऊ शकला नाही. २००२ ते २००८ या ६ वर्षात मंजूर योजनेच्या ६२.९ टक्के खर्च झाला.

ल्हा परिषद शाळांमध्ये पायाभूत सुविधांची वानवा

२००२-०८ या कालावधीत राज्य शासनाने स्वत: खर्च केलेल्या रु. २९ हजार १९६ कोटी १५ लाखांव्यतिरिक्तही सुमारे रु. ३ हजार कोटी र्व शिक्षा अभियानातून प्राथमिक शिक्षणावर खर्च केले. स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाल्यानंतर किमान पायाभूत सुविधा तरी शाळांमधून उपलब्ध असणे क्षित होते. मात्र राज्यातील हजारो शाळांमध्ये पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह एवढेच कशाला साधा फळाही उपलब्ध नसावा ही बाब लाजिरवाणी आहे.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण ५५ हजार १७० प्राथमिक शाळांपैकी ९ हजार ४०९ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.

- विधान परिषद २००८, अतारांकित प्रश्नांची यादी क्र. २७, प्रश्न क्र. ४२०८८

राज्यातील ७६ हजार ४०७ शाळांपैकी ३३ हजार ४०२ शाळांना भिंतीचे कुंपण नाही. २४ हजार ३३० शाळांना खेळाचे मैदान नाही. ४३ हजार १८७ शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत. १४ हजार ८३५ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. तर ३ हजार ६८० शाळांमध्ये साधा फळाही नाही, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नोंदविलेली ही विदारक परिस्थिती शिक्षण मंत्र्यांनी मान्य केली आहे.

- विधान सभा २००८, अतारांकित प्रश्नांची ३७४ वी यादी, प्रश्न क्र. १८४०८

सार्वजनिक आरोग्य

"सर्वसाधारण भारतीय नागरिकाचे आयुर्मान वाढले असले तरी नागरिकांच्या निरामयतेत अजून फारसा फरक पडलेला नाही. शहरी व ग्रामीण भागात लब्ध असलेल्या आरोग्य सेवा सुविधात अजून बरीच तफावत आहे. शहरी भागात सुद्धा लक्षणीय तफावत दिसून येते. आरोग्य सेवेचा दर्जा सुधारणे, लोकांच्या रोग्य रक्षणासाठी वेळेवर उचित उपाययोजना करणे व एकूण यंत्रणा अधिक लोकाभिमुख, जबाबदार व पारदर्शक बनविणे महाराष्ट्रासारख्या राज्याला अवघड नये."

- राज्य नियोजन मंडळ

राज्य नियोजन मंडळाच्या अहवालातील वरील वाक्ये राज्यातील सार्वजनिक आरोग्यविषयक परिस्थिती स्पष्ट करण्यास पुरेशी आहेत. सार्वजनिक रोग्य ही कधीही राज्य शासनाची प्राथमिकता राहिली नाही. १९९१ च्या जनगणनेनुसार आवश्यक आरोग्य सुविधांचा अनुशेष अद्याप कायम असावा हे व अपयश आहे. वर्ष २००८-०९ चा अर्थसंकल्प जाहीर करताना वित्तमंत्र्यांनी आरोग्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी रु. ६३९ कोटींची तरतूद ल्याचे सांगितले होते. २००९-१० या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना पुन्हा एकदा वित्तमंत्र्यांनी आरोग्य क्षेत्राचा अनुशेष दूर करण्यासाठी रु.८०७ टी ५१ लाख एवढी तरतूद करत असल्याचे जाहीर केले. याचा सरळ अर्थ असा की आरोग्य क्षेत्रासाठी २००८-०९ मध्ये केलेली तरतूद शासनाने त्र वळविली होती. शासन दरबारी सार्वजनिक आरोग्यास किती महत्त्व आहे हे यावरून स्पष्ट होते.

राज्य अर्थसंकल्पातील आरोग्य विभागाचे स्थान

लेख क्र. ९



: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमांच्या आधारे), वित्तविषयक विवरण पत्र
: वर्ष २००८-०९ सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

आलेख क्र. १०

राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत आरोग्य विभागावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण



स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमांच्या आधारे), संक्षिप्त अर्थसंकल्प

टीप : वर्ष २००८-०९ सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

दहा वर्षापूर्वी आघाडी शासनाने सत्तेवर येताच जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमामध्ये 'सर्वांसाठी प्राथमिक आरोग्य सुविधा' हे धोरण कार्यवाहीत आणण्याचे व त्यासाठी राज्य स्थूल उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम राखून ठेवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र एकाही वर्षी आरोग्यासाठी भरीव तरतूद केली गेली नाही. वरील दोनही आलेखांवरून आरोग्य विभागासाठी करण्यात आलेल्या तरतुदी अत्यल्प असल्याचे स्पष्ट होते.

आरोग्य विभागातील रिक्त पदांची समस्या

शासनाने राज्यातील जनतेला रोगावरील प्रतिबंधक उपाय व रोगोपचार या दोन महत्त्वाच्या मार्गाने आरोग्य सुविधा देणे अपेक्षित आहे. कोणत्याही सेवा क्षेत्राची मदार ही कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते. मात्र आरोग्य विभागातील विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावरील रिक्त असलेली पदे पाहिल्यास विभागाकडून मिळणाऱ्या सेवेवर याचा परिणाम होतो याबाबत शंका नाही.

तक्ता क्र. १८

नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील रिक्त पदे

अक्र	बाबी	एकूण पदे	रिक्त पदे
१	वैद्यकीय अधिकारी वर्ग २ आणि ३	८३०	७६
२	आरोग्य सहाय्यक पुरुष	५६८	५९
३	आरोग्य सहाय्यक स्त्री	६५३	८६
४	बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी पुरुष	२१४५	१४३
५	बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी स्त्री	२४९६	६८
६	वाहन चालक	४३७	७०
७	मानसेवी वैद्यकीय अधिकारी	१७२	८
८	पाडा स्वयंसेवक	११४८२	६५८
	एकूण	१८७८३	११६८

स्रोत : आरोग्यसेवा संचालनालय, मुंबई यांचा (एप्रिल २००९ अखेरपर्यंतचा) अहवाल

आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत विविध संवर्गातील पदांची सद्यस्थिती

…क्र. १९

संवर्ग	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
…राष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१)	१४३६	६००	८३६
…राष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा श्रेणी अ- ज्युनिअर	७२८१	६५६६	७१५
सामान्य राज्य सेवा - श्रेणी अ व ब	५१३	२३७	२७६
आरोग्य सहाय्यक (पुरुष)			
जिल्हास्तरीय	२८७८	२०३५	८४३
राज्यस्तरीय	१७२२	१४९८	२२४
एकूण	४६००	३५३३	१०६७
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष)			
जिल्हास्तरीय	६८५०	६०११	८३९
राज्यस्तरीय	५३६०	३८८३	१४७७
एकूण	१२२१०	९८९४	२३१६
आरोग्य सहाय्यक (स्त्री)	२२६६	२०३२	२४३
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री)	१२३९५	११९०४	४९१
एकूण पाडा स्वयंसेवक	११४८२	१०८५३	६२९
त्यापैकी स्त्री पाडा स्वयंसेवक	९९४६		
एन.आर.एच.एम.अंतर्गत (कंत्राटीपध्दतीने) भरलेली पदे*			
अतिरिक्त बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री)	८९३६	४१६८	४७६८
प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी परिचारिका	१२९४	६५४	६४०
आरोग्य सहाय्यक (स्त्री)	१७९९	११६१	६३८
आर.सी.एच. २ अंतर्गत पदे**			
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री)	१०१५	८५५	१६०
एकूण	८२,०३७	६५,८८४	१६,१६२

…: आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांचा (एप्रिल २००९ अखेर पर्यंतचा) अहवाल.

… राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत. ** कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत.*

…आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत येणाऱ्या मंजूर पदांपैकी १९.७ टक्के पदे रिक्त आहेत. तसेच केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण अभियानांतर्गतही …तील ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त आहेत.

शुश्रुषा विभागांतर्गत संवर्गनिहाय रिक्त पदे

तक्ता क्र. २०

अक्र	पदाचे नाव	मंजूर पदे	रिक्त पदे
१	अधिसेविका	३०	१३
२	सहाय्यक अधिसेविकास	११५	७३
३	पाठ्यनिर्देशिका	१९१	४८
४	सार्वजनिक आरोग्य परिचारिका	२६६	४७
५	बालरुग्ण तज्ज्ञ परिचारिका	७९	२६
६	मनोरुग्ण तज्ज्ञ परिचारिका	१३६	४८
७	सा.आ.परिचारिका (निर्देशिका)	११	०१
	एकूण	८२८	२५६

स्रोत : आरोग्यसेवा संचालनालय, मुंबई यांचा (एप्रिल २००९ अखेरपर्यंतचा) अहवाल

राज्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमधील रिक्त पदे

तक्ता क्र. २१

अक्र	संवर्ग	मंजूर पदे	रिक्त पदे
१	गट - अ	१४	९
२	गट - ब	५६	२१
३	गट - क	३००	१५
४	गट - ड	१२२	७
	एकूण	४९२	५२

स्रोत : आरोग्यसेवा संचालनालय, मुंबई यांचा (एप्रिल २००८ अखेरपर्यंतचा) अहवाल

प्लेग नियंत्रण पथकातील वर्ग -४ ची रिक्त पदे

तक्ता क्र. २२

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	रिक्त पदे
१	प्रयोगशाळा परिचर	२	२
२	मजदूर	८	२
३	शिपाई	१	०
४	वाहन स्वच्छक	१	०
	एकूण	८	४

संदर्भ - कार्यक्रम अंदाजपत्रक - २००९-२०१०

नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकांमधील रिक्त पदे

तक्ता क्र. २३

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	रिक्त पदे
१	वैद्यकीय अधिकारी	१०९	५९
२	पी.एच.एन/एल.एच.व्ही	१०२	६३
३	ए.एन.एम/एन.एम/एस.एम	४७५	२६८
४	लिपिक	८३	३२
५	शिपाई	८४	३९
६	लिंक वर्क	१८७५	१५२५
७	कार्यक्रम व्यवस्थापक	२०	१३
८	अकाउंटट	२०	८
९	डाटा एन्ट्री ऑपरेटर	२०	६
	एकूण	२७८८	२०१३

मंजूर आरोग्य संस्था व त्यांची बांधकाम स्थिती

तक्ता क्र. २४

आरोग्य संस्था	मंजूर संस्था	बांधकाम पूर्ण	बांधकाम प्रगतीपथावर	बांधकाम सुरू न झालेल्या
उपकेंद्र	१०,५७९	७,४४२	६५०	२,४८७
प्राथ. आरोग्य केंद्र	१,८१६	१,५१८	१३७	१६१
ग्रामीण रुग्णालय	३६५	२४४	३०	९१

स्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २००९-१०

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये वरील माहिती देण्यात आली आहे. मंजूर आरोग्य संस्थांची संख्या ही १९९१ च्या जनगणनेच्या निकषावर आधारित आहे. आज १८ वर्षानंतरही तेव्हा आवश्यक असलेल्या आरोग्य संस्था शासनास बांधता आलेल्या नाहीत हे फारच काजिरवाणे आहे.

मंजूर १०,५७९ उपकेंद्रांपैकी ३१३७ उपकेंद्रांचे (३० टक्के) बांधकाम प्रगतीपथावर आहे किंवा अद्याप सुरूच झालेले नाही. १८१६ मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी २९८ (१६ टक्के) आरोग्य केंद्रांबाबतही अशीच स्थिती आहे. मंजूर ३६५ पैकी १२१ (३३ टक्के) ग्रामीण रुग्णालयेही कार्यरत नाहीत. एकूणात १९९१ च्या जनगणनेवर आधारित मंजूर केलेल्या आरोग्यसंस्थांपैकी २८ टक्के संस्थांचे बांधकामच २००९ पर्यंत पूर्ण नाही. ज्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे त्यांचा दर्जा हा तर स्वतंत्र विषय आहे.

राज्यातील खालावलेल्या आरोग्य सुविधांसंदर्भात विधिमंडळ प्रश्नोत्तरांमधून मिळालेली माहिती

- परभणी जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व इतर विविध संवर्गातील रिक्त जागा भरण्यासंदर्भात सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नाही. (अतारांकित प्रश्न क्र. ४४१८७, पहिली यादी, विधान परिषद, पहिले अधिवेशन २००९)
- राज्यात मुंबई, ठाणे, रायगड व रत्नागिरी या जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी खरेदी केलेल्या रुपये १ कोटी १३ हजार एवढ्या रकमेच्या क्लोरीनच्या गोळ्या प्रत्यक्षात पूर आल्यानंतर १५ ते ८८ दिवसांनी वाटण्यात आल्यामुळे जनतेला पाणी स्वच्छ करणाऱ्या साधनांपासून वंचित राहावे लागले. (अतारांकित प्रश्न क्र.८१९४०, ३९५ वी यादी, विधान सभा, तिसरे अधिवेशन २००८)
- चंद्रपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सुविधांचा अभाव असून जिल्ह्यातील २९ उपकेंद्रे विना इमारत असून वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची अनेक पदे एप्रिल २००८ पर्यंत रिक्त होती. (अतारांकित प्रश्न क्र. ९२२६७, ३९५ वी यादी, विधान सभा, तिसरे अधिवेशन २००८)
- सन २००७-२००८ या वर्षी मार्च २००८ अखेर पर्यंत राज्यातील एकूण १०५८ आश्रमशाळांमधील ५,७१,३८१ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १,१०,५४५ इतके विद्यार्थी आजारी असल्याचे आढळून आले. (अतारांकित प्रश्न क्र. ९४६३५,३९५ वी यादी, विधान सभा, तिसरे अधिवेशन, २००८)
- सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात २५ पदे निर्माण करण्यात आली असून जून २००८ अखेर पर्यंत १३ पदे भरलेली होती. रिक्त असलेल्या १२ पदांपैकी इमारत पूर्ण नसल्याने १ वैद्यकीय अधिकारी, ३ अधिपरिचारिका, १ कनिष्ठ लिपिक व १ क्ष-किरणतज्ज्ञ अशी एकूण ६ पदे भरण्यात आली नाहीत.(अतारांकित प्रश्न क्र.९८१९७, ३९५ वी यादी, विधानसभा, तिसरे अधिवेशन, २००८)
- नागपूर जिल्ह्यातील अनेक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व परिचारीकांची पदे मे २००८ पर्यंत रिक्त होती.(अतारांकित प्रश्न क्र. ९३४५२, ३९६ वी यादी, विधानसभा, पहिले अधिवेशन २००९)
- जातेगांव (ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वाघोला येथे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या गोवराची लस देण्याच्या कार्यक्रमांतर्गत गोवराची लस दिलेल्या ४ बालकांचा दिनांक २७ सप्टेंबर, २००८ रोजी मृत्यू झाला.(तारांकित प्रश्न क्र.४८३०६, दिनांक १६ डिसेंबर २००८, विधान परिषद)
- नाशिक जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांची संख्या अल्प प्रमाणात असून आणखी ४२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३८५ उपकेंद्रांची आवश्यकता आहे. (तारांकित प्रश्न क्र.४७०३१, दि.१६ डिसेंबर २००८, विधान परिषद)

आरोग्य विभागांतर्गत रिक्त पदे, आरोग्य संस्थांचा अनुशेष व तुटपुंजी आर्थिक तरतूद लक्षात घेता राज्यातील आरोग्य संस्थांची स्थिती किती गं... असेल याची सहज कल्पना येते. याशिवाय नियुक्त्यांमधील भ्रष्टाचार, औषध खरेदीमधील भ्रष्टाचार यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आ... श्रमजीवी संघटनेने ठाणे जिल्ह्यातील काही आरोग्य संस्थांवर धाडी घालून तेथील परिस्थिती नोंदविणारे पंचनामे केले होते. त्यापैकी दोन येथे देत आहो...

ग्रामीण रुग्णालय, मनोर, तालुका पालघर

आम्ही खालील सह्या करणारे आज दिनांक ३/१०/२००८ रोजी दुपारी ११ वाजून ३० मिनिटांनी ग्रामीण रुग्णालय, मनोर येथे प्रत्यक्ष भेट दे... पंचनामा करतो की,

श्याम दत्तू कवर, वय वर्षे ४, रा. सावरा एंबूर हे बालक दिनांक १ ऑक्टोबर २००८ पासून बाल रुग्ण विभागात दाखल असून ताप, सर्दी, खोक... गंभीर न्यूमोनियाने आजारी असल्याचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अडसुळकर यांनी सांगितले. दाखल झाला तेव्हा त्याला १०४ ताप होता, सदर बाल... कुपोषित असून तो दाखल झाला तेव्हा अंगणवाडी सेविका हजर नव्हती. गेल्या तीन दिवसात अंगणवाडीतर्फे कुणीही भेटण्यास आले नाही, अ... डॉ. अडसुळकर यांनी सांगितले. ''बाळाला अंगणवाडीत सहा वेळा खायला मिळत होते का ?'' असे त्याची आई कुसुम हिला विचारले असता, एकद... थोडी खिचडी अंगणवाडीत मिळत असल्याची माहिती तिने डॉक्टरांसमक्ष दिली. बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. शरद फसादे यांना तात्काळ दूरध्व... करून या बालकाबाबत विचारले असता सावरा एंबूर येथील कुपोषित बालक रुग्णालयात दाखल असल्याची माहिती त्यांना नाही असे त्यांनी सांगितल...

सदर कक्षामध्ये अविनाश भुयाळ, वय वर्षे १२ दाखल असून तो पडघा आश्रमशाळेत इयत्ता ७ वीत शिकत आहे. त्याला शाळेत असतानाच त... आला असे त्याची आई सुरेखा भुयाळ हिने सांगितले. तिची लहान मुलगी त्याच आश्रमशाळेत शिकत असून तिने फोनवरून सुरेखा हिला अविनाश आजा... असल्याचे सांगितले. अविनाश रुग्णालयात दाखल झाल्यापासून आश्रमशाळेतून कोणीही आलेले नाही व आता त्याची तब्येत सुधारत आहे अशी माहि... डॉ. अडसुळकर यांनी दिली. त्याचप्रमाणे पूजा वसंत भुयाळ ही आश्रमशाळेतील विद्यार्थिनीही येथे दाखल आहे. ती तापाने आजारी असल्याने आश्रमशाळे... तिला पालघर येथे दाखल केले होते. ताप उतरल्यावर तिच्या पालकांनी तिला घरी नेले. परंतु पुन्हा ताप आल्याने सदर रुग्णालयात तिला दाखल केले... आहे. याबाबत आश्रमशाळेस माहिती दिलेली आहे. परंतु आश्रमशाळेतून कोणीही चौकशीस आलेले नाही.

प्रसाधनगृह तपासले असता शौचालयात पाणी नसल्याचे आढळून आले. स्नानगृहात केरकचरा आढळून आला. सप्टेंबर, २००७ पासून सफाई... कंत्राट संपल्याने कंत्राटावरील सफाई कामगार उपलब्ध नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. किमान चार सफाई कामगारांची आवश्यकता असताना आ... केवळ एक सफाई कामगार उपलब्ध आहे. बाकी प्रशिक्षणासाठी गेल्याचे डॉक्टरांनी सांगितले. साठागृह तपासले असता डीप-फ्रिजरचे झाकण पूर्णपणे ... होत नसल्याचे आढळून आले. डीप-फ्रिजरचे तापमान २ ते ८ अंश सेल्सियस असायला हवे असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. डीप-फ्रिजर... प्रत्यक्षातील तापमान १० अंशाच्या वर असावे असे पंचांपैकी डॉ. सुहास संखे यांनी सांगितले.

प्रसुतीगृह कक्षाच्या बाहेर अस्वच्छ व घाणीने भरलेला कपडा आढळून आला. दरवाजावर कोळीष्टके आढळून आली. प्रसुतीगृह कक्षाती... शौचालयात मानवी विष्ठा आढळून आली. प्रसाधनगृहातील वॉश बेसीन अत्यंत अस्वच्छ असून त्याला पाणी नाही. तसेच बेडशीटवर रक्ताचे अनेक ड... असलेले आढळून आले. एका बादलीत बऱ्याच दिवसापासूनचा रक्ताने भरलेला कपडा असून त्याला दुर्गंधी येत असल्याचे आढळून आले. प्रसुतीगृह... कक्ष आता पाऊस नसतानाही गळत असल्याचे आढळून आले. पाऊस असताना कक्ष अधिकच गळत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सदर रुग्णाल... दोन-तीन वर्षापूर्वी बांधलेले असून ते सर्वत्र गळत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

प्रसुतीगृहात वापरलेले ब्लेड खुल्या स्थितीत आढळून आले. एका इंजेक्शनच्या वॉयलला वापरलेली सुई टोचून ठेवल्याचे आढळून आले. प्रसुतीगृहात... परिचारिकेचे ॲप्रन रक्ताच्या थेंबाने भरलेले असून अत्यंत अस्वच्छ असल्याचे आढळून आले. शस्त्रक्रियागृह बांधून तीन वर्षे झाली असून पुन्हा ते दुरु... करण्यात आले आहे, परंतु ते पूर्णपणे निर्जंतुक आहे का याची खात्री न झाल्यामुळे गेल्या एक महिन्यापासून ते बंद आहे अशी माहिती डॉ. अडसुळकर य... दिली. सदर रुग्णालयात जनरल सर्जन असले तरी भूलतज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ यांची पदे रिक्त आहेत असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगित...

रुग्णालयात निओनेटल इंटेन्सिव केअर युनिट आहे. तेथे दोन रेडियन्ट वॉर्मर आहेत. ''हे चालू आहेत का ?'' असे विचारले असता, वैद्यकी... अधिकाऱ्यांनी विजेचे बटण दाबले परंतु वीज नसल्याने ते सुरू झाले नाहीत. ''वीज नसल्यावर जनरेटर आहे का ?''असे विचारले असता, ''जनरे... चालू स्थितीत आहे.'' असे त्यांनी सांगितले. सर्व पंखे बंद अवस्थेत आहेत. आताचे जनरेटर छोटे आहेत, सदर रुग्णालयास १२ किलो व्हॅटचे जनरे... आवश्यक असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. महिला कक्षात गॅस्ट्रोच्या दोन रुग्ण आहेत. तेथेच दोन नवजात बालके आपल्या मातेसह आहे...

शौचालयातील नळाला पाणी असल्याचे आढळून आले. वॉश बेसीनलाही पाणी आहे. परंतु स्नानगृहात बराच कचरा आढळून आला. तेथील ड्रेनेज लाईन फुटल्याचे सफाई कामगार श्री. सतिश गोरे यांनी सांगितले. खाटांची संख्या कमी असल्याने एका खाटेवर दोन रुग्ण असल्याचे आढळून आले. ड्रेसिंग रुममध्ये झायलोक्लीन या औषधाच्या वॉयलला पूर्वी वापरलेली सुई टोचून ठेवल्याचे आढळून आले. येथील काही उपे गंजलेली आढळून आली. तसेच एका कैचीला रक्त लागल्याचे आढळून आले.

विद्युतगृहात जनरेटर सेट दिसत असून गेले एक वर्षभर त्याचा वापर होत नसल्याचे सफाई कर्मचारी सतिश गोरे यांनी सांगितले. तसेच विद्युतगृहाचे त्यानंतर कचरागृहात झाल्याचे दिसत आहे. पुरुष कक्षात इनव्हर्टरवर एक लाईट चालतो पण एकही पंखा चालत नाही. स्नानगृहात कचरा आहे. सदर रुग्णालयात एक वैद्यकीय अधिक्षक, तीन वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरलेली आहेत. आरोग्य सेविकेच्या सात जागा असून त्या भरलेल्या आहेत. एक शिपाई, एक वॉर्डबॉय, एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ, एक एक्सरे-तंत्रज्ञ यांच्या जागा रिक्त आहेत. एक्सरे मशिन, तंत्रज्ञ नसल्यामुळे जूनपासून बंद आहे. पिण्याच्या पाण्यासाठी राज ऑईल मिलकडून वॉटर कुलर व फिल्टर बसवलेले आहेत.

सदर रुग्णालयातील औषध भंडारात ए.एस.व्ही.चा (सर्पदंशावरील इंजेक्शन) साठा १० वॉयल्सचा असून वॉर्डमध्ये १० च्यावर असतील असे आरोग्य सेविका श्रीम. संख्ये यांनी सांगितले. ॲट्रोपिन (सर्पदंशावरील इंजेक्शन) २४० आहेत. सदर रुग्णालयात रुग्णवाहिका असली तरी ती खूप जुनी असल्यामुळे त्याचा वापर होऊ शकत नाही, नवीन रुग्णवाहिकेची आवश्यकता आहे, असे वैद्यकीय अधिक्षकांनी सांगितले. पाण्याची कमरता असल्याचे वैद्यकीय अधिक्षकांनी सांगितले. ४ पैकी ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने असून एकासाठी नाही. इतर कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने असून ती तीन वर्षांपूर्वी बांधली असून पावसात गळतात असे सांगितले.

सदर पंचनामा दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी संपविण्यात आला.

समक्ष:

डॉ. अडसुळकर, वैद्यकीय अधिकारी

पंच:

१) श्री. विवेक पंडित, संस्थापक, श्रमजीवी संघटना

२) श्रीम. नीना नाईक, ओडिसी फाऊंडेशन

३) श्रीम. आरती जोशी, ओडिसी फाऊंडेशन

४) डॉ. सुहास संखे

ग्रामीण रुग्णालय, मुरबाड, तालुका मुरबाड

आम्ही खालील सह्या करणारे पंच आज दिनांक २६/९/०८ रोजी दुपारी २.३० वाजता मुरबाड ग्रामीण रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन पंचनामा करतो की,

ग्रामीण रुग्णालयात शौचालयाची पाहणी केली असता दोन्ही मुताऱ्या बंद अवस्थेत असून एक शौचालय अस्वच्छ असल्याचे आढळून आले. स्वच्छता कर्मचारी कंत्राटी पद्धतीने असून कंत्राटदार जनार्दन चांदणे असल्याचे व तो कल्याणला राहत असल्याचे स्वच्छता कर्मचारी विक्रम मोहपे यांनी सांगितले. श्री. मोहपे तीन वर्षांपासून काम करीत असून त्यांना २००० रुपये पगार दिला जातो. भविष्य निर्वाह निधी दिला जात नाही. त्यांच्याप्रमाणे ताराबाई हुमने व दिलीप भावार्थे असे दोन स्वच्छता कर्मचारी काम करत असल्याचे व त्यांनाही २००० रुपये पगार असल्याचे त्यांनी सांगितले. कंत्राटदार चांदणे यांनी आम्हाला ३ महिन्यापासून पगार दिला नाही असे मोहपे यांनी सांगितले. स्वच्छतागृहातील वॉश बेसीन मध्ये अस्वच्छ बेडशीट दिसून आली. ती तीन दिवसापासून तेथे असल्याचे मोहपे यांनी सांगितले. डॉ. संजय धनेगावे यांना वॉश बेसीन मधील बेडशीट किती दिवसांपासून आहे असे विचारले असता, "ते मला माहीत नाही" असे त्यांनी सांगितले.

तळमजल्यावरील शस्त्रक्रियागृह दोन वर्षांपूर्वी बांधले असल्याचे परिचारिका गोसावी यांनी सांगितले. हे शस्त्रक्रियागृह सुरू केले होते. परंतु शस्त्रक्रियागृह पावसाळ्यात गळत असल्याने ते बंद असल्याचे परिचारिका गोसावी यांनी सांगितले. शस्त्रक्रियागृहाचे शौचालय बंद अवस्थेत असल्याचे व मानवी विष्ठेने भरल्याचे दिसून आले. प्रसुतीगृहाचा कक्ष पाहिले असता एकूण ११ खाटा दिसत असून ३ प्रसुतीच्या व २ इतर आजाराच्या महिला रुग्ण दाखल आहेत. कोणत्याही खाटेवर बेडशीट टाकलेली दिसत नाही. रुग्णांनी स्वत: चादर आणल्याचे दिसून आले. शौचालयात पाण्याची व्यवस्था नाही. प्रसुतीगृहाची पाहणी केली असता हातमोजांची कमतरता असल्यामुळे वापरलेले हातमोजे एका भांड्यात ठेवलेले असून त्यावर रक्ताचे डाग दिसत हाते.

ते हायपर क्लोराईडमध्ये भिजवले असून त्यानंतर ते पाण्याने धुऊन, वाळवून ऑटोक्लेव करून वापरले जातात, असे श्रीम. गोसावी यांनी सांगितले. प्रसुतीगृहामध्ये डिस्पोजेबल निडल्स किती आहेत असे विचारले असता गरज पडेल तेव्हा स्टोअर रुम मधून आणल्या जातात, महिन्याला साधारण २०० - ३०० डिस्पोजेबल निडल्स पुरविल्या जातात असे सांगितले. एकूण किती डिस्पोजेबल निडल्सची आवश्यकता असते असे विचारले असता, १५० रुग्णांपैकी दररोज ५० रुग्णांना इंजेक्शनची आवश्यकता असल्याचे म्हणजे महिन्याला १५०० डिस्पोजेबल निडल्स आवश्यक असल्याचे श्रीम. गोसावी यांनी सांगितले. प्रसुती कक्षातील स्नानगृहाला दरवाजा नसल्याचे दिसून आले. लघु-शस्त्रक्रियागृह सध्या वापरात असून संपूर्ण रुग्णालयात केवळ एकच ॲटोक्लेव मशीन असल्याचे आढळून आले. वॉश बेसीनला नळ नसल्याचे आढळून आले.

साठागृहात आसिफ शेख हे औषध निर्माता आहेत. साठा रजिस्टरमध्ये हॅण्डग्लोव्जचा साठा पाहिला असता २०० शिल्लक असल्याचे स्टॉकवर दिसले. डिस्पोजेबल निडलचा साठा विचारला असता तोही १०० असल्याचे श्री. शेख यांनी सांगितले, तपासले असता तसे असल्याचे दिसून आले. डिस्पोजेबल निडल्सचा साठा संपल्यानंतर स्टीलच्या निडल्स ॲटोक्लेव करून त्या वापरतो असे श्रीम. गोसावी यांनी सांगितले. स्टील निडल्सचा एकूण साठा २०३ असल्याचे स्टॉक रजिस्टरवरून दिसून आले. स्त्री कक्ष पाहिला असता एकूण १० खाटा असल्याचे आढळून आले व एकाही खाटेवर बेडशीट नसल्याचे दिसून आले. रुग्णांची संख्या वाढल्याने मुलांनाही येथे ठेवण्यात आले आहे. श्रीम. गुलब हरी हिंदोला यांच्या कुटुंबातील चार जण दाखल असून त्यांना कॉलरा असल्याची शक्यता आहे. त्या १५ कि.मी. अंतरावरून घरून जेवण घेऊन येतात, असे त्यांनी सांगितले.

एक्सरे तंत्रज्ञ रजेवर असल्याने एक्सरे रुम बंद आहे. एक्सरे मशीन चालू असल्याचे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. पुरुष कक्षातील प्रसाधनगृहाला कुलूप आहे. श्री. श्याम पष्टे यांची मुलगी सुप्रिया ही उलटी - जुलाबामुळे रुग्णालयात दाखल आहे. रुग्णालयात पुरवठा नसल्याने रॅनटॅक व एमसेट ही दोन इंजेक्शन्स त्यांना बाहेरून आणून द्यावी लागली असे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. कु. चेतन पांडुरंग पारधी, रा. शिदगाव (फणसवाडी), वय दीड वर्ष, पोलिओचा संशयित रुग्ण असल्याने त्याच्या सर्व चाचण्या सुरू असल्याचे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. ड्रेसिंग रुम पाहिली असता तेथे निडल असलेली एक सिरींज आढळून आली. ती पंचासमक्ष जप्त करण्यात आली. तसेच रक्त लागलेली एक कातर जप्त करण्यात आली. इंजेक्शन विभागात काही स्टीलच्या निडल्स आढळून आल्या. त्या परीक्षणासाठी जप्त करण्यात आल्या. सदर विभागात एकही डिस्पोजेबल निडल आढळून आली नाही.

१३ डिसेंबर २००७ पासून रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक पद रिक्त आहे. डॉ. पी.आर. पुरी हे कॉटेज हॉस्पिटल डहाणूमधून प्रतिनियुक्तीवर असून त्यांच्या जागी (डहाणू कॉटेजला) कोण आहे ते त्यांना माहीत नाही. वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४ पदे मंजूर असून केवळ १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. डॉ. बनसोडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. प्रत्यक्षात डॉ. पुरी व डॉ. बनसोडे आढळून आले नाहीत. रुग्णालयात बालरोग तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञ, आदी पदेच नसल्याचे तसेच सर्जन नसल्याचे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. भूलरोग तज्ज्ञ नसल्याने कोणत्याही पद्धतीची शस्त्रक्रिया होत नाही. आरोग्य सेविकेच्या ७ जागा असून त्या सर्व भरलेल्या आहेत. या ठिकाणी कामाचा भार पाहता अजून दोन आरोग्य सेविकांची आवश्यकता असल्याचे आढळून आले. शवविच्छेदनासाठी सहाय्यक उपलब्ध नाही. रिक्त जागा पुढीलप्रमाणे आहेत. वैद्यकीय अधिक्षक - १, वैद्यकीय अधिकारी - २, कनिष्ठ लिपिक - १, वॉर्डबॉय - १.

जनरेटर व इनव्हर्टर दोन्ही चालू असल्याचे डॉ. धनेगावे यांनी सांगितले. पाण्याचे रुपये ५ लाखांचे बिल थकीत असल्यामुळे एम.आय.डी.सी. पाणी पुरवठा खंडीत करीत असल्याने नियमितपणे पाणी पुरवठा होत नाही असे सांगण्यात आले.

निवासस्थाने सर्व कर्मचाऱ्यांना असली तरी ती पावसाळ्यात गळतात. निवासस्थाने बांधून २० वर्षे झाली तरी ती अजून दुरुस्त झालेली नाहीत. फक्त रंगरंगोटी केली आहे. निवासस्थानात पाणी पुरवठा होत नसल्याचे निवासस्थानात राहणारे ड्रायव्हर श्री. रामदास पवार यांनी सांगितले.

हा पंचनामा दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी संपवण्यात आला. डॉ. धनेगावे यांनी सही करण्यास नकार दिला. परिचारिका गोसावी यांनी सही केली.

समक्ष:

श्रीम. गोसावी, परिचारिका

पंच:

१) श्री. विवेक पंडित, संस्थापक, श्रमजीवी संघटना

२) श्री. जगदिश धोडी, जिल्हाध्यक्ष, श्रमजीवी संघटना

३) श्री. मोहन भुरकुंड, उपाध्यक्ष, श्रमजीवी संघटना

४) श्री. संजय शिरोडकर, उपाध्यक्ष, श्रमजीवी कामगार संघटना

५) श्री. कमलाकर मडके, ज्येष्ठ कार्यकर्ता, श्रमजीवी संघटना

रोजगार

रोजगारामुळे व्यक्तीला आत्मसन्मान, क्रयशक्ती व समाजात स्थान प्राप्त होत असते. म्हणूनच विकासाचे ते महत्त्वाचे निदर्शक मानले जाते. या पार्श्वभूमीवर राज्यातील रोजगारविषयक स्थिती खालीलप्रमाणे आहे.

- कृषि व संलग्न क्षेत्राचा राज्याच्या स्थूल उत्पन्नातला वाटा आज १२.१ टक्क्यापर्यंत खाली आला असला तरी आजही राज्यातील ५५ टक्के लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे.
- एकूण लोकसंख्येपैकी १८ टक्के लोक शेतमजुरी करतात. राज्यातील शेतमजुरांची एकूण संख्या १ कोटी ८ लाख १५ हजार इतकी आहे. १० लाख ८९ हजार लोक घरगुती उद्योगात आहेत. तर १ कोटी ७४ लाख ५५ हजार लोक इतर उद्योगात गुंतलेले आहेत.
- काम करणाऱ्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ४२ टक्के म्हणजे ४ कोटी ११ लाख ७३ हजार आहे.
- काम करणाऱ्यांची संख्या व १९ वर्षे वयापर्यंतच्या व्यक्तींची संख्या (४ कोटी ६७ लाख १० हजार) वजा करता आज राज्यातील ९० लाख लोक बेरोजगार आहेत.
- यापैकी ६४ लाख २५ हजार लोक सिमांतिक काम करणारे आहेत.
- वर्ष २००६ ते ०९ या तीन वर्षाच्या काळात ५९,७९६ लघु उद्योग बंद पडले व त्यातील ३ लाख ३९ हजार ६७१ कामगार बेकार झाले. तर याच कालावधीत १,२९३ मोठे व मध्यम उद्योग बंद पडले व त्यातील २ लाख १४ हजार १७२ लोक बेकार झाले.
- राज्यात अनेक कामगारांना व्यवस्थापनाने सरकारच्या मदतीने सक्तीची सेवानिवृत्ती (व्ही.आर.एस.) घेण्यास भाग पाडले

- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी व महाराष्ट्राची सांख्यिकी

नोंदणीकृत बेरोजगार

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या चालू नोंदवहीत डिसेंबर २००८ अखेर पर्यंत ३० लाख ७ हजार २३६ व्यक्तींनी नोंद केली. त्यापैकी ७ लाख ४३ हजार ३६२ स्त्रिया होत्या. नोंद केलेल्यांपैकी ४ लाख ८२ हजार ८५६ व्यक्तींनी माध्यमिक शालांत शिक्षणही पूर्ण कले नव्हते.

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामधील नोंदणी

तक्ता क्र. २५

अ.क्र.	शैक्षणिक पात्रता	एकूण व्यक्ती	पैकी स्त्रिया	स्त्रियांचे प्रमाण	एकूण बेरजेशी व्यक्तींची टक्केवारी
१	निरक्षर व माध्यमिक शालांत परीक्षेपेक्षा कमी शिक्षण	४,८२,८५६	१,४१,१३२	२९.२	१६.१
२	माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण	९,१२,८१७	१,९९,६२१	२१.९	३०.४
३	उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण	८,५४,०१०	२,०८,०५३	२४.४	२८.४
४	शिकाऊ उमेदवार	१,८६,२२३	१२,७३४	६.८	६.२
५	पदविकाधारक	१,१७,१११	१२,७५१	१०.९	३.९
६	पदवीधर	४,१३,४१७	१,५५,३४७	३७.६	१३.८
७	पदव्युत्तर पदवीधर	४०,८०२	१३,७२४	३३.६	१.४
	एकूण	३०,०७,२३६	७,४३,३६२	२४.७	१००.०

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००८-०९

असंघटित क्षेत्रातील मजूरांवर अन्याय

विटा व कौले बनविणाऱ्या उद्योगातील कामगारांचे किमान वेतन दिनांक २० ऑक्टोबर १९८३ रोजी ठरविण्यात आले होते. आज २५ वर्षे उलटून गेली तरी त्यांचे किमान वेतन तेवढेच आहे. कामगार आयुक्तांकडून जुलै २००९ मध्ये प्राप्त झालेल्या माहितीनुसार किमान वेतन पुनर्निर्धारित करण्यासाठी मसुदा अधिसूचना जाहीर झालेली असली तरी अद्याप अंतिम कार्यवाही होऊन किमान वेतन वाढविण्यात आलेले नाही.

निरनिराळ्या अनुसूचित उद्योगांतील किमान वेतन दर ठरविण्यासाठी किमान वेतन समित्यांची नियुक्ती केली जाते. परंतु वर्ष २००६-०७ पासून एकाही किमान वेतन समितीची नेमणूक केली गेली नाही. असंघटित क्षेत्रातील मजुरांप्रति शासनाची अनास्था स्पष्ट आहे.

राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे अपयश

ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध करवून देण्यासाठी महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेचा आदर्श ठेवीत राष्ट्रीय रोजगार हमी योजना देशभर लागू केली गेली. योजनेतील प्रशासकीय अडचणींमुळे ना अधिकारी योजना राबविण्यास उत्सुक आहेत ना मजूर योजनेवर काम करण्यास तयार आहेत. हातावर पोट असणाऱ्या मजुरांना केलेल्या कामाची मजुरी मिळण्यामध्ये महिना जात आहे. व्यवहार्यता लक्षात न घेता तयार करण्यात आलेल्या या योजनेमुळे राज्यभर रोजगार हमीच्या कामावरील मजुरांच्या संख्येवर परिणाम झाला आहे. रोजगार हमीवर काम करण्यापेक्षा स्थलांतर करण्यास मजूर तयार आहेत असे चित्र राज्यभर दिसते. खालील तक्त्यावरून हे सहज लक्षात येते की, २००६-०७च्या तुलनेत रोजगार हमी योजनेतून निर्माण झालेल्या रोजगारात २ कोटींहून अधिक मनुष्य दिवसांची घट झाली आहे.

गेल्या तीन वर्षातील रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा

तक्ता क्र. २६

वर्ष	मनुष्य दिवस रोजगार (कोटी)			झालेला खर्च (कोटी रुपये)		
	राष्ट्रीय योजना	राज्याची योजना	एकूण	राष्ट्रीय योजना	राज्याची योजना	एकूण
२००६-०७	१.६	४.७	६.३	१७५	६४०	८१५
२००७-०८	१.८	४.२	६.०	१८९	५२७	७१६
२००८-०९	४.२	-	४.२	३५७	-	३५७

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी

राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची राज्यातील अंमलबजावणी

तक्ता क्र. २७

निर्देशक	२००६-०७	२००७-०८	२००८-०९
मागणी केलेल्यांपैकी रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची टक्केवारी	१०९	१००	७०.७
१०० दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची टक्केवारी	१.४	१.८	२.८
वापरलेल्या निधीची टक्केवारी	३५.९	३८	४८.५
रोजगार दिवस निर्मिती (कोटीत)	१.६	१.९	२.७
सरासरी प्रति कुटुंब रोजगार (दिवस)	४१	३९	५२
रोजगारामध्ये अनु. जातीच्या हिश्श्याची टक्केवारी	१६.२	१८.४	१९.२
रोजगारामध्ये अनु. जमातीच्या हिश्श्याची टक्केवारी	४०.९	३८.५	४३.२
रोजगारामध्ये महिलांच्या हिश्श्याची टक्केवारी	३७.१	४०	४४.१
एक दिवस रोजगार निर्मितीची किंमत (रुपये)	१०९.६	१०२.३	९२.२

शेती

राज्याची एकूणच अर्थव्यवस्था कृषि आधारित आहे. नियोजन मंडळाच्या अहवालानुसार तर राज्यातील ६८ टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. कृषि क्षेत्राची वाढ अन्न सुरक्षा, ग्रामीण रोजगार व ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी महत्त्वाची आहे.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी नुसार

- स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नामध्ये २००७-०८ मध्ये ९.० टक्के दराने वाढ अपेक्षित असली तरीही कृषि व संलग्न क्षेत्रासाठी हा दर ५.८ टक्के इतकाच आहे.
- राज्य उत्पन्नातील कृषि व संलग्न कार्यक्षेत्राच्या हिश्श्यात सातत्याने घट होत असून १९८०-८१ मध्ये २२.१ टक्के असलेला हा हिस्सा २००८-०९ मध्ये १२.१ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.
- तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात राज्य योजनेपैकी ३०.९ टक्के इतका खर्च कृषि व संलग्न सेवा यावर होत असे, दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत हे प्रमाण ३.५ टक्के एवढे कमी झाले आहे.
- राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी ५५ टक्के लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहेत.
- राज्यातील जवळपास १/३ क्षेत्र पर्जन्यछायेच्या प्रदेशात येते.
- १९६०-६१ ते २००६-०७ या काळात राज्यातील पिकांखालील क्षेत्रामध्ये २० टक्के वाढ झालेली असली तरी अन्नधान्यांखालील क्षेत्रात केवळ ४ टक्क्यांच्या आसपास वाढ झालेली आहे.
- राज्यातील अन्नधान्याचे २००६-०७ मधील प्रति हेक्टर उत्पादन (९५८ कि.ग्रॅ.) हे देशपातळीवरील उत्पादनाच्या (१,७१६) तुलनेत बरेच कमी आहे.
- १९८०-८१ साली एकूण पिकापैकी अन्नधान्याचे उत्पादन ७० टक्के होते ते घटून २०००-०१ साली ते ६० टक्के इतके झाले आहे.
- २००८-०९ मध्ये रब्बी पिकांच्या क्षेत्रामध्ये ४ टक्क्यांनी घट झाली असून एकूण रब्बी पिकांच्या उत्पादनात १३ टक्के घट झालेली आहे.
- १९७०-७१ मध्ये सरासरी जमीन धारणा ४.२८ हेक्टर होती ती १९९५-९६ मध्ये १.८७ हेक्टर इतकी झाली आहे.

त्पादकतेत महाराष्ट्र पिछाडीवर

महाराष्ट्रात दर हेक्टरी १३४ किलो कापूस उत्पादन होते तर हरियाणामध्ये हेच प्रमाण दर हेक्टरी ३६० किलो एवढे आहे. महाराष्ट्रात दर हेक्टरी ८ हजार किलो ऊस पिकत असताना तामिळनाडूमध्ये हे प्रमाण १७७ किलो एवढे अधिक आहे. राज्यात अन्नधान्याचे उत्पादन प्रति हेक्टरी सरासरी ०३ किलो आहे तर पंजाबमध्ये हे प्रमाण दहा पट म्हणजे प्रति हेक्टरी १०३२ किलो आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत कृषि विभागावर झालेल्या खर्चाचा कल

लेख क्र. ११



त : अर्थसंकल्पीय अंदाज पत्रिका व संक्षिप्त अर्थसंकल्प. टीप : वर्ष २००८-०९ सुधारित अंदाज व २००९-१० अर्थसंकल्पीय अंदाज

जागतिकीकरणाने शेतकऱ्यांसमोर आव्हाने उभी केली तशाच संधीही निर्माण केल्या. आवश्यकता होती ती शासनाने आपल्या योजनांद्वारे शेतकऱ्यांना या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, संधींचा फायदा उठविण्यासाठी सक्षम बनविण्याची. मात्र शेती विभागाच्या कामगिरीचा अभ्यास करताना दिसतात त्या निधी अभावी केवळ कागदावर उरलेल्या योजना, बंद पडलेल्या रोपवाटीका, अनेक महिने पगार न झालेले कामगार, ६० टक्के पदे रिक्त ठेवून केलेली राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची अंमलबजावणी, अभियानाचा ५० टक्क्यांहून अधिक अखर्चित निधी. राज्याच्या अर्थसंकल्पातील कृषि विभागाचे खालावलेले स्थान राज्यकर्त्यांनी या क्षेत्राकडे केलेल्या दुर्लक्षाची खात्री पटवते.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. आर्थिक पॅकिजेस जाहीर केल्यानंतरही या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. आत्महत्यांचे खालील आकडे राज्यास लाजिरवाणे आहेत.

विदर्भाच्या सहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या

तक्ता क्र. २८

२००१	२००२	२००३	२००४	२००५	२००६	२००७
६६	१२२	१४६	४५५	७१२	१४१४	६०८

स्रोत : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल. २००७ मधील आत्महत्या सप्टेंबर महिन्यापर्यंतच्या

शेतकरी पॅकेजेसच्या अंमलबजावणीवर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे ताशेरे

- विदर्भाच्या सहा जिल्ह्यांमधील आत्महत्यांचा आकडा २००४-०५ पर्यंत ४५५ वर पोहोचला होता. पॅकेज जाहीर झाल्यानंतरही २००६-०७ पर्यंत या संख्येत १४१४ एवढी वाढ झाली. एप्रिल २००७ ते सप्टेंबर २००७ या सहा महिन्यांमध्ये ६०८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. पॅकेजेस जाहीर करूनही गेल्या २ वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यात शासनाला अपयश आल्याचे सदर आकडेवारीवरून स्पष्ट होते.
- महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २००५ मध्ये रु.१ हजार ७५ कोटींचे, तर केंद्र सरकारने जुलै २००६ मध्ये रु.३ हजार ७५० कोटींचे पॅकेज जाहीर केले. ही रक्कम ३ वर्षांमध्ये खर्च करायची होती.
- शेतकऱ्यांवरील तणावाची तीव्रता जाणून घेण्याकरिता व शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता महसूल विभागामार्फत जून २००६ मध्ये १७ लाख ६४ हजार शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले गेले. त्यानुसार १३ लाख ४८ हजार शेतकरी तणावाखाली असल्याचे व त्यातील ४ लाख ३४ हजार शेतकरी सर्वाधिक तणावग्रस्त असल्याचे जाहीर करण्यात आले. परंतु पॅकेजची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना लाभार्थी ठरविण्याकरिता ही माहिती उपलब्ध करून दिली नव्हती.
- इंपिरियल रिसर्च एजन्सी यांच्या सर्वेक्षणानुसार मात्र ८५टक्के शेतकऱ्यांकडे विभागीय सर्वेक्षणासाठी शासकीय कर्मचारी पोहोचलेच नाहीत.
- अनधिकृत सावकारीवर बंदी, कृषि आधारित उद्योग, कापसाची संयुक्त शेती व शेतकऱ्यांसाठी हेल्पलाईन या महाराष्ट्र शासनाच्या पॅकेजमधील चार घटकांसाठी निधीची तसेच या संदर्भातील शासनाच्या निर्णयाच्या प्रसिद्धीसाठी तरतुदच केली गेली नव्हती. ७५ टक्के शेतकऱ्यांना शेतकऱ्यांसाठीच्या हेल्पलाइनची माहितीच नसल्याचे इंपिरियल रिसर्च एजन्सी यांच्या सर्वेक्षणात आढळून आले.
- १७ लाख ६४ हजार शेतकऱ्यांपैकी ९ लाख २९ हजार शेतकऱ्यांना व्याज माफी देण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र यापैकी १ लाख १[illegible] हजार व्यक्ती शेतकरी नव्हत्या. नवीन कर्ज फक्त ४ लाख ८४ हजार शेतकऱ्यांनाच देण्यात आले. इंपिरियल रिसर्च एजन्सी यांच्या सर्वेक्षणात ७५ टक्के शेतकऱ्यांना व्याज माफीच्या योजनेची माहिती नसल्याचे आढळून आले.
- नोंदणीकृत नसलेल्या सावकारांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनी स्वत:ला कर्जमुक्त समजावे असे महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २००५ मध्ये जाहीर केले. मात्र या निर्णयाच्या प्रसिद्धीसाठी शासनाने कोणतीच तरतूद केली नाही. इंपिरियल रिसर्च एजन्सीच्या सर्वेक्षणात ७५ टक्के शेतकऱ्यांना या निर्णयाची कल्पनाच नसल्याचे आढळले.
- महाराष्ट्र शासनाच्या पॅकेजमधील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना भरपाई या योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यातील २२४ पात्र शेतकरी निधी उपलब्ध

नसल्याने वंचित राहिले. यवतमाळ, वाशिम, बुलढाणा व अकोला जिल्ह्यात ७२ प्रकरणांमध्ये अर्थसहाय्य पुरविण्यात विलंब झाला. यापैकी एका प्रकरणात तर १० महिन्यांपेक्षा अधिक विलंबाने अर्थसहाय्य दिले गेले.

- यवतमाळ व वर्धा जिल्ह्यातील १६ प्रकरणांमध्ये शवविच्छेदन अहवाल आणि/किंवा पोलीस पंचनामा न मिळविताना रु. १६ लाख वाटण्यात आले.
- इंपिरियल रिसर्च एजन्सीने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले की, १ टक्क्यापेक्षा कमी शेतकऱ्यांनी सामूहिक विवाह योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज सादर केले होते. मात्र त्यापैकीही ७० टक्के शेतकऱ्यांनी आपल्या मुलींचा विवाह सामूहिक विवाह कार्यक्रमात केला नाही.
- दीर्घ मुदतीच्या उपायांतर्गत कृषि उत्पादन वृद्धीसाठी शेतकऱ्यांना द्यावयाचे अर्थसहाय्य या योजनेंतर्गत तीन वर्षांकरिता रु. १५० कोटींची तरतूद करण्यात आली. यापैकी ८५ कोटी ४० लाखांचे अनुदान कृषि विभागास उपलब्ध करून देण्यात आले. मात्र कृषि आयुक्तांकडून जिल्हा कृषि अधिकाऱ्यांना अनुदान २९ व ३० मार्च २००७ रोजी देण्यात आल्याने केवळ रु. ४९ कोटी ९९ लाख एवढीच रक्कम खर्च झाली.
- कृषि उत्पादन वृद्धीसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांना कृषिविषयक अवजारे व अन्य साधने उपलब्ध करून देण्यासाठी विदर्भातील ६ जिल्ह्यातून प्रत्येकी १० हजार शेतकरी निवडायचे होते. २९ हजार २०० शेतकऱ्यांनी अवजारे व साधन सामुग्रीसाठी अर्ज केले असतानाही केवळ १६ हजार ५७७ शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ मिळाला. उर्वरित १२ हजार ६२६ अर्जदारांना निधीची उपलब्धता असतानाही सामावून घेण्यात आले नाही. वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यासाठी ८६९ शेतकऱ्यांचे लक्ष ठरविलेले असताना केवळ ५८६ शेतकऱ्यांनीच अर्ज केले. त्यापैकी केवळ १२९ शेतकऱ्यांची निवड योजनेसाठी केली गेली. ३३१ शेतकऱ्यांकडे २ हेक्टर पेक्षा कमी जमीन असतानाही त्यांची निवड करण्यात आली नाही.
- कृषि उत्पादन वृद्धीसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत जिल्हास्तरीय समितीने कारंजा तालुक्यासाठी ११० लाभार्थ्यांचे लक्ष निर्धारित केलेले असताना कृषि अधिकारी यांनी ३४९ शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला. ३४९ पैकी ९ लाभार्थ्यांचे धनादेश न वटताच परत आले.
- ८ तालुक्यांमध्ये रु. १ कोटी ३३ लाख रकमेची अवजारे वितरित न केल्यामुळे पडून असल्याचे तपासणीत आढळून आले.
- केंद्र सरकारच्या पॅकेजमधील सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत ४ उपविभागांमध्ये रु. ४ कोटी ३३ लाखांच्या अर्थसहाय्याचे २,८४१ प्रस्ताव निधी उपलब्ध नसल्याने प्रलंबित राहिले.
- उपसंचालक, बियाणे यांनी वर्ष २००६-०७ साठी चणा, करडी, सूर्यफूल, गहू या चार पिकांच्या बियाणांच्या गरजेचा जिल्हावार अंदाज घेऊन विदर्भातील ६ जिल्ह्यांतील ६४ तालुक्यांसाठी १ लाख ३७ हजार क्विंटल बियाण्यांचा अंदाज वर्तविला. तर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी केलेल्या चाचणी तपासणीत मात्र १८ तालुक्यांमध्येच ८४ लाख क्विंटल बियाण्यांची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. या १८ तालुक्यांमध्ये प्रत्यक्षात केवळ ३१ लाख क्विंटल बियाण्यांचा पुरवठा झाला होता.
- २००८-०९ या वर्षासाठी मका, सूर्यफूल, गहू या बियाण्यांच्या गरजेचा अंदाजच घेतला गेला नाही. २००७-०८ व २००८-०९ या वर्षांसाठीचे बियाण्यांच्या गरजेचे अंदाज २००६-०७ च्या अंदाजापेक्षा कमी होते.
- आरोग्य व शिक्षणाकरिता पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून आर्थिक सहाय्य देण्याची योजना आखताना शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा शेतकऱ्यांवर किती ताण पडतो याचा कोणताही अंदाज घेतला गेला नाही.
- आरोग्य व शिक्षणाकरिता पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत आरोग्याकरिता करण्यात आलेली रु. ३ कोटींची तरतूद महसूल विभागाच्या सर्वेक्षणात आढळून आलेल्या ९२,४५६ दीर्घकाळ आजारी असलेल्या व्यक्तींसाठी अत्यल्प होती.
- १३ लाख ४८ हजार शेतकरी तणावग्रस्त आढळले असतानाही राज्य सरकारच्या पॅकेजमधून कृषि उत्पादन वाढविण्याकरिता शेतकऱ्यांना अर्थसहाय्य पुरविण्याच्या योजनेंतर्गत केवळ ६० हजार शेतकऱ्यांची निवड करण्यात आली.
- उत्पन्न वाढीसाठी अवजारे, साधनसामुग्री यांचा पुरवठा या योजने खाली शेतकऱ्यांना वाटा उचलावा लागणार होता. २० हजार रुपयेही वार्षिक उत्पन्न नसलेल्या शेतकऱ्यांना २८ हजार ९२४ रुपयांचा वाटा उचलणे शक्यच नव्हते.
- विदर्भात संत्र्याचे पीक हे मुख्य बागायती पीक असताना देखील नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीकरिता दिल्या जाणाऱ्या सवलत योजनेखाली संत्र्याचे पीक समाविष्ट केले गेले नाही.
- अमरावती, नागपूर, अकोला, यवतमाळ, वणी येथील २७५ शेतकऱ्यांच्या धनादेश न मिळाल्याच्या तक्रारी आल्या होत्या. लाभार्थ्यांच्या नावामध्ये तफावत असल्यामुळे या २७५ शेतकऱ्यांना जवळपास २ वर्षे तातडीच्या मदतीपासून वंचित राहावे लागले. तसेच २२४ पात्र शेतकरी निधी उपलब्ध नसल्यामुळे भरपाईच्या रु. २ लाख १४ हजार रकमेच्या लाभापासून वंचित राहिले.

- वसंतराव नाईक शेतकी स्वावलंबन मिशन, अमरावती व शासनाच्या विभागांनी दिलेली खर्चाची माहिती यात तफावत होती. उदाहरणार्थ सामूहि[illegible] विवाहासाठी रु. ६ कोटी मंजूर झालेले असताना, वसंतराव नाईक शेतकी स्वावलंबन मिशन यांनी रु. ९ कोटी २२ लाख खर्च झाल्याचे सांगितले[illegible] महिला व बाल कल्याण आयुक्त यांनी हीच रक्कम रु. १२ कोटी ७८ लाख असल्याचे सांगितले, तर सहा जिल्ह्यांच्या महिला व बाल विका[illegible] अधिकाऱ्यांनी ही रक्कम रु. ११ कोटी ८६ लाख असल्याचे सांगितले.
- मार्च, २००७ पर्यंत उपलब्ध झालेला निधी व प्रत्यक्ष खर्च यांची माहिती जानेवारी, २००८ पर्यंत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना उपलब्ध नव्हती.

नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष

- शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने मिळून रु ४,८२५ कोटींचे पॅकेज दिले असले तरी ही रक्कम शेतकऱ्यांना थे[illegible] न मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकला नाही. त्यामुळे पॅकेजची अंमलबजावणी सुरू असूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झालेले नाही.
- राज्याच्या रु. १,०७५ कोटींपैकी ३७ टक्के व केंद्राच्या रु. ३,७५० कोटींपैकी केवळ २३ टक्के रक्कम थेट आपादग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली. शासनाने राबविलेल्या दीर्घकालीन उपाययोजना कितीही योग्य असल्या तरी त्या वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या ठरल्या नाहीत. त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या.
- या पॅकेज नुसार ३१ मार्च १९९७ ते ३१ मार्च २००७ या कालावधीत वाटप केलेले कर्जच, कर्ज माफी व कर्ज परतफेड सवलत मिळण्यासाठी पात्र ठरविण्यात आले. या निकषामुळे त्यापूर्वी कर्ज घेतलेल्या खातेदारांना या योजनेचा लाभ घेता आलेला नाही.
- दोन्ही पॅकेजेसच्या बाबतीत शासकीय पातळीवरून यथायोग्य प्रबोधन झाले नाही किंबहुना हे शासनाच्या प्रचार यंत्रणेचे अपयश आहे.
- आपादग्रस्त शेतकऱ्यांना रोजीरोटी बुडवून सरकारी कचेऱ्यात खेटे घालावे लागत आहेत. यातून कमिशन घेऊन काम करणाऱ्या दलालांचा सुळसुळाट झाला आहे. याची चौकशी होऊन दलालांचा बंदोबस्त होणे गरजेचे आहे.
- दोन्ही पॅकेजेसच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे गरजेचे होते. अशी यंत्रणा उभी करण्यास शासनाला पूर्ण अपयश आले आहे. या पॅकेजेसच्या अंमलबजावणीस जबाबदार असणाऱ्या मुख्याधिकारी पदी गेल्या २ वर्षात तब्बल ५ अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली. त्याचप्रमाणे कृषि खात्यांतर्गत महत्त्वाची ३० ते ४० टक्के पदे गेली अनेक वर्षे भरली गेलेली नाहीत. पॅकेजेसची अंमलबजावणी नीटपणे न होण्याचे तेही एक कारण आहे.

७८० कोटींच्या पंतप्रधान पॅकेजची अंमलबजावणी

तक्ता क्र. २९

रु. कोटीत

तपशील	प्राप्त तरतूद	उद्दिष्ट (२००६-०९)	खर्च (३० एप्रिल २००८ पर्यंत)	टक्केवारी
पाणलोट क्षेत्रविकास	२४०	१३०	९७.५	४०.६
बियाणेबदल	१८०	६९	६९.०	३८.२
राष्ट्रीय फलोत्पादन मिशन	२२५	७६	६४.२	२८.५
शेतीपूरक व्यवसाय	१३५	२१	१५.८	११.७
एकूण	७८०	२९६	२४६.५	३१.६

स्रोत : शेतकरी आत्महत्या आणि कृषिक्षेत्रापुढील आव्हाने डॉ. नरेंद्र जाधव यांचा अहवाल

महाराष्ट्र शासनाने वर्ष २००१ पासून वर्ष २००७ पर्यंत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वारसांना रु. १ लाख देण्याचे जाहीर केले होते. केवळ टक्के आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे वारस त्यासाठी पात्र ठरले.

ा क्र. ३०

वर्ष	एनसीआरबी नुसार आत्महत्या	महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आलेल्या आत्महत्या	मदतीसाठी पात्र ठरलेल्या शेतकरी आत्महत्या	प्रमाण (स्तंभ ४ चे स्तंभ ३शी)
१	२	३	४	५
२००१	१,०७१	४९	२९	५९
२००२	१,०६७	१०५	७२	६९
२००३	१,०००	१४३	८९	६२
२००४	१,१६०	४४१	२५०	५७
२००५	१,०२७	४३१	२७४	६४
२००६	१,५२०	१,४४७	५७७	४०
२००७	उपलब्ध नाही	१,२४१	२३३	१९
एकूण	**७,८४५**	**३,८४७**	**१५२४**	**४०**

ा : शेतकरी आत्महत्या आणि कृषिक्षेत्रापुढील आव्हाने डॉ. नरेंद्र जाधव यांचा अहवाल
एनसीआरबी - नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो, महाराष्ट्र शासन

- या मदत वाटपामध्ये गैरव्यवहार झाल्याच्या, दलालांनी कमिशन घेऊन शेतकऱ्यांना नागवल्याच्या घटना समितीच्या निदर्शनास आल्या.
- बी-बियाणे, दुधाळ जनावरे, शेतीची अवजारे इत्यादीचे वाटप करताना अनेक अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे पैसे मागितल्याच्या तक्रारी आहेत.
- शेतकऱ्यांना दुधाळ जनावरे देण्यात आली. परंतु त्यांची निगा राखण्यासाठी लागणारी आवश्यक शेड, त्यांना पोसण्यासाठी आवश्यक चारा, इत्यादी गोष्टींची व्यवस्थाच करण्यात आली नव्हती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अशी जनावरे स्वत:कडे न ठेवता परस्पर विकून टाकली.
- कर्जमाफी व कर्जफेड सवलत योजना, २००८ साठी केंद्र शासनाने रु. ७१ हजार ६८० कोटींची तरतूद जाहीर केली. देशात झालेल्या शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्यांपैकी २० टक्के आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या असतानाही महाराष्ट्रासाठी योजनेच्या १३.८ टक्के रक्कम म्हणजे रु.९ हजार ८९२ कोटी देण्यात आले.
- सदर योजनेची अंमलबजावणी राज्यात करताना पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप दिले गेले. विदर्भात सर्वाधिक आत्महत्या होऊनही ५० टक्क्यांहून अधिक निधी मात्र पश्चिम महाराष्ट्रात खर्च झाला.

ा क्र. ३१

(सभासद लाखात, रक्कम कोटीत)

विभाग	५ एकरापर्यंत जमीनधारणा		५ एकरापेक्षा जास्त जमीनधारणा		एकूण		एकूणाशी प्रमाण
	सभासद	रक्कम	सभासद	रक्कम	सभासद	रक्कम	
पश्चिम महाराष्ट्र	१५.२२	३,४२३	४.२६	१,८९७	१९.४८	५,३२०	५३.७६
कोकण	०१.८६	१६९	०.८२	१६	०२.६८	१८५	०१.८७
मराठवाडा	०९.३६	१,८२७	२.३५	५७६	११.७१	२,४०२	२५.००
विदर्भ	०९.४४	१,१२२	२.८७	८६३	१२.३१	१,९८५	२०.०६
एकूण	**३५.८८**	**६,५४०**	**१०.३०**	**३,३५२**	**४६.१८**	**९,८९२**	**१००.००**

ा : शेतकरी आत्महत्या आणि कृषिक्षेत्रापुढील आव्हाने डॉ. नरेंद्र जाधव यांचा अहवाल

- सधन पश्चिम महाराष्ट्रातील पात्र खातेदाराला सरासरी रु. २७,३१० कर्जमाफी देण्यात आली तर आत्महत्याग्रस्त विदर्भातील ५ जिल्ह्यांमधी खातेदारांना देण्यात आलेली सरासरी कर्जमाफी रु. १५,७०९ एवढी होती. यवतमाळ सारख्या जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण सरासरी रु. १४,४३ एवढे कमी आहे.

खाजगी सावकारी आणि वाढते कर्जदार शेतकरी

तक्ता क्र. ३२

तपशील	३१ मार्च २००७ रोजी	३१ मार्च २००८ रोजी
परवानाधारक	८,१०९	७,८०१
नवीन परवाने दिलेले	१,४३१	१,२१२
नुतनीकरण केलेले परवाने	७,०७२	७,०८९
रद्द केलेले परवाने	६५६	६९९
कर्जदार शेतकरी	१,१०,७००	१,९५,४६३
इतर कर्जदार	२,६५,८२८	२,८०,४९८
दिलेली कर्जे (रु. कोटीत)	४३७.६१	५८८.१९

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००८-०९

टीप : शेतकरी आत्महत्या आणि कृषिक्षेत्रापुढील आव्हाने डॉ. नरेंद्र जाधव यांचा अहवाल

नरेंद्र जाधव समितीने सुचविलेल्या उपाययोजना

- राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या धर्तीवर समग्र महाराष्ट्र समतोल कृषि विकास कृति योजना आखण्यात यावी. ही योजना सर्वसमावेषक अ स्वरूपाची असावी.
- राज्यातील ४२२ सिंचन प्रकल्प पूर्ण होण्याच्या अंतिम टप्प्यात आहेत. सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याला प्राधान्य दिले जावे. तसेच रू इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट फंड (RIDF) व नाबार्डकडून वित्तीय सहाय्य घेतले जावे.
- राष्ट्रीयकृत बँकांच्या दुर्लक्षामुळे व त्यांच्या नफेखोरीमुळे त्यांचे ग्रामीण शाखांकडे दुर्लक्ष झाले आहे व त्यामुळे खाजगी सावकारीमध्ये व झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. ग्रामीण वित्त पुरवठा संस्थांचे पुनर्गठण करण्यात यावे व सहकारी बँकां बाबतीत वैद्यनाथ समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी.
- सावकारी कर्जामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण होते त्यासाठी गावा-गावातून बचत गटांची स्थापना करण्यात यावी. ब गटात प्रत्येक कुटुंबाचा एक तरी सदस्य असावा. नवीन बचत गट स्थापन करण्यासाठी जिल्हा कृषि विकास समितीने पुढाकार घ्यावा.
- बँकांनी गाव दत्तक घेऊन कमीत कमी दोन वर्षात पूर्णपणे गाव कर्जमुक्त होतील यासाठी प्रयत्न करावेत.
- विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष लक्षात घेता खास मोहीम राबवून पंपसेट जोडणीचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा.
- केंद्र शासन निरनिराळ्या पिकांना देत असलेले हमी भाव राज्याने सुचवलेल्या भावाच्या ६५ टक्केही नसतो. म्हणून राज्य स्तरावरील कृ विकास परिषदेने कृषि विद्यापीठातील तज्ज्ञांची समिती नेमून प्रमुख पिकांच्या उत्पादन खर्चाचा आढावा घेऊन सुधारित दरासाठी शासना शिफारस करावी व हमी भाव पेरणी पूर्वी जाहीर करावेत.
- सध्याच्या कृषि उत्पन्न बाजार व्यवस्थेमध्ये मध्यस्थ व दलालांकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होते. दलाल मुक्त बाजारपेठा निम करून शेतकरी व ग्राहक यांच्यातील दरी कमी केली जावी. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जावा जेणे करून शेतकऱ्य देशातील व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील बाजारभावांची माहिती गावातच उपलब्ध होईल.
- महाराष्ट्र कृषि विकास परिषदेने पुढाकार घेऊन ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF) स्थापन करावा जेणेकरून पायाभूत सुविधांम मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

- गाव तेथे ग्रामीण गोदाम या तत्त्वावर एक हजार किंवा जास्त लोकवस्ती असलेल्या प्रत्येक गावामध्ये ग्रामीण गोदाम व कोल्ड स्टोरेजची निर्मिती करण्यात यावी.
- शेती व्यवसायाबरोबर दुभत्या जनावरांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा करण्यात यावा जेणेकरून शेतकरी शेती बरोबरच जोडधंदा करू शकतील व दुधाच्या धंद्याला चालना मिळेल. जोडधंदा विकसित करण्यासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपला प्राधान्य द्यावे.
- ७/१२ च्या उताऱ्यात सुधारणा करण्यात यावी. त्यातील क्लिष्टता दूर करून तो लवकरात लवकर शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावा जेणेकरून बँका व इतर संस्थांशी व्यवहार करणे शेतकऱ्यांना सोपे जाईल.
- विदर्भात सहकारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणावर सूत गिरण्या प्रस्थापित करण्यात याव्यात. विदर्भात मोठ्या प्रमाणावर कापूस हे पीक घेतले जाते. आत्महत्या होण्याचे कारण म्हणजे विदर्भातील विस्कळीत कॉटन इकोनॉमी आहे. ती एकसंघ व मजबूत करण्यासाठी विदर्भ कॉटन मिशन तयार करावे.
- हवामानाच्या लहरीप्रमाणे अनेकदा शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येते. त्यासाठी मजुरीवर जास्तीचा खर्च येऊन पडतो. अशा आकस्मित परिस्थितीत मजुरांची गरज पडल्यास रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकामास सामूहिक मजूर पुरवठा करण्यात यावा. ही योजना ग्रामपंचायतीमार्फत मंजूर करण्यात यावी. जेणेकरून स्थानिक पातळीवर याबाबतचे निर्णय घेतले जातील.
- सर्व खाजगी बी कंपन्यांना त्यांची बियाणे शासनाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक करावे. बियाणांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवावे. बचत गटांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वत:ची बी-बियाणे विकसित करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन द्यावे. भेसळयुक्त बी-बियाणे विकणाऱ्यांना कठोर शासन करण्यात यावे.
- सध्याच्या पीक विमा योजनेमधील जाचक तरतुदींमुळे शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा हवा तसा लाभ मिळत नाही. त्यात बदल करून व्यापक अशी पीक विमा योजना विकसित करावी. ती हवामानावर आधारित असावी.
- अत्यंत कठीण परिस्थितीत असणाऱ्या शेतकऱ्यांना खते व औषधे घेण्यासाठी शासनाने कुपन जारी करावे. हे कुपन रोख रकमेचे असावे ज्याच्या आधारे शेतकरी आपल्या सोयी व गरजेनुसार कोणत्याही विक्रेत्याकडून खते व औषधे खरेदी करू शकतील.
- प्रमुख पीक रोगांवर शासनाने स्वत:च्या यंत्रणेमार्फत औषधोपचार करावा.
- गरीब शेतकऱ्यांना स्वस्त दरात अन्नधान्याचा पुरवठा करावा. तसेच स्वस्त पशुखाद्य पुरवावे.
- जीवन विमा, विवाह अनुदान, शिक्षण अनुदान तसेच स्वस्त आरोग्य सुविधा यासारख्या योजना राबवण्यात याव्या.

सिंचन

२००९-१०चा अर्थसंकल्प सादर करताना वित्तमंत्र्यांनी सिंचनासाठी करण्यात आलेल्या तरतुदीतून सिंचनाचा अनुशेष दूर केला असल्याचे सांगितले आहे. सिंचनावरील आर्थिक गुंतवणुकीचा विचार करता महाराष्ट्र आघाडीवर असला तरी रखडलेले प्रकल्प, कालव्यांच्या बांधकामांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे राज्यातील सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ होण्यामध्ये महाराष्ट्र सर्वात पिछाडीवरील राज्य आहे. राज्याची सिंचन क्षमता १२६ लाख हेक्टर वाढू शकेल असे अनुमान जल व सिंचन आयोगाने काढलेले असताना राज्य ६० लाख हेक्टर क्षमताही साध्य करू शकलेले नाही.

सर्वात अधिक गुंतवणूक करूनही महाराष्ट्रात सिंचन सर्वात कमी

महाराष्ट्राने सिंचनावर केलेली गुंतवणूक देशातील इतर कोणत्याही राज्याने सिंचनावर केलेल्या गुंतवणुकीपेक्षा सर्वाधिक आहे. देशातील सर्वात जास्त सिंचन प्रकल्प राज्यात आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण खर्चापैकी १४ टक्के खर्च सिंचनावर झाला होता तर नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खर्चाचे हे प्रमाण ३३ टक्के एवढे होते. ९व्या पंचवार्षिक योजनेअखेर पर्यत राज्याने एकूण रु. २३ हजार ६२२ कोटी सिंचनावर खर्च केले. असे असतानाही राज्यातील लागवडीखालील क्षेत्रापैकी केवळ १७.५ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. देशपातळीवर हे प्रमाण ४३ टक्के एवढे आहे. १९९०-९१ पासून राज्यासाठी हे प्रमाण १५ ते १७ टक्क्यांदरम्यानच राहिले आहे.

राज्य नियोजन मंडळाच्या अहवालानुसार दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ठरविल्यापेक्षा २८ टक्के अधिक खर्च होऊनही ठरविल्याच्या केवळ ३५ टक्केच सिंचन क्षमता निर्माण झाली. रु. १० हजार ६४४ कोटी खर्च करून १४.३४ लक्ष हेक्टर सिंचन निर्मितीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र रु. १३ हजार ७०४ कोटी खर्च होऊन ५.०५ लक्ष हेक्टर सिंचन निर्मिती झाली.

निर्मित सिंचन क्षमतेचाही पूर्ण वापर नाही

निर्माण केलेल्या ५७ लाख ९८ हजार हेक्टर सिंचन क्षमतेपैकी केवळ ३१ लाख ५९ हजार हेक्टर (५४.४८ टक्के) सिंचन क्षमतेचाच प्रत्यक्ष वापर होतो. साठविलेले पाणी वाहून नेणाऱ्या कालव्यांच्या बांधकामाकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यासाठी कारणीभूत असल्याचे मत नियोजन आयोगाच्या राज्य विकास अहवालात मांडले आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीनुसार तर १०व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२००२-०७) सिंचनावर २७.५ टक्के म्हणजे १५ हजार २१ कोटी खर्च झाले. एवढा खर्च होऊनही वर्ष १९९९-२००० मध्ये निर्माण झालेले ३८ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षेत्र वाढण्याऐवजी वर्ष २००५-०६ मध्ये ते ३८ लाख १० हजार हेक्टर एवढे कमी झाले.

वाढण्याऐवजी कमी झालेले सिंचन क्षेत्र

तक्ता क्र. ३३

(क्षेत्र हजार हेक्टरमध्ये)

अनु क्र.	वर्ष	विहीरी	इतर साधने	एकूण सिंचित क्षेत्र	पिकाखालील एकूण क्षेत्र	एकूण सिंचित क्षेत्राशी पिकाखालील सिंचित क्षेत्राशी टक्केवारी
१.	१९९९-००	२,२८५	१,०१२	३,८७३	२२,३८२	१७.३०
२.	२०००-०१	२,२६५	९८७	३,८५२	२१,६१९	१७.८२
३.	२००१-०२	१,९२२	१,०५३	३,६६७	२२,४०५	१६.३७
४.	२००२-०३	१,९३१	१,०४०	३,६६८	२२,३८७	१६.३८
५.	२००३-०४	१,९१४	१,०३०	३,६३६	२२,१९०	१६.३९
६.	२००४-०५	१,९४२	१,००१	३,६६५	२२,३७६	१६.३८
७.	२००५-०६	२,०७७	१,०७०	३,८१०	२२,५५६	१६.८९
८.	२००६-०७	२,१०९	१,१३७	३,९५८	२२,५५७	१७.५५

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००८-०९

गेल्या ९ वर्षात प्रत्यक्ष वापरातील सिंचन उद्दिष्टांच्या केवळ २५ टक्के

- जून २००८ पर्यंत राज्यात एकूण ५६ हजार ४०० पाटबंधारे पूर्ण झाले.
- जून २००८ पर्यंत राज्यात ७ हजार ८२० पाटबंधारे प्रगती पथावर होते.
- जून २००० मध्ये असलेली ४६.८६ लाख हेक्टर सिंचन क्षमता जून २००८ केवळ ५७.९८ लाख हेक्टर एवढीच वाढली म्हणजे वर्ष २००० ते २००८ पर्यंत केवळ ११.१२ लाख हेक्टर एवढीच सिंचन क्षमता वाढल्याचे दिसून येते.
- निर्मित झालेल्या एकूण सिंचन क्षमतेपैकी वर्ष २००७-०८ मध्ये केवळ ३१.५९ लाख हेक्टर क्षमतेचा प्रत्यक्ष वापर करण्यात आला.
- गेल्या ९ वर्षात शासनाने सिंचनावर रु. ५४ हजार ४७ कोटी खर्च केले. या ९ वर्षाच्या कालावधीत शासनाने ठरविलेल्या उद्दिष्टाच्या ५० टक्के उद्दिष्ट साध्य झालेले नाही. तर प्रत्यक्ष वापरातील सिंचन क्षमता ठरविलेल्या उद्दिष्टाच्या केवळ २५ टक्केच साध्य झाली आहे.

सिंचनातील विषमता

राज्यातील सिंचन क्षेत्राचा विकास विषम असून ५० टक्क्यांहून अधिक सिंचित क्षेत्र पुणे, कोल्हापूर, अहमदनगर या पश्चिम महाराष्ट्रातील पट्ट्यात एकवटलेले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील एकूण सिंचित क्षेत्रापैकी १८ टक्के क्षेत्र उसाखाली आहे, उसाची लागवड मात्र एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी ३ टक्के क्षेत्रावरही नाही.

७५ टक्के सिंचनाचा लाभ २ हेक्टरपेक्षा अधिक जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना होतो तर १ हेक्टरपेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना अवघ्या १० टक्के सिंचनाचा लाभ होतो. सरासरी ४ हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांकडून ८० टक्के भूजलाचा वापर होतो.

अपूर्ण सिंचन प्रकल्प

अपूर्ण सिंचन प्रकल्प व त्यांच्या वाढत जाणाऱ्या किंमतीमुळे अर्थव्यवस्थेवर येणारा ताण ही राज्यासाठी चिंतेची बाब बनली आहे. १९६० ते १९८० च्या दशकात सुरू झालेल्या १६ निवडक प्रकल्पांचा अभ्यास असे दर्शवितो की, मार्च २००२ अखेर प्रकल्पाच्या मूळ किमतींमध्ये सरासरी १,४०२ टक्क्यांनी वाढ झाली. वाढ झालेल्या किमतीच्या सरासरी ८९ टक्के खर्च होऊनही प्रकल्पाच्या क्षमतेच्या केवळ ६४ टक्के सिंचन क्षमता प्रत्यक्षात साध्य झाली होती.

कृष्णा खोरे प्रकल्पाचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास वर्ष १९९६ मध्ये प्रकल्प सुरू झाला त्यावेळेस २७ मोठे, ३९ मध्यम व ३५५ लघु प्रकल्प असे एकूण ४२१ प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु १२ वर्षामध्ये म्हणजे वर्ष २००८ पर्यंत केवळ १० मोठे, २७ मध्यम व २०८ लघु असे २४५ प्रकल्पच पूर्ण करता आले होते. *(विधान परिषद २६ डिसेंबर २००८, तारांकित प्रश्न क्र. ४९८२९)*

अपूर्ण प्रकल्पांचा अर्थव्यवस्थेवर ताण

राज्य शासनाने स्थापन केलेल्या पाटबंधारे विकास महामंडळांनी सिंचनासाठी ३१ मार्च २००७ पर्यंत रु.७४ हजार ९९२ कोटी २० लाख एवढा निधी खर्च केला. सिंचन प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्यासाठी पाच सिंचन विकास महामंडळांची स्थापना १९९६-९८ मध्ये केली. त्यांच्याकडील ७३ मोठे, १३६ मध्यम, ८४२ लघु पाटबंधारे प्रकल्प असे १,०५१ प्रकल्प अजूनही पूर्ण झालेले नाहीत.

सिंचनावर होणारा भांडवली खर्च सिंचन विकास महामंडळांकडून होतो. अर्थसंकल्पबाह्य कर्जामध्ये सर्वात मोठा वाटा सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाचा आहे. महाराष्ट्र कृष्ण खोरे विकास महामंडळाच्या रोख्यांवरील व्याज प्रदानांवर १९९६-९७ मध्ये रु. ७०० कोटी खर्च झाला होता. २०००-०१ मध्ये ही रक्कम १,३०० कोटींवर पोहोचली आहे. वर्ष २००६-०७ चा अर्थसंकल्प सादर करताना वित्तमंत्र्यांनी सिंचन विकासासाठी निर्माण केलेली ५ महामंडळे बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे ठरविल्याचे म्हटले होते. या कटू निर्णयावर काही कार्यवाही केल्याचे मात्र त्यानंतरच्या काळात दिसलेले नाही.

रखडलेल्या सिंचन प्रकल्पांवर खर्च झालेला अधिकचा वेळ व निधी

तक्ता क्र. ३४

प्रकल्पाचे नाव	प्रकल्प सुरू झाला ती पंचवार्षिक योजना	प्रकल्पाची अंदाजित किंमत (मूळ)	प्रकल्पाची अंदाजित किंमत (सध्याची)	मूळ व सध्याची अपेक्षित किमत यातील तफावत	वाढलेल्या किमतीचे मूळ अंदाजाशी प्रमाण	मार्च २००२ अखेर झालेला खर्च	झालेल्या खर्चाचे प्रकल्पाच्या अंदाजित रकमेशी (सध्याची) प्रमाण	मार्च २००२ अखेर प्रकल्पाच्या क्षमतेच्या तुलनेत प्रत्यक्ष साध्य
भातसा	५	१६४११	३२२४९	१५८३८	९६.५१	२४६४२	७६.४१	८.९३
भीमा	३	४२५८	९१९००	८७६४२	२०५८.२९	८५८६०	९३.४३	२१४.५३
चासकमान	५	२२४८	३४७१४	३२४६६	१४४४.२२	२८९२५	८३.३२	२१.२१
जायकवाडी (I & II)	५	१२७३६	७९६८७	६६९५१	५२५.६८	७७९३२	९७.८०	२३६.९३
खडकवासला	२	११६२	३४५०४	३३३४२	२८६९.३६	३२२२१	९३.३८	६२.१५
कोयना कृष्णा (एलआयएस)	६	२५९१०	१०८३००	८२३९०	३१७.९९	९२१४९	८५.०९	४.५२
कृष्णा	३	२७६६	३७०००	३४२३४	१२३७.६७	३८८९७	१०५.१३	८९.९५
कुआडी	६६-६९	१७९०	९१९००	९०११०	५०३४.०८	१०५२४५	११४.५२	९४.८८
सूर्या	७८-८०	१९३२	१७५१४	१५५८२	८०६.५२	२२८२०	१३०.३०	२२.५५
तिल्लारी (आयएस)	७८-८०	२१७२२	४२४०६	२०६८४	९५.२२	४८४१६	११४.१७	१.३३
उच्च गोदावरी	६६-६९	१४२०	१३३२३	११९०३	८३८.२४	११६९४	८७.७७	६६.१७
उच्च पेनगंगा	५	८४४८	८६१९९	७७७५१	९२०.३५	५४८४४	६३.६२	७९.९७
उच्च प्रवरा	५	१५८७	२८७१४	२७१२७	१७०९.३३	१२००३	४१.८०	४.८३
उच्च वर्धा	५	३९८८	६६१८६	६२१९८	१५५९.६३	६१८०३	९३.३८	७३.३३
विष्णुपुरी	७८-८०	७८९३	१९३२२	११४२९	१४४.८०	१८४१०	९५.२८	१८.५४
वारणा	४	३१०८	८९२००	८६०९२	२७७०.०१	४२९५५	४८.१६	१८.८१
एकूण		**११७३७९**	**८७३११८**	**७५५७३९**	**२२४२७.८९**	**७५८८१६**	**१४२३.५६**	**१०१८.६३**
सरासरी				**४७२३३.६९**	**१४०१.७४**		**८८.९७**	**६३.६६**

स्रोत: राज्य विकास अहवाल, नियोजन आयोग

रखडलेल्या सिंचन प्रकल्पांची उदाहरणे

पुरंदर उपसा सिंचन योजना

- पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेस सन १९९६ मध्ये मंजुरी जरी मिळाली असली तरी प्रत्यक्षात मात्र प्रकल्पाचे काम मे २००० मध्ये म्हणजे तब्बल ४ वर्षांनी सुरू झाले.
- परिणामी प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये १७८.१३ कोटींवरून रुपये ३१० कोटी इतका वाढला.
- सन २००१-०२ मध्ये रुपये ९७ कोटीचे काम झाल्यानंतर निधीअभावी काम बंद ठेवण्यात आले. तद्नंतर टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत य कामास निधी मंजूर झाला व एप्रिल २००४ मध्ये हे काम पुन्हा सुरू करण्यात आले.
- या योजनेंतर्गत पुरंदर, बारामती, दौंड व हवेली या तालुक्यातील २५ हजार १०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सन २००१ मध्ये सा वेगवेगळ्या टप्प्यात विभागलेल्या या प्रकल्पाच्या एकाही टप्प्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. अजूनही या प्रकल्पाच्या कामासाठी रुपये १२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजना

- पुणे जिल्ह्यातील रुपये ५६.९२ कोटींच्या जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेस सन १९९३ मध्ये मंजुरी मिळाली. मात्र प्रकल्पाचे काम वर्षानुवर्षे रखडल्यामुळे या प्रकल्पाची किंमत २७२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.
- आतापर्यंत या प्रकल्पावर रुपये १८१.६१ कोटी इतका म्हणजे मूळ योजनेच्या तिप्पट खर्च झाला आहे. १४ वर्षांपूर्वी मंजूर झालेली ही योजना अद्यापही पूर्ण झालेली नाही.
- या योजनेद्वारे जवळपास १४ हजार ८० हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट होते. परंतु योजनेच्या ढिसाळ अंमलबजावणीमुळे जू २००८ अखेरपर्यंत केवळ ६ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचन क्षमता निर्माण करता आली.
- या योजनेचे काम ३ टप्प्यात विभागले असून प्रकल्पाचा तिसरा टप्पा अद्यापही पूर्ण झालेला नाही. जनाई उपसा सिंचन प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी रुपये ५९.४१ कोटींची तर शिरसाई उपसा सिंचन योजनेचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी रुपये २२.२५ कोटी इतक्या रकमेची आवश्यकता आहे.

नाशिक जिल्हा

नाशिक जिल्ह्यातील जवळपास ३५६ वेगवेगळे सिंचन प्रकल्प नादुरुस्त असून या प्रकल्पांमुळे निर्माण होऊ शकणारे जिल्ह्यातील सुमारे वीस हजा एकर शेतीक्षेत्र सिंचनापासून वंचित आहे. पाण्याचा अपेक्षित साठा होत नसल्यामुळे त्याचा परिणाम भूभागातील पाण्याच्या पातळीवर होत आहे. नादुरुस्त असणाऱ्या या ३५६ सिंचन प्रकल्पांना ३३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

स्रोत: अंदाज समिती, २००८-९ चा २६वा अहवा

वीज

राज्यातील वीज निर्मितीचा खेळखंडोबा

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर काही काळ असा होता की, राज्याच्या अर्थसंकल्पात उर्जा क्षेत्राचा महसुली वाटा असायचा. तथापि, त्यानंतरच्य काळात या क्षेत्राची कार्यक्षमता वाढविण्याकडे झालेले दुर्लक्ष व एकूणच या क्षेत्राच्या स्वयंपूर्णतेविषयी उदासीनता आदी कारणांमुळे परिस्थिती नेमकी उल झाली असून आता राज्याच्या अर्थसंकल्पातही उर्जा क्षेत्रासाठी पुरेशा तरतुदी करणे अवघड होऊन बसले आहे. उर्जा क्षेत्रातून मिळणाऱ्या महसुलातून वी निर्माण करण्याइतके उर्जा क्षेत्र स्वयंपूर्ण होणे अशक्य होऊन बसले आहे. अंतर्गत स्त्रोतातून वीज निर्मिती प्रकल्प उभे राहणे येथून पुढे अवघड आहे.

- राज्य नियोजन मंड

राज्य नियोजन मंडळाच्या अहवालावरून स्पष्ट होणाऱ्या बाबी

- दारिद्र्यरेषेवरील १२ लाख २० हजार व दारिद्र्यरेषेखालील १८ लाख ७२ हजार कुटुंबांच्या घरांना वीज जोडण्या नाहीत.
- १ लाखाहून अधिक कृषिपंपांचे विद्युतीकरण अद्याप व्हावयाचे आहे.
- सध्या चालू असलेल्या वीज निर्मिती केंद्रांची केवळ ७५ टक्केच क्षमता वापरली जात आहे.
- यासाठी जुनी यंत्र सामुग्री व संच, निकृष्ट प्रतीचा कोळसा, नियोजनाचा अभाव कारणीभूत आहे.

गेल्या दहा वर्षात विजेची मागणी ४० टक्क्यांनी वाढली असताना वीज निर्मिती मात्र २.५ टक्केच वाढली आहे. वीज निर्मितीमध्ये १९९१ ते ०१ या कालावधीत ७.६८ टक्के तर २००१ ते २००८ या कालावधीत केवळ ०.४० टक्केच वाढ झाली.

वीज निर्मिती करण्याबाबत शासनाने केलेल्या पोकळ घोषणा

- ४९५ मेगावॅटचा सफाळे प्रोजेक्ट, ४६० मेगावॅटचा अमरावती प्रोजेक्ट आणि भिवपूरी येथील ४२० मेगावॉटचा प्रोजेक्ट काम सुरू होण्यापूर्वीच बासनात गुंडाळण्यात आले आहेत.
- रायगड जिल्ह्यातील विलेभगाड येथे १ हजार मेगावॅटचा थर्मल पॉवर प्रोजेक्ट पर्यावरण विभागाची परवानगी मिळाल्यानंतरही सुरू झाला नाही.
- विलेभगाड ऐवजी शहापूर येथे ५ हजार ६०० मेगावॅटचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु हा ही प्रकल्प अजून सुरू झाला नाही.
- बेस्टने देवनार येथे ३६० मेगावॅटचा प्रकल्प उभारण्याची घोषणा केली होती. परंतु या प्रकल्पासंदर्भातही पुढे कार्यवाही झालेली नाही.

संदर्भ: दै. महाराष्ट्र टाईम्स, २६ जुलै २००८

ा निर्मिती आणि विजेचा वापर

- पाचव्या पंचवार्षिक योजनेत उर्जा क्षेत्रावर राज्य शासनाने ३४.२ टक्के इतका खर्च केलेला होता. १० व्या पंचवार्षिक योजनेत तो ९.६ टक्क्यांवर घसरला आहे. यावरून सार्वजनिक क्षेत्राकडून होणारी गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे लक्षात येते.
- खाजगी क्षेत्राला उर्जा निर्मितीत मोठ्या प्रमाणावर प्राधान्य दिले गेले आहे तरी अलीकडच्या काळात मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. खाजगी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर विजेचे उत्पादन करण्यास सक्षम झालेले नाही हेच दिसून येते.
- वीज गळती व विजेची होणारी चोरी यामुळे मोठ्या प्रमाणावर विजेच्या पुरवठ्यावर परिणाम होतो. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या पारेषण व वितरण व्यवस्थेतील पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे आणि विजेच्या अनधिकृत वापरावर पायबंद घालणे गरजेचे आहे.
- वर्ष २००६-०७ मध्ये ६२ हजार ८५ दशलक्ष किलोवॅट तास एवढी असलेली विजेची मागणी वर्ष २००७-०८ मध्ये ६९ हजार ८३८ दशलक्ष किलोवॅट तास एवढी वाढली. म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत विजेच्या मागणीत ७ हजार ७५३ दशलक्ष किलोवॅट तास (१२.५ टक्के) एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढ झाली.
- वर्ष २००७-०८ मध्ये दिनांक १८ डिसेंबर २००७ रोजी १७ हजार ४८९ मेगावॅट एवढी विजेची कमाल मागणी होती व ती ४ हजार ६१८ मेगावॅटचे भारनियमन करून भागविण्यात आली. तर २००८-०९ मध्ये १७ एप्रिल २००८ रोजी १४ हजार ८५९ मेगावॅट एवढी विजेची कमाल मागणी होती व ती ४ हजार ७७२ मेगावॅटचे भारनियम करून भागवण्यात आली.
- एकूण वीज निर्मितीत औष्णिक उर्जेचा वाटा ५१ टक्के, जलजन्य उर्जेचा वाटा १७ टक्के, अक्षय उर्जेचा वाटा १३ टक्के, नैसर्गिक वायुजन्य उर्जेचा वाटा ११ टक्के, बंदिस्त उर्जेचा वाटा ६ टक्के तर अणुशक्तिजन्य ऊर्जेचा वाटा केवळ २ टक्के आहे. त्यामध्ये खाजगी क्षेत्रांना प्राधान्य देऊन जलजन्य उर्जा क्षेत्र आणि अणुशक्तीजन्य उर्जा क्षेत्रात वाढ करण्यास मोठी जागा असूनही त्या प्रकारचे प्रयत्न शासन पातळीवर झालेले नाहीत.

वीज निर्मितीत खाजगी क्षेत्राचा वाटा

- खाजगी क्षेत्राला वीज निर्मिती करण्याला प्राधान्य देण्यात आले असले तरी एकूण विद्युत निर्मितीत टाटा पॉवर (१४.६टक्के) वगळता रिलायन्ससह (५.६टक्के) जिंदाल पॉवर, सिपको, इस्पात एनर्जी, स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी आणि इस्सार यांचा वाटा विद्युत निर्मिती क्षेत्रात अपेक्षेप्रमाणे वाढलेला नाही. आजही विद्युत निर्मितीत महानिर्मितीचा वाटा (६५.५ टक्के) एवढा मोठा आहे.
- देशातील १४ प्रमुख विद्युत निर्मिती करणाऱ्या राज्यांचा विचार करता एकूण विद्युत निर्मितीत महाराष्ट्र राज्य जरी अव्वल स्थानावर असले तरी प्रति लाख लोकसंख्येमागे स्थापित विद्युत क्षमेतचा आणि विद्युत निर्मितीचा विचार करता राज्य ६ व्या व ७ व्या स्थानावर फेकले गेले आहे.

प्रमुख राज्यांची मार्च २००८ अखेर विद्युत क्षमता

तक्ता क्र. ३५

अ.क्र.	राज्य	स्थापित क्षमता (मेगावॅट)	प्रति लाख लोकसंख्यमागे स्थापित क्षमता (मेगावॅट)	विद्युत निर्मिती (दशलक्ष कि.तास)	प्रति लाख लोकसंख्येमागे वि.नि. (दशलक्ष कि.तास)
१	हिमाचल प्रदेश	१,८५३	२८.४०	१३,९५६	२१३.९२
२	पंजाब	६,५२२	२४.६४	२१,०५८	७९.५७
३	तामिळनाडू	१३,५१९	२०.४३	५५,७४३	८४.२५
४	गुजरात	१०,९९१	१९.५२	५९,६३९	१०५.९३
५	हरियाणा	४,२९०	१८.१६	१३,६३२	५७.७१
६	**महाराष्ट्र**	**१६,६१४**	**१५.४८**	**७९,७२१**	**७४.२८**
७	कर्नाटक	८,७९५	१५.३९	३०,६७१	५३.६८
८	आंध्र प्रदेश	११,८२४	१४.४५	६९,२७१	८४.६६
९	मध्य प्रदेश	७,७३९	११.२५	४६,५९७	६७.७७
१०	केरळ	३,४९५	१०.२५	१०,९२५	३२.०४
११	ओरिसा	३,८०८	८.५९	३९,७८७	१००.१६
१२	पश्चिम बंगाल	७,२९१	८.३४	३९,१९७	४४.८३
१३	उत्तर प्रदेश	९,२७८	४.९०	८४,७५६	४४.७४
१४	बिहार	१,७६८	१.९०	१५,२४६	१६.३६
१५	भारत	१,४१,०८०	१.२२	७,०४,४५१	६.०८

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पहाणी, २००८-०९

- प्रति लाख लोकसंख्येमागील स्थापित क्षमता व विद्युत निर्मिती पाहता हिमाचल प्रदेश, पंजाब, तामिळनाडू, गुजरात, हरियाणा ही राज्य महाराष्ट्रापेक्षा आघाडीवर आहेत.
- ओरिसा व आंध्रप्रदेश ही २ राज्येही प्रति लाख लोखसंख्येमागे विद्युत निर्मितीच्या निकषाचा विचार करता महाराष्ट्राच्या पुढे असल्याचे दिसून येते.

◆◆◆

समाजातील दुर्बल घटकांच्या आणि विशेषत: अनुसूचित जाती, जमाती यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन या विकास करण्याकरिता व त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यासाठी शासन संविधानाच्या अनुच्छेद ४६ न्वये कटिबद्ध आहे. या सांविधानिक जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आदिवासींची स्थिती शासनाचे अपयश स्पष्ट करणारी आहे.

यातील आदिवासींची दूरावस्था

- २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासींची लोकसंख्या ८५ लाख ७७ हजार असून राज्याच्या एकूण लोकसंख्येशी तिचे प्रमाण ८.९ टक्के आहे.
- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार ९१.११ टक्के आदिवासी जनता दारिद्र्यरेषेखाली असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ११ हजार वा त्यापेक्षा कमी आहे.
- आदिवासींमधील अर्भक मृत्यूदर ७३.६ एवढा अधिक आहे. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींमध्ये हे प्रमाण १२४ एवढे गंभीर आहे. आदिवासींमधील बाल मृत्यूदर सुद्धा एकूण राज्याच्या तुलनेत अधिक असून, गडचिरोलीमध्ये तो १४४, यवतमाळमध्ये १४३ व चंद्रपूरमध्ये १३७ एवढा आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार ६४.२ टक्के आदिवासी महिला ॲनिमिक (अशक्त) असून ३५.४ टक्के आदिवासी बालकांचे वजन त्यांच्या वयाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. तर १९ टक्के बालकांची वाढ खुंटलेली आहे.
- आदिवासी भागातील आरोग्य सुविधा अपुऱ्या असून, १ लाख लोकसंख्येमागे सरासरी केवळ ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. प्रत्येकी ३ हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र असा निकष असताना प्रत्यक्षात मात्र ७ ते ८ हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र आहे.
- ठाणे जिल्ह्यामध्ये लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे ६४ प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता असताना केवळ ४८ अस्तित्वात आहेत. तर ४३१ उपकेंद्रांची आवश्यकता असताना ३२४ उपकेंद्रे अस्तित्वात असून त्यापैकी १९४ उपकेंद्रे बांधलेलीच नाहीत. अनेक उपकेंद्रांमध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी नसून बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांच्या ३६ टक्के जागा रिक्त आहेत. आरोग्य केंद्रांमध्ये औषधांचा साठा पुरेसा नसून ५० टक्क्यांपेक्षा कमी महिलांना प्रसुतीपश्चात उपचार मिळतात. लसीकरणाचे प्रमाण केवळ ७० टक्के आहे.
- तिसऱ्या व चौथ्या श्रेणीतील कुपोषित मुलांचे प्रमाण सर्वात जास्त गडचिरोली, नंदुरबार व अमरावती या तीन जिल्ह्यांमध्ये असून या जिल्ह्यांमधील काही भागात (जसे अमरावतीमध्ये धारणी, नंदुरबारमध्ये तळोदा, ठाणे जिल्ह्यात मोखाडा) ते अत्यंत गंभीर आहे.
- १९९३-९६ या काळात मेळघाटात ४ हजार मुले कुपोषणाने दगावली, यापैकी ४२ टक्के मुले १ ते ६ वयोगटातील होती.
- ४१.८ टक्के आदिवासी भूमिहीन असून, कातकरी व कोलाम या आदिम जमातीपैकी अनुक्रमे ८३ टक्के व ६३ टक्के लोक भूमिहीन आहेत. शिवाय जमिनधारकांपैकी ७० टक्क्यांहून अधिकांकडे २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे.
- आदिवासी जमीन पुन:स्थापित करण्यासंदर्भात दाखल ४५,६३४ प्रकरणांपैकी ५६ टक्के प्रकरणात जमीन आदिवासींच्या नावे पुन:स्थापित झालेली नाही.
- देशाच्या तुलनेत ७.३ टक्के एवढे वनक्षेत्र राज्यात आहे, मात्र संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची संख्या देशाच्या तुलनेत केवळ ३.२ टक्के एवढीच आहे.
- ९४ टक्के आदिवासी शेतीवर थेटपणे वा शेतमजूर म्हणून अवलंबून आहेत. आदिवासींच्या उत्पन्नापैकी ७९ टक्के उत्पन्न शेतीतून येते.
- ठाणे येथील रोजगार सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या सुशिक्षित आदिवासींपैकी केवळ ४ टक्के बेरोजगारांना शासकीय नोकरीत सामावून घेतले गेले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकलेल्या व नोंदणी केलेल्या १३९२ बेरोजगारांपैकी केवळ १४ म्हणजे १ टक्के बेरोजगारांनाच शासकीय नोकरी मिळाली.
- हंगामी स्थलांतर रोखण्यामध्ये रोजगार हमी योजना प्रभावहीन ठरली असून, मजुरी व धान्य मिळण्यात होणारा विलंब व इतरत्र मिळणारी अधिक मजुरी त्यास कारणीभूत ठरली आहे.
- स्थलांतरित आदिवासी मजुरांच्या हक्काचे संरक्षण करण्यात कामगार विभाग अपयशी ठरला असून, हे मजूर नव्या युगातले 'गुलाम' बनून राहिले आहेत.
- राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ७७.२७ टक्के असून त्या तुलनेत राज्यातील आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण ५५.२ टक्के एवढे आहे. धुळे, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यातील आदिवासींमधील साक्षरता २५ टक्के एवढी कमी असून, भामरागड व अहेरी या गडचिरोलीतील एकात्मिक आदिवासी प्रकल्पांमधील साक्षरता अनुक्रमे १५ व २० टक्के एवढी कमी आहे.

- ५व्या इयत्तेपुढे आदिवासी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत सातत्याने घट होताना दिसते. सातवी इयत्तेपुढे शिक्षण देणाऱ्या माध्यमिक आश्रमशाळांची संख्या पुरेशी नसल्यामुळे ८वीच्या स्तरावर होणारी गळती मोठी आहे.
- १०वीच्या स्तरावर होणारी ७४ टक्के गळती हे आश्रमशाळांतील शिक्षणाचा दर्जा योग्य नसल्याचे द्योतक आहे.
- १२वी पर्यंत शिकणाऱ्या आदिवासी पुरुषांचे प्रमाण ५.२३ टक्के आहे तर महिलांसाठी हेच प्रमाण केवळ २.४० टक्के एवढे आहे.
- तंत्र शिक्षणाबाबत आदिवासींची सर्व मदार ही शासकीय संस्था व अनुदानित संस्थांवर आहे. विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांमध्ये केवळ ०.३६ टक्के आदिवासी होते.
- आदिवासी जीवनाशी विसंगत शिक्षण पद्धती व शिक्षणाचा खालावलेला दर्जा अशा विचित्र कात्रीत सापडलेला आदिवासी विद्यार्थी शाळेतून गळल्यानंतर ना त्याचेकडे परंपरागत कौशल्ये असतात, ना त्याला शेतात काम करण्याची माहिती असते, ना त्याला शेतीशिवाय दुसरे कोणते काम मिळते. जे थोडे शिक्षणात यशस्वी होतात त्यांना बहुतेकदा निम्नस्तरावरील शासकीय नोकरी मिळते.

संदर्भ : महाराष्ट्र राज्य विकास अहवाल, नियोजन आयो

आदिवासी उपयोजनेचा बोजवारा

आदिवासी उपयोजनेचा रु. ८ हजार कोटींचा अनुशेष

१९९३-९४ पासून आदिवासी उपयोजना सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार स्वतंत्रपणे सादर केली जाते. त्यानुसार एकूण आदिवासी लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के (१९९१ जनगणना) एवढी असल्याने राज्य योजनेत त्याच प्रमाणात म्हणजे ९ टक्के एवढी आर्थिक तरतूद आदिवासी उपयोजनेसाठी राखणे व प्रत्यक्षात खर्च करणे अपेक्षित आहे.

आदिवासी उपयोजनेचा अनुशेष

तक्ता क्र. ३६

रु. कोटीत

१	२	३	४	५	६
वर्ष	वार्षिक योजना नियतव्यय	आदिवासी उपयोजना ९ टक्क्याप्रमाणे अपेक्षित तरतूद	आदिवासी उपयोजना प्रस्तावित तरतूद	प्रत्यक्ष खर्च	अनुशेष (३-५)
१९९३-९४	३८०४.००	३४२.३६	२६५.००	२४५.९६	९६.४०
१९९४-९५	४४००.००	३९६.००	३३०.००	३३०.००	६६.००
१९९५-९६	६०६९.००	५४६.२१	४१२.५०	४०३.१०	१४३.११
१९९६-९७	८२८४.००	७४५.५६	५८८.५८	५०४.५१	२४१.०५
१९९७-९८	८३२५.००	७४९.२५	५५०.००	४७९.३०	२६९.९५
१९९८-९९	११६००.७३	१०४४.०६	५६१.००	५२१.०७	५२२.९९
१९९९-००	१२१६१.६६	१०९४.५४	५८०.५९	४६७.६५	६२६.८९
२०००-०१	१२३३०.००	११०९.७०	५२५.००	४४४.०८	६६५.६२
२००१-०२	११७२०.५६	१०५४.८५	६०७.५०	३६६.७७	६८८.०८
२००२-०३	१११३५.३७	१००२.१८	४४०.४०	२४४.१०	७५८.०८
२००३-०४	१२६५०.००	११३८.५०	६४१.५०	२४४.३६	८९४.१४
२००४-०५	१९९८३.९०	१७९८.५५	७८७.८०	३८०.३०	१४१८.२५
२००५-०६	११०००.००	९९०.००	९९०.००	९२८.५३	६१.४७
२००६-०७	१४८२९.००	१३३४.६१	१०००.००	१३२३.०४	११.५७
२००७-०८	२०२००.००	१८१८.००	१७९८.००	१६५९.००	१५९.००
२००८-०९	२५०००.००	२२५०.००	२२३८.००	६३३.००*	१६१७.००
				एकुण	८२३९.६०

* - वर्ष २००८-०९चा खर्च डिसेंबर २००८ पर्यंतचा. (स्रोत: वार्षिक योजना भाग-१ तसेच २००७-०८ व २००८-०९ वर्षातील खर्चाच्या रकमांसाठी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००८-०९)

- २००५-०६ हे वर्ष वगळता एकाही वर्षी शासनाने आदिवासी उपयोजनेसाठी राज्य योजनेच्या ९ टक्के तरतूद केलेली नाही.
- २००६-०७ वगळता एकाही वर्षी शासनाने केलेली तरतूद पूर्णपणे खर्च केलेली नाही.
- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००८-०९ नुसार वर्ष २००८-०९ मधील पहिल्या ९ महिन्यांमध्ये आदिवासी उपयोजनेवर मंजूर नियतव्ययाच्या केवळ २८.२८ टक्के खर्च झालेला आहे.

आदिवासी शासनाच्या प्राथम्यक्रमात नाहीत

तरतूद उपलब्ध न झाल्यानेच उपयोजनेवर खर्च नाही - आदिवासी मंत्र्यांची कबुली

आदिवासी विकास मंत्र्यांनी आदिवासी उपयोजनेसाठी राज्य योजनेच्या ९ टक्के निधी खर्च न होण्याची कारणे पुढीलप्रमाणे दिली आहेत:

- वित्त विभागाकडून राज्याच्या वार्षिक उपयोजनेकरिता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या साधनसंपत्तीच्या मर्यादेत, राज्याचे प्राथम्यक्रम लक्षात घेऊन मंत्रिमंडळ नियोजन उपसमितीच्या निर्णयानुसार वार्षिक योजनेतील नियतव्ययाचे वाटप करण्यात येत असते. या वाटपात आदिवासी उपयोजनेसाठी किती नियतव्यय राखून ठेवण्यात यावा याचा निर्णयही मंत्रिमंडळ नियोजन समितीकडून घेण्यात येत असतो.
- आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला पूर्ण नियतव्यय, कोअर नियतव्यय या संकल्पनेमुळे अर्थसंकल्पित करण्यास वित्त विभागाकडून परवानगी न मिळाल्यामुळे बहुतांश वर्षामध्ये कमी निधी अर्थसंकल्पित झाला. परिणामी नियतव्ययाच्या तुलनेत कमी खर्च दिसून येतो.
- अर्थसंकल्पित झालेल्या तरतुदी खर्च करण्यास परवानगी देताना वित्त विभागामार्फत काही आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला फक्त ५० टक्के तरतूद खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत होती. त्यामुळे वर्ष अखेर फक्त ५० टक्के तरतूद खर्च करण्याच्या दृष्टीनेच नियंत्रक अधिकारी योजना राबवित होते.
- सुधारित अंदाज मंजूर करताना वित्त विभागाकडून निधीमध्ये कपात केली जाते. आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बहुतेक योजना या लाभार्थी योजना असल्याने, लाभार्थी निवड होऊन प्रत्यक्ष लाभ देण्यास मार्च महिना येतो. तथापि, सुधारित अंदाजात होणाऱ्या कपातीचा फटका सदर योजना राबविताना झाला असल्यामुळे निधी खर्च होत नाही.
- याशिवाय आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची देयके मार्च महिन्यात कोषागारात जमा होत असल्याने व कोषागारातून ही देयके पारित होत नसल्यानेही निधी अखर्चित राहतो.
- बहुतेक वेळा वित्त विभागाकडून योजनांना मागणीप्रमाणे निधी अर्थसंकल्पित करण्यास मंजुरी मिळत नसल्याने निधी खर्च करता येत नाही.

स्रोत: महाराष्ट्र विधानसभा, तिसरे अधिवेशन ०६, अतारांकित प्रश्नोत्तरांची १३२ वी यादी. प्रश्न क्र. ४४२८३

प्रकल्पस्तरीय नियोजन व आढावा समित्या मोडीत

योजना तयार करण्यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग नाही

उपयोजनेंतर्गत योजनांच्या अंमलबजावणीचे पुनर्विलोकन करण्यासाठी तसेच प्रकल्प स्तरावरील योजना तयार करताना नियोजन प्रक्रियेमध्ये आदिवासींना सहभागी करण्यासाठी ११ फेब्रुवारी १९९३च्या शासन निर्णयानुसार २१ प्रकल्पांच्या स्तरावर नियोजन व आढावा समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

या समित्यांनी प्रकल्प क्षेत्रासाठी मूलभूत सोयींचा आराखडा तयार करणे, विविध योजनांचा आढावा घेणे, आदिवासी विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेणे, दुर्गम क्षेत्रासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे संनियंत्रण करणे, जिल्हा व प्रकल्प स्तरावरील उपयोजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांमध्ये समन्वय साधणे इत्यादी अपेक्षित होते.

प्रकल्पक्षेत्रातील विधानसभेचा आदिवासी सदस्य या समितीचा अध्यक्ष असे. त्या प्रकल्प क्षेत्रात आणखी विधान सभा/विधान परिषद आदिवासी सदस्य असतील तर त्यांनाही समितीवर नियुक्त करण्यात येत होते. अपर आयुक्त आदिवासी विकास, हे उपाध्यक्ष तर प्रकल्पक्षेत्रातील आदिवासी संसद सदस्य, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती व महिला बाल कल्याण समितीचा अध्यक्ष हे विशेष आमंत्रित असत.

मात्र उपयोजनेवर संनियंत्रण ठेवणारी ही यंत्रणा मोडीत निघाल्याचे दिसते. २००७-०८ या वर्षीच्या आदिवासी उपयोजनेचा आराखडा तयार करण्यासाठी प्रकल्पांना देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये या समित्या अस्तित्वात नसल्याने अपर आयुक्तांच्या पर्यवेक्षणाखाली आराखडा तयार करण्यात यावा असे म्हटले आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत योजनेच्या संनियंत्रणासाठी स्वतंत्र यंत्रणा हवी

आदिवासी विकास विभागामार्फत विविध विभागांना निधी पुरविला जातो. मात्र या निधीचा उपयोग योग्य प्रकारे होतो किंवा नाही. याचे मूल्यमापन करणारी व संनियंत्रण ठेवणारी यंत्रणा विभागाकडे नाही. विविध विभागांना वाटप करण्यात आलेल्या निधीच्या विनियोगाचा तपशीलही आदिवासी विकास विभागास प्राप्त होत नाही. हे स्थायी समितीच्या अहवालावरून व आदिवासी उपयोजनेच्या पुस्तिकेतील प्रत्यक्ष खर्चाच्या रिकाम्या रकान्यांवरून स्पष्ट होते. वर्ष २००२ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या विभाग संलग्न स्थायी समितीने याची दखल घेत विभागांतर्गत एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून असे संनियंत्रण ठेवण्याची शिफारस केली होती.

आदिवासी उपयोजनेचा निधी इतरत्र वळविता यावा यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल

पायाभूत विकासाच्या प्रकल्पांसाठी (लघुपाटबंधारे, वर्गखोल्यांचे बांधकाम, रस्ते, विद्युत, पाणी पुरवठा इ.) निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात २६ जुलै २००४ च्या शासन निर्णयानुसार पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली होती:

- ज्या योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त असेल अशा योजनांकरिता लागणारा सर्व निधी आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करून दिला जाईल.
- ज्या योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ५१ ते ७९ टक्के असेल अशा प्रकल्प / कामांना आदिवासी उपयोजनेतून व सर्वसाधारण योजनेतून त्या त्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- ज्या प्रकल्प/योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा पायाभूत सुविधांच्या प्रकल्प/कामांना उपयोजनेतून निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

मात्र राजकीय सोयीसाठी दिनांक १० नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीच्या निर्णयात बदल करण्यात आला.

- ज्या योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त असेल अशा योजनांकरिता लागणारा सर्व निधी आदिवासी उपयोजनेतून प्राधान्याने उपलब्ध करून दिला जाईल.
- उर्वरित निधी ज्या योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ५१ ते ७९ टक्के असेल अशा प्रकल्प / कामांना (१०० टक्के) उपलब्ध करून देण्यात येईल.
- ज्या प्रकल्प/योजनांमधील आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ५१ टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा पायाभूत सुविधांच्या योजनांसाठीही उपयोजनेतून विशेष बाब म्हणून लोकसंख्येची अट शिथिल करून निधी उपलब्ध करून दिला जाईल.

'विशेष बाब' या संज्ञेची कोणतीही व्याख्या उपलब्ध नाही.

आदिवासींचे दारिद्र्य

राज्यातील आदिवासी रोजगार, शिक्षण, आरोग्य आदी मूलभूत सुविधांअभावी दरिद्री राहिला आहे. खाली दिलेल्या तक्त्यांमधील आकडेवारी आदिवासींची दुर्दशा स्पष्ट करणारी आहे. एकीकडे आदिवासींना त्यांच्या हक्काचा निधी प्राप्त होत नाही तर दुसरीकडे उपलब्ध होणारा निधी हा प्रत्यक्ष आदिवासींपेक्षा दलालांचे हित साधण्यासाठी अधिक खर्च होतो. झोपायला जागा नसताना आश्रमशाळांमधील मुलांना दिलेल्या मच्छरदाण्या, वीज पुरवठा नसताना पुरविलेले संगणक, सिलेंडरच्या किमती सामान्यांच्याही आवाक्याबाहेर असताना आदिवासींना दिलेले गॅस युनिट, धान्य व्यापाऱ्यांच्या हिताची खावटी कर्ज योजना ही याची उदाहरणे आहेत. कोट्यवधी खर्च होऊनही आदिवासींची परिस्थिती मात्र जैसे थेच आहे.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसूचित जमातीची कुटुंबे व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे

तक्ता क्र. ३७

अक्र	ए.आ.वि.प्र.	अनुसूचित जमातीची एकूण कुटुंबे	अनुसूचित जमातीची दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे	दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची टक्केवारी
१.	ठाणे (डहाणू)	६६४४७	५९५९५	८९.६९
२.	ठाणे (जव्हार)	४६५५६	४०९३९	८७.९३
३.	ठाणे (शहापूर)	२२२६०	१९७४३	८८.६९
४.	रायगड (पेण)	९९२९	९३९६	९४.६३
५.	नाशिक (कळवण)	४०४४६	३६७१७	९०.७८
६.	नाशिक (त्र्यंबक)	५८०१९	५२७७६	९०.९६
७.	धुळे (तळोदा)	६९६२२	६६३०५	९५.२४
८.	धुळे (नंदूरबार)	९१५८८	८३४९६	९१.१६
९.	जळगाव (यावल)	५९३५	५४७९	९२.३२
१०.	अहमदनगर (राजूर)	१३२०८	११४८६	८६.९६
११.	पुणे (घोडेगाव)	१४३४०	१२०४२	८३.९७
१२.	नांदेड (किनवट)	२०२८८	१७८३७	८७.९२
१३.	अमरावती (अकोला)	९३७८	८६९२	९२.६९
१४.	अमरावती (धारणी)	२७३२६	२३९७७	८७.७४
१५.	नागपूर (रामटेक)	१५११०	१३७१८	९०.७९
१६.	गोंदिया (देवरी)	२००९०	१८३९६	९१.५७
१७.	यवतमाळ (पांढरकवडा)	३६५६१	३३५६२	९१.७९
१८.	चंद्रपूर (राजूरा)	२८६८२	२६२८७	९१.६५
१९.	चंद्रपूर (चिमूर)	११०९१	१०१६५	९१.६५
२०.	गडचिरोली (एटापल्ली)	१२४४५	११७७२	९४.५९
२१.	गडचिरोली (धानोरा)	५४१३	४९२१	९०.९१
२२.	भामरागड	११८४६	१०८३५	९१.४७
२३.	राज्य एकूण आ.उ.यो.	६३४५८०	५७८१३६	९१.११

स्रोत: *आदिवासी उपयोजना*

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार आदिम जमातीसंदर्भातील निरीक्षणे

तक्ता क्र. ३८

अक्र		कातकरी	कोलाम	माडिया
१.	संबंधित जमातीची कुटुंबे असलेल्या गावांची संख्या	८११	४६०	५१२
२.	सर्वेक्षण केलेल्या गावांची संख्या	७८४	४३९	५१२
३.	सर्वेक्षण केलेल्या पाड्यांची संख्या	१७६०	१५९	७७
४.	सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांची संख्या	१४८६२	१४१८२	१३३५१
५.	कच्च्या घरात राहणारी कुटुंबे (%)	७६	८६	८६
६.	१ ते ४ महिने पिण्याच्या पाण्याचा तुटवडा असलेली गावे (%)	२७	२४	२८
७.	१ ते ४ महिने पिण्याच्या पाण्याचा तुटवडा असलेले पाडे (%)	३०	२८	३५
८.	मुख्य रस्त्यापासून दूर असलेली गावे (%)	४५	६३	७९
९.	मुख्य रस्त्यापासून ४ किमी पेक्षा जास्त अंतरावर असलेली गावे (%)	३०	४५	६४
१०.	मुख्य रस्त्यापासून दूर गावांपैकी डांबरी रस्ते असलेली गावे (%)	१६	२१	१०
११.	बारमाही रस्ते नसलेल्या पाड्यांची संख्या (%)	४२	४५	४९
१२.	भूमिहीन कुटुंबे (%)	८३	६३	१७
१३.	भूधारक कुटुंबांपैकी सिंचनाशिवाय जमीन असणारी कुटुंबे (%)	९६	९३	८७
१४.	शेती हा मुख्य व्यवसाय असलेली कुटुंबे (%)	१२	३४	७८
१५.	शेतमजुरी हा मुख्य व्यवसाय असलेली कुटुंबे (%)	८३	६२	१७
१६.	[illegible]रेषेखालील कुटुंबे (%)	९७	९३	९१
[illegible]	[illegible]णत्याही शासकीय योजनेचा लाभ न घेतलेली कुटुंबे (%)	४०	[illegible]	२४
[illegible]	[illegible]ामी स्थलांतर करणारी कुटुंबे (%)	५०	[illegible]	३४

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांची उत्पन्ननिहाय वर्गवारी

तक्ता क्र. ३९

तपशील	अनुसूचित जमाती	एकूण
दारिद्र्यरेषेखालील कुटुंब संख्या	७,१९,०८५	३६,१४,९१३
दरमहा उत्पन्न रु २५०पेक्षा कमी	१,८०,०७९	८,२९,१८०
दरमहा उत्पन्न रु. २५०-४९९	२,८६,९४९	१३,६२,१६७
दरमहा उत्पन्न रु. ५००-१४९९	२,०६,९१५	११,२१,६४६
दरमहा उत्पन्न रु.१५००-२५००	२८,०३५	१,८०,२३१
दरमहा उत्पन्न रु. २५०० पेक्षा जास्त	६,८७५	४८,४०९
उत्तर नाही	१०,२३२	७३,२८०

स्रोत: भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावरून

आदिवासींच्या शिक्षणाप्रति अनास्था

प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील भेदभाव समाजातही प्रतिबिंबित होते हे नियोजन मंडळाने स्पष्टपणे मांडलेले आहे. पाचवीच्याच स्तरावर दाखल झालेल्या १०० आदिवासी विद्यार्थ्यांपैकी ३८पेक्षा जास्त गळतात. दहावीपर्यंत तर केवळ २५ आदिवासी विद्यार्थीच पोहोचतात. आदिवासी क्षेत्राप्रति शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यास कारणीभूत आहे. एक शिक्षकी शाळांच्या सांख्यिकीवर नजर टाकली तरी असे लक्षात येते की, राज्यातील सर्वाधिक एक शिक्षकी शाळा या आदिवासी बहुल ठाणे जिल्ह्यात आहेत. तर एक शिक्षकी शाळांचे सर्वाधिक प्रमाण गडचिरोली जिल्ह्यात आहे. नंदुरबार जिल्ह्यातही हे प्रमाण बरेच अधिक आहे.

आदिवासी भागातील मुलींना देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्यासंदर्भात विधान परिषदेत आदिवासी विकास मंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी हे सांगितले की, २००५-०६ पासून शालेय शिक्षण विभागाने योजनेसाठी तरतूद न केल्यामुळे लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही. (विधान परिषद तिसरे अधिवेशन, २००८, अतारांकित प्रश्नोत्तरांची २७वी यादी, प्रश्न क्र: ४५२६३). विधान सभेमध्ये याच आशयाचा प्रश्न शालेय शिक्षण मंत्र्यांना विचारला असता त्यांनी आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी प्राप्त न झाल्यामुळे योजना राबविली नसल्याचे सांगितले. विभागांमधील व यंत्रणांमधील समन्वया अभावी अशा अनेक योजनांचा बोजवारा उडाला आहे. *(विधान सभा दुसरे अधिवेशन, २००८, अतारांकित प्रश्नोत्तरांची ३०५वी यादी, प्रश्न क्र: ८३०७१)*

राज्यातील एकूण तसेच आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण

तक्ता क्र. ४०

वर्ष	एकूण			अनुसूचित जमाती		
	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण
१९६१	४२.०४	१६.७६	२९.८२	१२.५५	१.७५	७.२१
१९७१	५१.०४	२६.४३	३९.१३	१९.०६	४.२१	११.७४
१९८१	५८.६५	३४.६३	४७.०२	३२.३८	११.९४	२२.२९
१९९१	७६.५६	५२.३०	६४.८७	४९.०८	२४.०८	३६.७७
२००१	८६.००	६७.००	७६.९०	६७.००	४३.१०	५५.२०

स्रोत: भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावरून

आदिम जमातींमधील साक्षरता

क्ता क्र. ४१

तपशील	पुरुष	स्त्री	एकूण
सर्वसाधारण	७६.५६	५२.३०	६४.८७
आदिवासी	४९.०८	२४.०३	३६.७७
आदिम जमाती	३१.९७	१७.८६	२५.०२
कातकरी	२१.७०	१०.७९	१६.३८
कोलाम	४५.६६	२७.८३	३६.८८
माडिया	३०.१९	१६.०९	२३.१९

ोत: आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार

आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण

क्ता क्र. ४२

इयत्ता	सर्वसाधारण गळतीचे प्रमाण		आदिवासी विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण	
	मुलगे	मुलगी	मुलगे	मुलगी
२	६	६	१२	११
३	९	९	१८	१८
४	१५	१५	२७	२७
५	१२	१४	३३	३८
६	१७	१९	४३	४७
७	२६	२७	५२	५६
८	३४	३८	५८	६६
९	३९	४४	६०	७०
१०	५०	५५	७२	७७

ोत: आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार

आदिवासींमधील कुपोषण

आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता व प्रभावीपणा आणण्याच्या दृष्टीने सर्व घटक जनांना एकत्र करून नवसंजीवनी योजना सुरू केली गेली. मात्र नवसंजीवनी योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचेच या क्षत्रातील बालमृत्यू व पोषणाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

नवसंजीवनी योजना क्षेत्रातील बालमृत्यू

क्ता क्र. ४३

वर्ष	० ते १ वयोगट	१ ते ६ वयोगट	एकूण
२००४-२००५	५५१८	२४८५	८००३
२००५-२००६	५४०९	२२८१	७६९०
२००६-२००७	५८०६	२१९७	८००३
२००७-२००८	४७९२	१९१३	६७०५
२००८-२००९	४५२५	१५६१	६०८६

ोत: आरोग्य सेवा संचालनालय, मंबई यांचा (एप्रिल २००९ अखेर पर्यंतचा) अहवाल

राज्यातील ५० टक्के आदिवासी बालके कुपोषित

तक्ता क्र. ४४

वर्ष	कुपोषित आदिवासी बालकांचे प्रमाण			
	श्रेणी १	श्रेणी २	श्रेणी ३ व ४	एकूण
२००५-०६	४१.७	१८.२	०.६	६०.५
२००६-०७	४१.९	१५.२	०.५	५७.६
२००७-०८	४१.६	१२.८	०.३	५४.७
२००८-०९	३९.७	१०.१	०.२	५०.०

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००८-०९

मातृत्व अनुदान योजना

बालमृत्यू व कुपोषण यावरील उपाययोजनेचा भाग म्हणून मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येते. गरोदर व स्तनदा मातांचे आरोग्य राखण्यासाठी ही योजना राबविली जाते. औषधे व रोख अनुदानाच्या स्वरूपात महिलांना मदत दिली जाते.

२००८-०९ मध्ये नोंदणी केलेल्यांपैकी ६२ टक्के महिलांना पूर्ण अनुदान मिळाले नाही

तक्ता क्र. ४५

वर्ष	नोंदणी झालेल्या माता	सर्व टप्प्यांवर अनुदान दिलेल्या माता	टक्केवारी
२००४-२००५	१४५८४४	९६५२१	६६.१८
२००५-२००६	१७७६३०	११९०१५	६७.००
२००६-२००७	१५९४६३	९६२९८	६०.३८
२००७-२००८	१२२५४६	७८८१८	६४.३१
२००८-२००९	१८५३४३	७०२८३	३७.९२

स्रोत : आरोग्य संचालनालयाचा जून २००९ चा अहवाल

आश्रम शाळेचा पंचनामा :

शासकीय आश्रम शाळा, सूर्यमाळ, तालुका मोखाडा, जिल्हा ठाणे

आम्ही खालील सह्या करणारे आज दिनांक २८/८/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्षत भेट देऊन शासकीय आश्रमशाळा, सूर्यमाळ तालुका मोखाडा येथे पंचनामा करतो की,

मुलींचे स्नानगृहाची पाहणी केली असता ते नादुरुस्त आहे. स्नानगृहास (मोरी) केवळ दोन फूट उंचीच्या भिंती असून त्याला दरवाजे नाहीत. या आश्रमशाळेमध्ये ८वी ते १०वी पर्यंतच्या मुली आहेत. श्रीम. पखाले, अधिक्षिका यांनी ८ वी ते १० वी पर्यंतच्या ७०-७५ मुली असल्याचे सांगितले. त्यांना नेमका आकडा सांगता आला नाही. या कुमारवयीन मुलींना मासिक पाळीच्या वेळीही स्वच्छतेचे काम दरवाजे नसलेल्या आडोशातच करावे लागते. शौचालयाची अवस्था पाहता शौचालयाची टाकी बंद असल्याचे मुख्याध्यापक श्री. आर. बी. गायकवाड यांनी सांगितले. प्रत्यक्षात पाहता गेले अनेक महिने शौचालयाचा वापर झाला नसल्याचे आम्हा पंचांच्या निदर्शनास आले. शौचालय व आंघोळीसाठी सर्व मुले-मुली बाहेर जात असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे आश्रमशाळेचे सर्व छत गळत असल्यामुळे, ११ ऑगस्ट पासून १८ ऑगस्ट २००८ पर्यंत मुलांना घरी पाठवले होते, तसेच आताही छत गळत आहे असे मुख्याध्यापकांनी सांगितले.

सिद्ध गोल्डच्या गोडेतेलाचे ३ ३ डब्बे असून त्याची मुदत जुलै, २००८ मध्ये संपली असून ते येथे वापरात आहेत. भाजीपाला पुरविण्याचे काम श्री महिला बचत गट, मोखाडा हे करत असून श्री. कारखंडे, यांना विचारले असता भाजीपाल्याची चलने, शोधून सापडत नाहीत असे त्यांनी सांगितले. दिनांक २५ ऑगस्ट २००८ रोजी ५५ कि. बटाटे, ४५ कि. कोबी, २० कि. फ्लॉवर याची रजिस्टरला नोंद आहे. पण याचे चलन किंवा बिल श्री. कारखंडे दाखवू शकले नाही. प्रत्यक्षात पाहिले असता वांगी ४० कि, टॉमेटो २५ कि, कोथिंबीर ३ जुड्या आढळून आली. याची रजिस्टरला नोंद नसल्याचे कारखंडे यांनी दाखविले. याची नोंद मुले आजारी असल्यामुळे मी करू शकलो नाही असे कारखंडे यांनी सांगितले. तुरडाळ सडलेल्या अवस्थेत असून काळपट रंग आलेला आहे.

शाळेत एकूण ४५८ निवासी मुले असून निवासासाठी १५ शेड असून त्या सर्व गळत असल्याचे आढळले. आश्रमशाळेत शिक्षक-शिक्षिका असे एकूण १५ शिक्षक आहेत. त्यांना राहण्यासाठी शेड नाही. वर्गाच्याच एका शेडमध्ये भाग पाडून ५ शिक्षक राहतात. त्यात दोन अधिक्षिकांचा समावेश आहे हे श्री. गायकवाड या शिक्षकाने सांगितले. या आश्रमशाळेत संगणक उपलब्ध करून दिलेले नाहीत. वीज मीटर असले तरी अधून-मधून लाईट नसल्याचे गायकवाड यांनी सांगितले. गेल्या वर्षी या शाळेचा निकाल ७२.२३ टक्के लागला असल्याचे मुख्याध्यापक श्री. गायकवाड यांनी सांगितले. रामदास गोविंद हांबरे रा. सूर्यमाळ, जात हिंदू-महादेव कोळी या शेतकऱ्याने येथे येऊन सांगितले की, सदर आश्रमशाळा त्याच्या सर्व्हे नं. ३ हिस्सा नं. ३ चा ६ व यामध्ये सरकारने बांधली आहे. त्याचा मोबदला त्याला दिलेला नाही. माझ्या मुलाला नोकरी मिळावी असे श्री. रामदास हांबरे यांनी पंचांना सांगितले.

श्याम भाऊ डहाळे, इयत्ता १० वी याचा गेल्या वर्षी इयत्ता ९ वीमध्ये पहिला नंबर आला होता त्याने बऱ्यापैकी इंग्रजीचे वाचन केले. परंतु शांताराम ...राम पडघा, इयत्ता १० वी याला चार अक्षरी शब्दाचे वाचन करता आले नाही.

...क्ष:

. आर. बी. गायकवाड, मुख्याध्यापक

...:

) श्री. जगदिश भगवान धोडी, जिल्हाध्यक्ष, श्रमजीवी संघटना
) श्री. बाळाराम भोईर, सरचिटणीस, श्रमजीवी संघटना
) श्री. श्री. वा. नेर्लेकर, ज्येष्ठ पत्रकार, दै. महाराष्ट्र टाइम्स
) श्री. सोपान बोंगाणे, ज्येष्ठ पत्रकार, दै. लोकसत्ता
) श्रीम. जयश्री खाडिलकर-पांडे, संपादक, दै.नवाकाळ
) श्री. सुरेश नगर्सेकर, ज्येष्ठ पत्रकार, दै. नवाकाळ
) श्री. सुहास रेळेकर, प्रतिनिधी, स्टार माझा
) श्री. विवेक पंडित, संस्थापक, श्रमजीवी संघटना

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची दूरावस्था : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या ठाणे जिल्ह्यातील ७ तालुक्यात, वसई - ८५१४, पालघर -१०३३६, भिवंडी– ६५८८, मुरबाड - ५८४५, कल्याण - १४४१, अंबरनाथ - २२८५, डहाणू - ३१३०० एवढी मोठी आहे.

दुर्गम भागात तलासरी, मोखाडा, जव्हार, पालघर या तालुक्यामध्ये जे शिक्षक जातात ते पुन्हा दुसरीकडे बदली करून घेतात त्यामुळे तेथील जागा रिक्त रहातात. तसेच शिक्षकांना बढती देऊन पाठविले तरी ते बदली झालेल्या ठिकाणी जाण्यासाठी तयार होत नाहीत त्यामुळे तेथील जागा रिक्त राहतात.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील काही शाळा बंद आहेत, काही शाळांच्या इमारतींवर छपरांची व्यवस्था नसणे, काही शाळा बंद अवस्थेत असणे, शाळांमध्ये शिक्षक मुलांना शिकविण्यासाठी न येणे तसेच वर्षभरात मुलांची प्रगती पाहण्यासाठी कोणताही अधिकारी न येणे अशी विदारक स्थिती आहे.

- वर्ष २००४-०५ मध्ये ७०० शिक्षकांची भरती करावयाची होती. त्यासाठी १६ हजार अर्ज प्राप्त झाले, ३५०० उमेदवारांना मुलाखतीला बोलावले गेले, तरीही २८९ जागा रिक्त राहिल्याचे आढळून आले आहे.
- वर्ष २००१-०२ ते २००४-०५ या ४ वर्षांमधील मुलींच्या विद्या वेतनाची थकबाकीच दिलेली नाही.
- वसई, पालघर, भिवंडी, मुरबाड, कल्याण, अंबरनाथ, डहाणू, विक्रमगड, वाडा, मोखाडा, शहापूर येथे कामे पूर्ण न झालेल्या घरकुलांची संख्या १८७ इतकी आहे.
- चिंबीपाडा येथील आरोग्य केंद्रास भेट दिली असता असे आढळून आले की, दवाखान्याच्या ऑपरेशन थिएटर मध्ये रद्दी भरून ठेवण्यात आली होती. दवाखान्यातील डॉक्टर कामाच्या वेळेत झोपले होते. तसेच दवाखान्यातील औषधांची मुदत संपली होती.
- पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंत्याचे पद भरण्यासाठी जुलै, २००५ मध्ये जाहिरात करते वेळी स्थानिक वृत्तपत्रात किंवा आदिवासी बहुल भागात मोठ्या प्रमाणात खपणाऱ्या ग्रामीण वृत्तपत्रात जाहिरात न करता केवळ महाराष्ट्र टाईम्स सारख्या शहरी वृत्तपत्रामध्ये जाहिरात करण्यात आली होती. त्यामुळे अनेकांना भरती विषयी कळलेच नाही.
- उपसा जलसिंचन योजना आदिवासी भागामध्ये राबविताना लाभार्थ्यांमध्ये आदिवासींचे प्रमाण ६० टक्के असावे असा निकष शासनाने ठरविलेला होता. परंतु ज्या विभागात एकही आदिवासी लाभार्थी नाही त्या विभागात ही योजना राबविली जात असल्याचे आढळून आले.
- ठाणे जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांना वेळेवर बी-बीयाणे, खते तसेच योग्य प्रकारे मार्गदर्शन देण्यात येत नाही. ग्रामसेवक, कृषि अधिकारी या कामी अक्षम्य टाळाटाळ करतात त्यामुळे आदिवासी शेतकरी बी-बियाणे, खते व मार्गदर्शनापासून वंचित रहातात. त्याचप्रमाणे चांगले खत व बी-बियाणे परस्पर विकून निकृष्ट दर्जाचे दिले जाते.

(अनुसूचित जमाती कल्याण समिती, २००५-०६ चा चौथा अहवाल

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचे ताशेरे

- १० प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अभिलेख्यांच्या चाचणीतून असे उघड झाले की, ११ वसतिगृहांचे वर्ष २००३-०४ मध्ये सुरू झालेले बांधकाम मा २००७ पर्यंत पूर्णच झाले नव्हते. याबाबत विचारणा केली असता, बांधकामाची जबाबदारी असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्यां विलंबाची कारणे समजली नव्हती असे सांगण्यात आले. यावरून दोन विभागात असलेला समन्वयाचा अभाव व कामातील टाळाटाळ दिसून येते
- आयुक्त, आदिवासी विकास यांनी वर्ष २००४-०५ मध्ये रु.७ कोटी ७ लाख किमतीच्या खाटांची खरेदी केली. या खाटा ९२ आश्रमशाळां पुरविण्यात आल्या. त्यापैकी अमरावती, नाशिक, नंदुरबार आणि धुळे या चार जिल्ह्यांना १४५२ खाटा पुरविण्यात आल्या. परंतु वसतिगृहात इत व्यवस्था नसल्याने मुले वर्गखोल्यातच झोपत होती. विभागाने वसतिगृहात सोई-सुविधांची व्यवस्था नसतानाही खाटा व गाद्यांची खरेदी केलेली होती
- रानीगाव, धारणी तालुका, अमरावती जिल्हा तसेच सारखेणी, किनवट तालुका, नांदेड जिल्हा या आश्रमशाळांमध्ये पाण्याची सोय नव्हती.
- सारखेणी येथील आश्रमशाळेचा वापर फर्निचर ठेवण्यासाठी केला गेला होता तर रानीगाव आश्रमशाळेत सहाय्यक आदिवासी आयुक्तांनी पुरविलेल २ हजार लिटरच्या टाक्या रिकाम्या पडून होत्या.
- सारखेणी आश्रमशाळेत इयत्ता ११ वी व १२ वी अशी श्रेणी वाढ केली गेली. त्यामुळे १६० विद्यार्थी वाढले मात्र त्यांच्यासाठी अतिरिक्त स्वच्छता तसेच शयनगृहे पुरविण्यात आली नव्हती.
- मडुआ आश्रमशाळेमध्ये इमारतींना दरवाजे व खिडक्याच नव्हत्या ज्यामुळे विद्यार्थी उघड्यावर पडले होते. तसेच स्वच्छतागृहेही नव्हती. लेखापरीक्ष अधिकाऱ्यांनी या आश्रमशाळेला भेट दिली असता शाळेत मुलेच नसल्याचे आढळून आले. मुख्याध्यापक व एक शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापक सांगितले की, शिक्षक गावातून मुले आणण्यासाठी गेले आहेत.
- राज्यामध्ये नंदुरबार हा जिल्हा सर्वात मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. तेथील धाडगाव व अक्कलकुवा या सर्वात मागास आदिवा तालुक्यांचा जलद गतीने विकास घडवून आणण्यासाठी राज्य शासनाने वर्ष २००३-०४ ते वर्ष २००७-०८ साठी कृति आराखडा निश्चित के होता. त्यासाठी रु. ४० कोटी ९१ लाखांची तरतूद करण्यात आली होती. परंतु योजनेची अंमलबजावणी इतकी निकृष्ट होती की, त्या ५ व

केवळ रु. १२ कोटी ९ लाख इतकीच रक्कम खर्च झाली, म्हणजेच दिलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कमच खर्च झाल्याचे दिसून आले.

आदिवासी विकास विभागामध्ये ९ हजार ८५ मंजूर पदांपैकी १ हजार ८११ म्हणजे २० टक्के पदे रिक्त होती.

अमरावती, लातूर, मुंबई, पुणे, नागपूर येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी रु. ६ लाख ६६ हजार किमतीची १ हजार १८५ विद्युत जनित्रे पुरविण्यात आली. त्यापैकी ७८५ जनित्रे बसविलीच नव्हती, ३४ जनित्रे कार्यरत नव्हती तर बसविलेल्या ३६६ जनित्रांपैकी ३५२ जनित्रांविषयी विभागाच्या अधिकाऱ्यांनाच माहिती नव्हती असे दिसून आले.

शासनाकडून व स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहांमध्ये प्रमाणकानुसार ७५ विद्यार्थ्यांमागे दोन दालने, एक स्वयंपाक गृह, एक भांडारघर, विद्यार्थ्यांसाठी दहा खोल्या, आठ स्वच्छतागृहे, नऊ न्हाणीघरे अशा सुविधा असल्या पाहिजेत. परंतु नांदेड, नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील शासन आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहांचे सर्वेक्षण केले असता अनेक मूलभूत सोयी सुविधांचा अभाव आढळून आला.

१) तीन शासकीय वसतिगृहांमध्ये १५ विद्यार्थ्यांसाठी केवळ १ स्वच्छतागृह व एक न्हाणीघर पुरविण्यात आले होते.

२) स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहात २४ ते ६० विद्यार्थ्यांमागे केवळ एक स्वच्छतागृह व एक न्हाणीघर होते. तर दोन शासकीय वसतिगृहात स्वच्छतागृह व न्हाणीघरच नव्हते.

३) मुंबई, नाशिक, ठाणे, नांदेड या चार विभागातील वसतिगृहात भोजनकक्षच बांधण्यात आले नव्हते.

आदिवासी विकास विभागाने महिन्यातून ४ वेळा शासकीय व स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या शाळा व वसतिगृहांची उपस्थिती व इतर सुविधांची उपलब्धता आहे की नाही ते तपासण्यासाठी पाहणी करणे गरजेचे होते. निरीक्षकांनी त्याची नोंद नोंदवहीत करणे गरजेचे होते. ही कामे अधिकाऱ्यांनी अपूर्ण ठेवली होती.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या लेख्यांचे परीक्षण केले असता असे आढळून आले की, त्यांच्या अखत्यारित एकूण ३४ कार्यालये होती. त्यांच्या अंतर्गत लेखापरीक्षण विभागामध्ये लेखाधिकारी, उप लेखापाल यांचा समावेश होता. परीक्षण केले असता असे आढळून आले की, २५ कार्यालयांचे ५ ते ९ वर्षे आणि उरलेल्या ९ कार्यालयांचे १ ते ४ वर्षांचे अंतर्गत लेखापरीक्षणच केले गेले नव्हते. तसेच अंतर्गत लेखापरीक्षण अहवालाचे ३ हजार ७३२ परिच्छेद प्रलंबित होते. लेखापरीक्षण प्रलंबित असण्याचे कारण आदिवासी आयुक्त सांगू शकले नाहीत.

ोत: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा दि. ३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या वर्षाचा नागरी अहवाल

आदिवासी विकासासाठी राज्य नियोजन मंडळाच्या शिफारशी

आदिवासी उपायोजना क्षेत्रामध्ये मानकाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालयाच्या सुविधा उपलब्ध असाव्यात यासाठी सर्वेक्षण करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच त्यानुसार येणारा अनुशेष भरून काढण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

नवसंजीवनी योजनेत आवश्यक ते बदल करून आरोग्य सुविधा बळकट करण्यात याव्या तसेच २४ तास आरोग्य सुविधा उपलब्ध असाव्यात. विद्यमान आरोग्य केंद्र, आरोग्य पथके, ग्रामीण रुग्णालये, यामधील रिक्त पदे त्वरित भरण्यात यावीत. तसेच नवसंजीवनी क्षेत्रातील अतिसंवेदनशील भागात सर्व सुविधांनी युक्त रुग्णालये बांधून ती नामांकित वैद्यकीय संस्थांना चालविण्यासाठी देण्यात यावी जेणेकरून शासकीय आरोग्य सेवेबरोबर खाजगी/ अनुदानित आरोग्य सेवा उपलब्ध होऊन कुपोषणासारख्या गंभीर समस्येवर मात करणे शक्य होईल.

- अशक्त माता हे आदिवासी भागातील वाढत्या कुपोषणाचे मुख्य कारण आहे. त्यासाठी महिला व बालविकास विभागाने योजना राबवावी.
- आदिवासी क्षेत्रातील सहकारी संस्थांना वृक्ष लागवड व वृक्ष जोपासण्यासाठी अनुदान देण्यात यावे. १० ते २० हजार लिटर क्षमतेची शीतकेंद्र उभारण्यात यावीत. दुधाला जास्तीत जास्त भाव मिळेल अशा ठिकाणी दूध विक्री करण्यास परवानगी असावी. तसेच शासनालाच दूध विकण्याचे बंधन नसावे.
- मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यासाठी आदिवासी महिला व युवक यांना सहकारी तत्त्वावरील दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, अंबर चरखा, अन्न प्रक्रिया उद्योग, मत्स्य व्यवसाय व स्थानिक गरजांवर आधारित उद्योगधंदे स्थापन करण्यास प्रोत्साहन द्यावे. मोठ्या प्रमाणावर बचत गटांची निर्मिती करण्यात यावी. महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे.

- महाराष्ट्रातील १६ जिल्हे आदिवासी उपयोजनेअंतर्गत येतात. या भागामध्ये आदिवासी बागायतदारांना बोर, आंबे, काजू या सारखी व्यापारी पिके घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. रोजगार हमी योजनेअंतर्गत लहान व सिमांतिक आदिवासी शेतकऱ्यांना फलोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे.
- आदिवासी क्षेत्रातील पडिक जमीन ताब्यात घेऊन त्याचे वाटप आदिवासींना करण्यात यावे. ती शेती योग्य करण्यासाठी मदत करावी. बी-बियाणे, अवजारे, इतर कृषि विषयक सहाय्य न्युक्लिअस बजेट मधून उपलब्ध करून देण्यात यावे. आदिवासींना बारा महिने पाणी पुरवठा होईल या दृष्टीने सिंचनाची सोय करण्यात यावी.
- आदिवासी नागरिकांना सुलभ दळणवळण सुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्यात यावीत. आदिवासी विभागामध्ये कारखान्यांची निर्मिती करण्यात यावी ही निर्मिती सर्वेक्षणावर आधारित असावी याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे योजना आखण्यात यावी. आदिवासी भाग हा वन क्षेत्र असल्याने धरणे, चेकडॅम, नैसर्गिक धबधबे निर्माण करण्यात यावे. या आधारावर पर्यटनाचा विकास करण्यात यावा.
- दीर्घकाळापासून आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या सामूहिक, वैयक्तिक लाभाच्या योजनांचा विकास शीर्षनिहाय आढावा घेऊन त्यात उचित सुधारणा कराव्यात तसेच कालबाह्य झालेल्या योजना बंद करण्यात याव्यात. नवीन योजनांचा अंतर्भाव करण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर सक्रिय असलेले सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी, व्यक्ती यांच्यामध्ये चर्चा घडवून आणावी.

आदिवासी उपयोजनेप्रमाणे अनुसूचित जाती उपयोजनेचाही बोजवारा

राज्यातील आदिवासींप्रमाणे दलितांचे महत्त्वही राज्यकर्त्यांसाठी केवळ 'व्होट बँक' एवढेच असल्यामुळे दलितांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या अनुसूचित जाती उपयोजनेचा किंवा विशेष घटक योजनेचाही बोजवाराच उडालेला आहे.

वर्ष २००८-०९ मधील अनुसूचित जाती उपयोजनेची अंमलबजावणी

तक्ता क्र. ४६ (रुपये कोटीत)

क्षेत्र	नियतव्यय	खर्च (डिसेंबर ०८ पर्यंत)	नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी
जिल्हास्तरीय योजना (अ)	१,१५३	३१३	२७.१४
कृषि व संलग्न सेवा	१३०	१४	१०.७७
ग्राम विकास	८२	३०	३६.५८
विद्युत विकास	३६	१२	३३.३३
उद्योग व खनिजे	१६	३	१८.७५
वाहतूक व दळणवळण	१४	६	४२.८६
सामाजिक व सामूहिक सेवा	८७५	२४८	२८.३४
राज्यस्तरीय योजना (ब)	१,१८०	२७	२.२९
वस्त्रोद्योग विभाग	१	०	०.००
जलसंधारण विभाग	१००	०	०.००
सामाजिक व सामूहिक सेवा	१,०७९	२७	२.५०
एकूण राज्य (अ+ब)	२,३३३	३४०	१४.५७

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी

२००० साली सत्तेत आल्यानंतर आघाडी शासनाने जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमामध्ये विशेष घटक योजनेसाठी मंजूर झालेली रक्कम इतरत्र वळविण्यात येणार नाही असे आश्वासन दिले होते. शासनास त्याचा विसर पडल्याचे विशेष घटक योजनेची अंमलबजावणी पाहता स्पष्ट होते.

दहावी पंचवार्षिक योजना : अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत नियतव्यय व खर्च

तक्ता क्र. ४७

(रु. लाखात)

१	२	३	४
विकास शीर्ष /उपशीर्ष	२००२ ते २००७ च्या प्रत्येक वार्षिक योजनेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित नियतव्यय	प्रत्यक्ष खर्च	प्रत्यक्ष खर्चाची (स्तंभ ३) एकत्रित नियतव्ययाशी (स्तंभ २) टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	२९६७४.६८	२१२०९.१४	७१.४७
ग्रामीण रोजगार	२४११६.६७	१९९७१.३३	८२.८१
एकूण ग्रामीण विकास	३७५९५.२०	२८५००.७४	७५.८१
विद्युत विकास	१०२३४.३३	७८९८.९०	७७.१८
उद्योग व खनिजे	५६०२.३६	०	०.००
वाहतूक	२२५०.१३	२३१६.९२	१०२.९७
सामान्य शिक्षण	१४८५९.७८	७२९४.४४	४९.०९
व्यवसाय शिक्षण	१६१.४४	१८.२०	११.२७
आरोग्य	४१९.४०	५७४.३०	१३६.९३
मलप्रवाह व पाणीपुरवठा	११३०८.०२	६६५२.८४	५८.८३
गृहनिर्माण	२८९३.४३	१२४५.००	४३.०३
नगर विकास	४२५२६.१८७	२७११२.६३	६३.७६
मागासवर्गीयांचे कल्याण	२३५०५४.५५	१६५४२३.६५	७०.३८
समाज कल्याण	५१५०.८०	११८४.०२	२२.९९
कामगार/काम. कल्याण	१०७१.४२	१५५.८९	१४.५५
पोषण	३७९.५५	१५२.३९	४०.१५
सामा. /सामूहिक सेवा	३१५५६१.३४	०	०.००
एकूण वि.घ. योजना	४७८३६२.००	३४९४१८.६९	७३.०४

स्त्रोत - वार्षिक योजना भाग - १

महिला विकास

२००१ च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येमध्ये (९ कोटी ६८ लाख) महिलांचे प्रमाण ४८ टक्के (४ कोटी ६४ लाख) असून ० ते १४ वयोगटातील बालकांचे प्रमाण ३२ टक्के (३ कोटी १० लाख) आहे. महिलांच्या विकासाच्या व सक्षमीकरणाच्या योजना व बाल विकासाच्या योजना शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविल्या जातात.

राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत
महिला व बाल विकास विभागावर झालेला खर्च

आलेख क्र. १२



स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमा)

महिला विकासाच्या कालबाह्य योजना

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागामार्फत ज्या योजना राबविल्या जातात त्या अक्षरश: कालबाह्य ठरलेल्या आहेत. या योजनांतर्गत देण्यात येणारे अनुदान तुटपुंजे तर असतेच शिवाय योजनांसाठी केलेल्या तरतुदीत कोणतीही एकवाक्यता व निश्चित कल नसतो. याची ही काही उदाहरणे:

- जिजामाता महिला आधार विमा योजनेंतर्गत पिवळे व भगवे रेशनकार्ड असणाऱ्या कुटुंबांच्या प्रमुखाला रु. २५,००० रकमेच्या विम्याचे संरक्षण देण्यात आले आहे. आधीच्या दोन वर्षी रु. १ कोटी व ७८ लाख अशी तरतूद केल्यानंतर वर्ष २००३-०४ मध्ये योजनेसाठी रु. १५ कोटी २५ लाखांची तरतूद करण्यात आली. त्यानंतरच्या ४ वर्षात योजनेसाठी प्रत्येकी रु. १ लाखाची तरतूद करण्यात आली. मात्र एकाही वर्षी योजनेवर प्रत्यक्षात खर्च झाल्याचे अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिकेवरून दिसून येत नाही.

- निराधार व निराश्रित महिलांच्या मुलींना वैवाहिक आयुष्याची चांगली सुरुवात करता यावी व त्यांचे जीवनमान उंचवावे यासाठी या मुलींना विवाहासाठी रु.२ हजार (?) अनुदान देण्यात येते. वर्ष २००१ ते ०५ या चार वर्षांमध्ये केवळ १ हजार मुलींना अनुदान देता येईल अशा दृष्टीने रु. २० लाखांची तरतूद करण्यात आली. त्यानंतरच्या वर्षांमध्ये मात्र तरतुदीत घट होऊन प्रतिवर्षी रु. १५ लाखांची तरतूद योजनेसाठी केली गेली. विशेष म्हणजे एकाही वर्षी तरतूद पूर्णपणे खर्च होऊ शकली नाही.

- आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलींना व्यवसाय प्रशिक्षणाच्या कालावधीत रु. १०० इतके विद्यावेतन देण्याची योजना आहे. गेल्या १० वर्षांचा विचार करता योजनेवर २००४-०५ या वर्षी सर्वाधिक रु. २ कोटी ८२ लाख एवढे खर्च झाले तर २००२-०३ मध्ये सर्वात कमी रु. १० लाख

४८ हजार खर्च झाले. २००४-०५मध्ये शासन साधारणपणे २३ हजार मुलींपर्यंत पोहोचले तर २००२-०३ मध्ये केवळ ८७० मुलींपर्यंत पोहोचले.

> आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांनी स्वावलंबी बनावे यासाठी स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना रु. ५०० एवढे अनुदान देण्यात येते.

> ४० वर्षांवरील देवदासींना अटी व शर्तींच्या अधिन राहून दरमहा रु. ३०० एवढे निर्वाह अनुदान देण्यात येते.

राज्याचा माता मृत्यू दर: १३५
राज्यातील बालविवाहांचे प्रमाण: ५५ टक्के
ॲनिमिक आदिवासी महिला: ६४.२

- राज्य नियोजन मंडळ

कागदावर उरलेले महिला धोरण

महाराष्ट्र हे देशातील महिला धोरण तयार करणारे पहिले राज्य आहे. मात्र दुर्दैवाने हे महिला धोरण केवळ कागदावरच उरले आहे. २००१ मध्ये जाहीर केलेल्या महिला धोरणामध्ये आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेच्या धर्तीवर 'महिला विशेष घटक योजना' तयार करण्याचे प्रस्तावित केले होते. यामुळे महिलांच्या योजनांसाठी पुरेसा निधी प्राप्त होऊ शकेल व योजनांमधील विसंगती व पुनरावृत्ती टाळता येईल असे नमूद केले होते. गंभीर बाब अशी की, या धोरणातील तरतुदींसंदर्भात विद्यमान महिला व बाल विकास मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील अनभिज्ञ होते.

तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून महिला व बाल विकास मंत्र्यांना महिला घटक योजनेसंदर्भात विचारण्यात आलेले प्रश्न व त्यांनी दिलेली उत्तरे अशी:

प्रश्न: राज्यातील महिलांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनामार्फत सन २००३-०४ पासून महिला घटक योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय?

उत्तर: नाही.

प्रश्न: असल्यास या योजनेमागचा हेतू व उद्देश काय आहे?

उत्तर: प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रश्न: सन २००३-०४ नंतर शासनाने महिला घटक योजनेवरील पुस्तिका प्रकाशित केली नाही हे खरे आहे काय?

उत्तर: होय

प्रश्न: असल्यास त्याची कारणे काय आहेत? २००४-०५ पासून २००६-०७ पर्यंत घटक योजनेंतर्गत विविध योजनांकरिता विभागवार केलेल्या तरतुदी व प्रत्यक्ष खर्च याचा तपशील काय आहे?

उत्तर: सन २००३-०४ मध्ये शासनाच्या विविध विभागामार्फत पूर्णत: महिलांसाठी व अंशत: महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवरील तरतूद दर्शविणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली होती. महिला विशेष घटक योजना तयार करावयाची असल्यास त्याकरिता सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्या धर्तीवर वेगळ्याने नियतव्यय विभागास उपलब्ध करून देणे आवश्यक राहील व यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यास्तव सन २००३-०४ नंतर महिला घटक योजनेची तरतूद दर्शविणारी पुस्तिका प्रकाशित केलेली नाही

प्रश्न: तरतुदीपेक्षा खर्च कमी झाला असल्यास त्याची कारणे काय आहेत?

उत्तर: प्रश्न उद्‌भवत नाही.

(संदर्भ: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६३४५८, दिनांक ३ ऑक्टोबर २००७)

२००१मध्ये जाहीर झालेल्या महिला धोरणाचा २००७ पर्यंत राज्यकर्त्यांना विसर पडला होता हे यावरून स्पष्ट होते.

दुर्लक्षित व उपेक्षित राज्य महिला आयोग : विधिमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीची निरीक्षणे

- एका वर्षात राज्य महिला आयोगाच्या किती बैठका व्हाव्यात याबाबत मार्गदर्शक सूचना नाहीत.
- आतापर्यंत वर्षभरातून किमान ३ ते ४ बैठका घेण्यात आल्या.
- सन २००५ या वर्षी मान. अध्यक्षा व सदस्या यांची नियुक्ती न झाल्याने एकही बैठक झाली नाही.
- राज्य महिला आयोगाने आतापर्यंत सादर केलेल्या अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबतची माहिती आयोगास अप्राप्त आहे.
- आयोगाच्या अध्यक्षा व सदस्या यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये गेल्या १३ वर्षात कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्यात आली नाही.
- राज्य महिला आयोगामार्फत शासनाला प्रतिवर्षी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करण्यात येते. परंतु त्यात नमूद केलेल्या रकमापेक्षा अल्प प्रमाणात अनुदान आयोगाला मंजूर करण्यात येते.
- राज्य महिला आयोगाकडून प्रतिवर्षी शासनाकडे निधी पुरविण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात येतात. मात्र मंजूर तरतुदीमध्ये फारशी वाढ केली जात नाही.
- राज्य महिला आयोगास शासनाकडून मिळणाऱ्या अत्यल्प अनुदानापैकी अंदाजे ५० टक्के रक्कम ही कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होते. ३० ते ३५ टक्के रक्कम ही आस्थापना व अन्य बाबींवर खर्च होते. प्रत्यक्षात आयोग आपल्या कामकाजावर केवळ १० ते १५ टक्के रक्कम खर्च करू शकतो.
- सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार राज्य महिला आयोगास अधिकार कमी आहेत. गैरअर्जदार आयोगाच्या कार्यालयात अनुपस्थित राहिल्यास त्याला शिक्षा करण्याचे अधिकार आयोगास नाहीत.

अनुदानाअभावी राज्य महिला आयोगाचे हाल

आयोगाच्या अध्यक्षा श्रीम. रजनी सातव यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केलेली नाराजी.

- २००१ सालच्या जनगणनेनुसार महिलांची संख्या ४ कोटी ६४ लाख आहे. महिलांच्या कल्याणासाठी शासनाकडून महिला आयोगाला मिळणाऱ्या अनुदानाचा विचार करता एका महिलेसाठी केवळ १७ पैसे अनुदान प्राप्त होते.
- घरच्या चुलीबरोबरच आयोगाचे काम कसे सुरू ठेवावे या विवंचनेत कर्मचारी वर्ग आपले कर्तव्य बजावत आहेत कारण पाच महिन्यांपूर्वी विधिमंडळात मंजूर झालेला निधी अद्यापही शासनाच्या लाल फितीत अडकून आहे
- आयोगाच्या कामकाजाला दोन ते अडीच कोटी एवढ्या अनुदानाची आवश्यकता असताना शासन मात्र ८० लाखांवर अनुदान देण्याचे औदार्यही दाखवत नाही.
- अनुदानात वाढ करावी व ते नियमित मिळावे याकरिता शासनाकडे अनेकवेळा अर्ज करूनही शासन याकडे गांभियाने बघत नाही.

महाराष्ट्रात १००० पुरुषांमागे केवळ ९२६ महिला
'छकुल्या मुकलेल्या'

महाराष्ट्र राज्य, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचा हा अहवाल
जिल्हानिहाय १००० पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण दर्शविणारे विवरणपत्र

तक्ता क्र. ४८

अक्र.	जिल्हा	सन १९९१	सन २००१	अक्र.	जिल्हा	सन १९९१	सन २००१
१	मुंबई	९४२	९२२	१९	बीड	९३९	८९४
२	मुंबई उपनगर	९३०	९२३	२०	परभणी	९५६	९२३
३	ठाणे	९५२	९३१	२१	हिंगोली	९५३	९२७
४	रायगड	९६१	९३९	२२	लातूर	९४७	९१८
५	रत्नागिरी	९६१	९५२	२३	उस्मानाबाद	९४७	८९४
६	नाशिक	९५४	९२०	२४	नांदेड	९६०	९२९
७	धुळे	९४७	९०७	२५	अकोला	९२९	९३३
८	नंदुरबार	९७७	९६१	२६	वाशिम	९४१	९१८
९	अहमदनगर	९४९	८८४	२७	अमरावती	९५०	९४१
१०	जळगाव	९२५	८८०	२८	बुलढाणा	९४५	९०८
११	पुणे	९४३	९०२	२९	यवतमाळ	९६१	९३३
१२	सातारा	९४१	८७८	३०	नागपूर	९५१	९४२
१३	सोलापूर	९३५	८९५	३१	वर्धा	९५२	९२८
१४	कोल्हापूर	९३१	८३९	३२	चंद्रपूर	९६५	९३९
१५	सांगली	९२४	८५१	३३	भंडारा	९६४	९५६
१६	सिंधुदुर्ग	९६३	९४४	३४	गोंदिया	९७८	९५८
१७	औरंगाबाद	९३३	८९०	३५	गडचिरोली	९८०	९६६
१८	जालना	९५१	९०३		महाराष्ट्र राज्य	९४६	९२६

१० वर्षात खालावलेली परिस्थिती

१९९१	२००१
राज्यातील अठरा जिल्ह्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९५० पेक्षा अधिक होते.	राज्यातील फक्त पाचच जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
राज्यातील एकाही जिल्ह्यात मुलींचे प्रमाण ९०० पेक्षा कमी नव्हते.	राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.
कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींचे प्रमाण ९३१ होते.	कोल्हापूरमधील मुलींचे प्रमाण ८३९ एवढे कमी (राज्यातील सर्वात कमी प्रमाण) झाले. जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात हे प्रमाण ७९५ एवढे लाजिरवाणे आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण

महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून रक्षण करणारा कायदा केंद्र शासनाने लागू केला. या कायद्यामध्ये महिलांना केवळ शारीरिकच नव्हे तर आर्थिक अत्याचारांपासून संरक्षण देण्याचीही तरतूद आहे. राज्यात मात्र या कायद्याची अंमलबजावणी अतिशय निराशाजनक आहे समर्थनने माहितीच्या अधिकाराचा वापर करून या कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला तेव्हा आढळून आलेली परिस्थिती

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाची महाराष्ट्रातील अंमलबजावणी

माहितीच्या अधिकारांतर्गत समर्थनकडे राज्यातील २३ जिल्ह्यातील कायद्याच्या अंमलबजावणीची माहिती उपलब्ध झाली आहे.

कायद्याच्या मराठी प्रतीची उपलब्धता:

- २० जिल्ह्यांनी या संदर्भात उत्तर दिले.
- २० पैकी केवळ ५ जिल्ह्यांनी कायद्याची मराठी प्रत उपलब्ध करून दिली
- १० जिल्ह्यांनी त्यांच्याकडे प्रत उपलब्ध नसल्याचे कळविले
- ५ जिल्ह्यांनी आयुक्तालय, पुणे यांचेकडून सदर प्रत घेण्यात यावी असे कळविले.

२३ जिल्ह्यात या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता वर्ष २००७-०८ मध्ये केलेली आर्थिक तरतूद

- १७ जिल्ह्यांनी तरतूद निरंक असल्याचे कळविले.
- ३ जिल्ह्यांनी सदरील माहिती आयुक्तालय, पुणे येथून घ्यावी असे कळविले
- प्रत्येकी एका जिल्ह्याने माहिती देता येत नाही, लागू नाही व माहिती मंत्रालयाशी संबंधित असल्याचे कळविले.

या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता वर्ष २००८-०९ मध्ये केलेली आर्थिक तरतूद

- करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये एकवाक्यता दिसत नाही.

तक्ता क्र. ४९

जिल्हा	तरतूद	जिल्हा	तरतूद	जिल्हा	तरतूद
जालना	९०,०००	अहमदनगर	३८,०००	अकोला	७३,८००
चंद्रपूर	५१,०००	लातूर	५२,०००	हिंगोली	२५,०००
नंदुरबार	६६,०००	औरंगाबाद	५५,०००	नागपूर	१,०३,०००
अमरावती	१,३४०००.	गोंदिया	२५,०००	उस्मानाबाद	४१,०००
वाशिम	६०,०००	रत्नागिरी	८०,०००	मुंबई शहर	२१,०००
रायगड	१,००,०००	ठाणे	४४,०००		

स्रोत : माहितीच्या अधिकाराखाली मिळविण्यात आलेल्या माहितीनुसार

दिनांक ३१ मार्च २००८पर्यंत दाखल झालेल्या प्रकरणांचा तपशील

तक्ता क्र. ५०

अक्र	जिल्हा	दाखल प्रकरणे	अक्र	जिल्हा	दाखल प्रकरणे
१	वाशिम	०	१३	बीड	०१
२	नाशिक	०	१४	जालना	१८
३	अमरावती	०१	१५	ठाणे	११
४	सिंधुदुर्ग	०२	१६	औरंगाबाद	१२
५	रत्नागिरी	०३	१७	सांगली	१४
६	नंदुरबार	०४	१८	उस्मानाबद	२४
७	हिंगोली	०३	१९	लातूर	२०
८	अहमदनगर	०६	२०	मुंबई	२९
९	नागपूर	०४	२१	पुणे	३२
१०	चंद्रपूर	०६	२२	जळगाव	९७
११	रायगड	०६	२३	अकोला	१०८
१२	परभणी	०७			
				एकूण	४४४

स्रोत : माहितीच्या अधिकाराखाली मिळविण्यात आलेल्या माहितीनुसार

प्रकरणांची सद्यस्थिती

- निकालात निघालेली प्रकरणे: १०६
  - निर्धारित ६० दिवसांच्या मर्यादेपेक्षा निकाल लागलेल्या प्रकरणांची संख्या: ५०
  - निर्धारित मुदतीपेक्षा ६० दिवस अधिक विलंबाने निकाल लागलेल्या प्रकरणांची संख्या: ४
  - निर्धारित मुदतीपेक्षा १२० दिवस वा त्यापेक्षा अधिक विलंबाने निकाल लागलेल्या प्रकरणांची संख्या: २२
- प्रलंबित प्रकरणे: २६४
  - निर्धारित ६० दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या -५८
  - १२० दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित प्रकरणांची संख्या- २८
  - १८० दिवस वा त्यापेक्षा अधिक काळ प्रलंबित प्रकरणांची संख्या -४३
  - सर्वाधिक प्रलंबित प्रकरणाचा कालावधी : ५१० दिवस

राज्य शासनाने नेमलेल्या सुरक्षा अधिकाऱ्यांची यादी

- सर्व जिल्ह्यांमध्ये महिला व बाल विकास विभाग, महसूल व वन विभाग, ग्राम विकास इ. विभागाअंतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांकडे अधिकची जबाबदारी दिलेली आहे. स्वतंत्र नेमणुका कोठेही नाहीत.
- जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई यांनी दिनांक २३ ऑक्टोबर २००८रोजी समर्थनला कळविल्यानुसार ''मुंबई शहर व मुंबई

उपनगर क्षेत्रासाठी सर्व समाज विकास अधिकाऱ्यांना संरक्षण अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात घोषित केले असले तरी सदरील संरक्षण अधिकारी या कायद्याअंतर्गत प्रकरण दाखल करण्यास नकार देतात. वरिष्ठांचे आदेश नसल्याची सबब देतात. त्यामुळे सद्यस्थितीत केवळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हेच संपूर्ण मुंबई शहरासाठी संरक्षण अधिकारी म्हणून काम पाहतात.''

सुरक्षा अधिकाऱ्यांना शासनाने पुरविलेल्या सहाय्याचा तपशील

- १ ३ जिल्ह्यांनी वाचन साहित्य, शासन निर्णय, पुस्तिका दिल्याचे कळविले.
- ८ जिल्ह्यांनी कोणत्याही प्रकारचे सहाय्य देण्यात आले नसल्याचे कळविले.
- २ जिल्ह्यांनी निरंक माहिती कळविली आहे.

कायद्यांतर्गत नेमावयाच्या सेवादायी संस्थांचा तपशील

- १ ६ जिल्ह्यांनी सदरील यादी उपलब्ध करून दिली (जिल्हा निहाय किमान १ व कमाल ५ संस्था कार्यरत)
- ४ जिल्ह्यांनी सेवादीय संस्थेस अद्याप मंजुरी मिळाली नसल्याचे सांगितले.
- ३ जिल्ह्यांनी सदर यादी निरंक असल्याचे कळविले.

जिल्हावार उपलब्ध समुपदेशक

- १ ६ जिल्ह्यांनी समुपदेशन अधिकाऱ्यांची यादी उपलब्ध केली.
- ६ जिल्ह्यात समुपदेशन अधिकाऱ्यांची यादी अनुपलब्ध असल्याचे कळविले.
- १ जिल्ह्याने यादी मंजूर नसल्याचे कळविले.

कायद्याच्या प्रसिद्धीसाठी राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती

- महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांनी जाहिराती, भित्तिपत्रके, शासन निर्णयाची प्रत, बैठका, माहिती पुस्तिका व प्रशिक्षणे घेतल्याचे कळविले आहे.

महिला व बाल विकासासाठी राज्य नियोजन मंडळाच्या सूचना

- महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात विविध योजना राबविण्यात येत आहेत, मात्र फलनिष्पत्तीबाबत कोठेही नोंद घेतली जात नाही. महिलांचे जीवनमान उंचावण्यामध्ये या योजनांचा काय लाभ झाला याची पाहणी होणे गरजेचे आहे.
- समान उद्दिष्टांच्या वेगवेगळ्या योजना एकत्रित करून सर्वसमावेशक योजना तयार करून सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय घडवून आणणे आवश्यक आहे.
- ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या एकूण उत्पन्नापैकी १ ० टक्के रक्कम महिला विकासाच्या योजनांवर खर्च करण्याचे आदेश असतानाही तसे होत नाही.
- वर्ष अखेरीस अखर्चित रकमा पुढील वर्षाच्या तरतुदीत जमा करून घेतल्या जात नाहीत. त्यामुळे अनुशेष शिल्लक राहतो. हा अनुशेष भरला जाईल अशी उपाय योजना करणे आवश्यक आहे.
- महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या संस्थांमधून वयाच्या १ ८व्या वर्षानंतर बाहेर पडावे लागते. या तरुणांना कोणतेही व्यवसाय प्रशिक्षण मिळालेले नसल्याने त्यांचे योग्य पुनर्वसन होत नाही. यासाठी या संस्थांमधील मुला/ मुलींना व्यवसाय प्रशिक्षणासाह समुपदेशन व रोजगार-स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन मिळणे व त्यासाठी जिल्हा स्तरावर सक्षम यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

♦ ♦ ♦

''महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य असून त्याचा मानव विकास निर्देशांक बराच वरच्या पातळीवर आहे, अशी महाराष्ट्राची एकूण देशातील प्रतिमा असली तरी या राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे. याचाच अर्थ असा की महाराष्ट्रात वैभवाची व संपत्तीची काही बेटे असली तरी विषमता व विकासातील असमतोल हा या विकास कथेचाच एक भाग आहे. राज्याच्या नागरी भागात व ग्रामीण भागात दारिद्र्य आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दारिद्र्य हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनून राहिल्याने राज्यातील वाढती बेकारी, स्थलांतर शहरात सतत वाढत जाणारी गर्दी, गरिबांचे कुपोषण व त्यामुळे मुलांचे मृत्यू, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे सारे प्रकार निर्माण झाले आहेत.''

-राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत सामाजिक पायाभूत सुविधानिर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो त्याच गतीने तो शिक्षणाच्या समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध होणे क्रमप्राप्त आहे.

-राज्य नियोजन मंडळ, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक व प्रगत राज्यांपैकी एक आहे. मात्र अलिकडच्या काळात राज्यास आर्थिक तणावांचा सामना करावा लागला आहे. परिणामी भौतिक व सामाजिक सुविधांमध्ये पुरेशी गुंतवणूक होत नसल्याचे दिसून येत आहे. राज्याने आपल्या आर्थिक धोरणांचा आढावा घेऊन आवश्यक तेथे सुधारणात्मक उपाय योजून स्वत:ची विकासाची क्षमता ओळखण्यात अधिक उशीर करावयास नको.

-श्री. बी. एन. युगंधर, सदस्य, नियोजन आयोग, भारत सरकार

देशाच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा १९ टक्के वाटा आहे. सेवा क्षेत्रासाठी हेच प्रमाण १५ टक्के आहे. देशाच्या स्थूल उत्पन्नात राज्याचा वाटा १३ टक्के आहे. दरडोई उत्पन्नाचा विचार करता देशात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. असे असतानाही ९०च्या दशकापासून राज्याची कामगिरी खालावत चालली आहे.

- राज्य विकास अहवाल, नियोजन आयोग, भारत सरकार